म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १०३५
IRBK-0101035
IRBK-0101035
IRBK-0101035

सुवाङ्मयेन गीतेन युवतीनां च लीलया ।। यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशुः ।।

सरसवाङ्मयरत्नमालेचें ८५ वें रत्न.

# देशसेवा

( स्वतंत्र सामाजिक नाटिका. )

लेखक

श्रीयुत गोपाळ गंगाधर पोतदार,
एम्. ए., एल्. टी.

संपादक व प्रकाशक

तात्या नेमिनाथ पांगळ,

प्रकाशक:--सरसवाङ्मयप्रसारक मंडळी,

८०९ रविवार पेठ, पुणें

मुद्रक

श्रीपाद रघुनाथ राजगुरु,

'राजगुरु आणि कं. प्रेस,' ५१३ शनवार पेठ, पुणें.

आवृत्ती १ ली. क्रमांक १४५ } किंमत एक रुपया { मे. १९३१ कायम ग्राहकांस ०॥०

IRBK-0101035
IRBK-0101035

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर त्याचप्रमाणें जाग्रणें व मानसिक काम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी.

नकले-बद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध रहावें.

मानसिक श्रम करणारे विद्यार्थी, वकील, वैद्य, डॉक्टर, न्यायाधीश व गिरणीकामगार वगैरे व जाग्रणाचीं कामें करणारे नाटकी, सर्कसवाले, तारमास्तर, स्टेशनमास्तर, वगैरे लोकांस हें तेल वापरण्यास अत्यंत उपयोगी आहे. १ बाटली किंमत रु. १८२, मध्यम बाटली ८१०, लहान८६.

## बाळबाळंतिणीकरितां औषधें.

**बाळंतकाढा**—नं. १. पहिले दहा दिवसांत घेण्याचा. किं. ८१४.
**बाळंतकाढा**—नं. २. दहा दिवसांनंतर घेण्याचा. किं. ८१४.
**बाळकडू**—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य. किं. रु. ८८.
**कुमारी आसव**—मुलांकरितां बाटली. किं. ८१४.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास अत्यंत मधुर व आरोग्यकारक असें

## द्राक्षासव

एक रत्तल रु. १८१० | अर्धा रत्तल ८१४.
दीड रत्तल रु. १८४. | ट. पॅ. ख. निराळा.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, वगैरे ५०० वर औषधें तयार असतात. त्यांचे माहितीचा मोठा कॅटलॉग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्णपत्रिका" हीं सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

ब्राह्मी तेलाचे व टिकाऊ तयार काढ्याचे मूळ कल्पक व शोधकः—

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स,**
**आर्यौषधी कारखाना, चेंबूर,** जि. ठाणें.
प्रमुख दुकान—**दवाखाना, ठाकुरद्वार—मुंबई नं. २**

# प्रस्तावना.

देशसेवा नाटक असहकारितेच्या पहिल्या अमदानींत लिहिलें व तें आजपर्यंत तसेंच पडून होतें. लेखन हा माझा धंदा नसल्यामुळें हौसेखातर लिहिलेलें हें लिखाण बेमुदत अज्ञातवासांत पडून राहणें साहजिकच आहे. शिवाय रंगदेवतेच्या लहरी मालकांशीं सर्वस्वी जुळणारा माझा स्वभाव नसल्यामुळें देशसेवेला अजून रंगभूमी प्रसन्न झालेली नाहीं. तसेंच हस्तलिखित प्रत एका नाटक मंडळींतून मोठ्या प्रयासानें परत मिळवावी लागली. कारण ती जवळजवळ हातांतून गेलीच होती.

माझे मित्र श्रीयुत तात्यासाहेब पांगळ यांच्या रसिकतेमुळेंच देशसेवेचें मुद्रण होण्याचा योग आला याबद्दल श्री. पांगळ यांचे मी मनापासून आभार मानतों.

मनांत उचंबळणाऱ्या भावना व सभोंवतालची परिस्थिति या नाटकांत चित्रित करण्याचा हा प्रयत्न कितपत साधला आहे हें ठरविण्याचें काम रसिकांचें आहे. त्यांच्याच सहृदय रसिकतेवर पुढील मार्गक्रमण अवलंबून राहील.

विजयादशमी १८५२
धुळें.
२–१०–१९३०

विनीत,
**गोपाळ गंगाधर पोतदार.**

सादर समर्पण

परमपूज्य पितृपदों

—लेखक

म. ग्रे. सं. ठाणें, वाचनालय वा. ग्रं. ४१८
दा. क्र. १०३५ ओं. दि ....
वि. .... क्र. ....

# देशसेवा.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

**स्थल:**—मंदाकिनीचा दिवाणखाना. प्रातःकालच्या अंधुक उजेडांत तिजोरीजवळ बसलेला मधुकर.

**मधुकर:**—( स्वगत )करारी कर्तबगारीची करामत कामिनी व कांचनासाठींच असते. ही सकाळची सोन्याची संधि साधली तर जन्मभर संपत्तीच्या सुखाची सोबत होईल. एकदोन तासांच्या या निवांतपणांत पुढील धामधुमीचा पाया भक्कम भरून ठेवला पाहिजे. (मृत्युपत्र काढतो) नलिनीच्या सौंदर्याबरोबरच काकींच्या संपत्तीला घशांत टाकण्याची माझी आशाज्योति, परदेशांतून वाहत येणारा हा अरविंदाचा प्रभंजन मालवून टाकणार काय ? पण तो येण्याच्या अगोदरच या वाऱ्याची मोट बांधून मधुकराची मखलाशी नलिनीच्या डोळ्यांत धूळ तर टाकणार ! (मृत्युपत्रावर F. P. नें लिहून) पण—त्याबरोबर काकीचेही डोळे कायमचे मिटले पाहिजेत ! ( मृत्युपत्र तिजोरींत ठेवून ) माझ्या सुखाशेच्या बारशाबरोबर नलिनीच्या भावी संपत्तीचें व काकीच्या प्राणांचें बारावें उरकावें लागणार ! ( दार लावतो, पावलें वाजतात, मधुकर दचकतो. )

**सरला:**—( प्रविष्ट स्वगत ) हे कोण, मधुकर, आणि चोरून काय करीत आहेत हे ! मी चोरपावलीं आलें म्हणून हा चोरटा कारभार दृष्टीस पडला. ( प्रकाश )काकी ? सगळीच सामसूम ! ( पुढें येऊन ) कोण, डॉक्टर ! ( मधुकर चपापतो. )

**मधुकर:**—( सस्मित ) आज कोणीकडे वाट चुकलांत सरलाताई ! निरभ्र आकाशांत वीज एकदम कशी चमकली !

**सरला:**—नलिनी कुठें गेली ?

**मधुकर:**—रावसाहेब गिरीशांचा अरविंद आज विलायतेहून येणार आहे. तेव्हां सर्वजण बंदरावर गेलीं आहेत आणि मीहि निघालोंच. चला, येतां का? (सरला आरशांत केस साफसूफ करते.) (स्वगत) जरा छेडूं कां हिला थोडी. (प्रकाश) पण यशवंतरावांना राग नाहींना येणार !

**सरला:**—जातां येतां दारानें किरकीर केली म्हणून घरांत कां बसून रहायचें आहे ?

**मधुकर:**—(स्वगत) यशवंतरावाची दाराच कां बोलते आहे?(प्रकाश) म्हणजे काय ?

**सरला:**—डॉक्टर, सुखाच्या संसाराचें भाग्य सगळ्यांच्या कपाळीं देव लिहीत नाहीं, म्हणून रडत बसण्याशिवाय इलाज नाहीं.

**मधुकर:**—देवाला माणसानेंच निर्मिलें आहे. भोळा भाव ज्याला देव म्हणतो त्यालाच प्रयत्नवादी कर्तबगारी म्हणतो. विश्वामित्रानें ब्रह्मदेवालाहि शह दिला होता. आपलीं सुखदुःखेंही कर्तबगारीच्या मुठींत असतात. कर्तबगारीला प्रबल इच्छाशक्ति पाहिजे.

**सरला:**—काय ? आपलीं सुखदुःखें इच्छेवर अवलंबून असतात ? चौदा वर्षांचा वनवास व लंकेंतील कारागृहवास सीतामाईना हवा होता ?

**मधुकर:**—तसं नव्हे. मर्दांनी प्रयत्नानें जनानी इच्छेचा हात धरला पाहिजे. सरलाताई, वृद्धक गौतमाची अहिल्या सुंदर इंद्रानें एकांतांत हात धरतांच घाबरली नाहीं, किंवा बृहस्पतीच्या तारेनें तरण्याताठ्या चंद्राला कामशास्त्राची सक्रिय संथा देतांना मुळींच मागें पुढें पाहिलें नाहीं.

**सरला:**—पण इंद्राला मांजराच्या पायानें पळ काढावा लागला आणि चंद्राला तर क्षयच लागला. पापाचें फळ कांहीं भोगल्यावांचून सुटत नाहीं, डॉक्टर !

**मधुकर:**—पाप व पुण्य याच मुळीं भ्रामक कल्पना आहेत. त्या पापामुळें इंद्रापासून एकही अप्सरा पळाली नाहीं किंवा चंद्राला चांदणीचौकांत मज्जावही झाला नाहीं. (स्वगत) हिच्या उठवळ पातिव्रत्याला एकदां उधळून लावलें, कीं, विषयलोलुप मनाची दृष्टि फांकून बेवारसी प्रेमाला पाय फुटतील ! मग कोमल करांची मिठी लग्नगांठीला सैल करून परदेशी मुशा-

फरांना देहाचा दरवाजा उघडा करतील.

**सरलाः**--डॉक्टर, तुम्ही बरेच नास्तिक आहांत की हो !

**मधुकरः**--मनाला पटणाऱ्या गोष्टी उघडपणें बोलून दाखविणारा निर्भीड माणूस आहें मी.

**सरलाः**--अन् अरविंदाचं लग्न नाहीं झालं वाटतं ?

**मधुकरः**--करायचंय काय लग्न करून ? विवाहाच्या बंदिस्त जागेंत अडकल्यावर प्रेमाच्या उघड्या मैदानावर मनमुराद उधळायला सांपडत नाहीं. सप्तर्षींच्या घोळक्यांत डांबून ठेवलेल्या अरुंधतीला गगनाच्या चौकांत भटकायची मुभा नाहीं !

**सरलाः**—पण नलिनी मात्र अरविंदाकरितां वेडी झाली आहे.

**मधुकरः**--असेल. पण बारा बंदरचें पाणी प्यालेल्या अरविंदानें आतां-पर्यंत तिकडे किती तरी नलिनींची तोंड ओळख करून ठेविली असेल.

**सरलाः**--कांहीं तरीच बोलतां झालं ! ( पाहून ) अहाहा, अरविंद नुसता मदनाचा पुतळा आहे. नलिनी खरंच भाग्यशाली आहे. ( स्वगत ) नाहींतर आमचं ध्यान. देवा, माझ्या मनांत काय विचार येत आहेत !

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

( झंकार आरामखुर्चीवर पडला आहे, वीणा जवळ उभी आहे, नलिनी व मंदाकिनी बसल्या आहेत. गिरीश व अरविंद प्रविष्ट. )

**गिरीशः**--हा माझा अरविंद.

**मंदाकिनीः**—रावसाहेब, अगदीं कुळदीपक मुलगा आहे बरं. अगदीं कुलभूषण. मुलगा असावा तर असा. विद्येचं तेज तोंडावर झळकतं आहे. स्वभाव किती नम्र, अन् रूपाला तर दृष्ट लागेल अगदीं ! वाः छान !

**गिरीशः**--माझ्या अरविंदासारखा सुविद्य व सदाचारी तरुण, म्हणजे नुसतं आमच्या कुळाचेंच नव्हे तर अखिल महाराष्ट्राचें भूषण आहे.

**अरविंदः**--आंधळ्या मायेला दोष दिसत नाहींत. केवळ नांवाचा बडेजाव वाढविण्यापेक्षां, जास्त मोठें कार्य मीं काय केलें आहे ? एखाद्या बॅरिस्टराच्या खोगीरभरतीनें देशाचें काय महत्कार्य साधणार आहे, बाबा !

**गिरीशः**--कृतविद्य झालास तरी तुझें निराभिमानी वर्तन भूषणास्पद नाहीं का ?

**अरविंदः**-- ( साश्रु ) बाबा, महाराष्ट्राचें भूषण, देशाच्या दुर्दैवानें आमच्यापासून काळानें हिरावून नेलं. या बॅकवेवर पाय ठेवतांच कुणाचे डोळे पाण्यानें भरून येणार नाहींत ? महाराष्ट्राचा अनभिषिक्त राजा याच ठिकाणीं लढतां लढतां गारद झाला. महाराष्ट्राचा भाग्यसूर्य येथेंच मावळला. रत्नागिरीवर उधळून दिलेलें अमोलिक विद्वद्रत्न येथेंच रत्नाकरानें पुन्हां पोटांत ठेविलें. पुण्याचा पांडुरंग याच वाळवंटावर कायमचा उभा राहिला. बाबा, महाराष्ट्राचं भूषण लोकमान्य! तुमचा अरविंद नव्हे. मनाच्या फसवणुकीनें जनांना फसविणें शक्य नाहीं.

**गिरीशः**--( सकोप ) म्हणजे टिळकांच्या नंतर महाराष्ट्र काय मेषपात्र मेंढरांचा मेंढवाडा झाला आहे कीं काय ?

**अरविंदः**--नाहीं तर काय ? ती पहा, बाबा, परदेशी श्रीमंती मोटारींतून मौजेनं मिरवत आहे आणि ही देशी गरिबी उन्हातान्हांतुन पायींच रखडत आहे. यांच्याकरितां कोणीं कांहीं केलें आहे का ? परदेशी पोषाखाच्या चकचकाटांत गरीब बांधवांच्या फाटक्या लकतऱ्या कोण पाहतो ? परदेशी पुंड या राजप्रासादांतील ऐश्वर्यांत लोळत आहेत आणि गरीब देशबांधव खुराडया चाळींत ठरीव पगारावर वाढत्या संसाराचा व्याप करीत आहेत. यांची कींव कोणाला येते कां बाबा ? आणखी शिवाय असं पहा कीं, मजूर अन्नाला महाग, तर भांडवलवाले आपल्या तुंबडया भरण्यांत गर्क. बाबा, पोटाच्या मार्गी लागलेल्या कंगाल नोकरवर्गाचीं हाडें परदेशी मालकांच्या मस्तीनें घुसळलीं जात आहेत. तेव्हां या दीनदुबळ्यांवर दया दाखविणारे देव आज किती आहेत ? लोकांकरितां आमरण कष्टणारे लोकसेवक, ते पूज्यवर लोकमान्य, आज स्वर्गाला गेले-आणि-

**गिरीशः**--बस्स, हीच कां तुझी विलायतची कमाई, अरविंद ? देशांतल्या असंतोषाचें रडगाणें आतां अगदीं बेसूर झालें आहे. स्वतंत्र वातावरणांतून येऊनसुद्धां तूं हींच रडगाणीं गातोस ? नॉनसेन्स ! तेथील उदार वातावरणाचा हाच का परिणाम ? अरविंद, हे देशसेवेचे चोंचले आपल्याला नकोत बुवा !

**अरविंद**:—वस्तुस्थिति नको म्हटल्यानें थोडीच नाहींशी होणार आहे! त्या भारतभूषण तिलकानें स्वार्थत्यागाच्या जोरावर सगळ्या हिंदुस्थानांत देशसेवेचा झेंडा नाचविला. त्या विद्वद्रत्नाच्या तेजानें पाश्चात्त्यांचे डोळे दिपले. त्या भारतीय राजकीय चळवळीचा जनक आज तरुणांना देश-सेवेची स्फूर्ती देत आहे. बाबा, झरे बुजवतां येतात पण जलप्रवाह अखंड वाहतो. सोनेरी किल्लीनें स्वार्थाच्या तोंडाला कुलूप बसेल, पण–

**मंदाकिनी**:—रावसाहेब, या तरुण पिढीच्या तालाबरोबर आपले जुनें सूर जुळणार नाहींत, चला.

**गिरीश**:--होय, जुन्या पिढींतले सुशिक्षित ज्यांचा नुसता विचारही करीत नाहींत ते धाडसी विचार नव्या पिढीच्या मनांत थैमान घालीत आहेत.

**अरविंद**:--आणि ते विचार उच्चारांच्या वेषांत देशभर धुडगूस घालीत आहेत.

**मंदाकिनी**:--मधू मोटार बोलाव, चला रावसाहेब, एकदां नक्की करून टाकूं

**गिरीश**:--चला तर मग. पिकल्या पानाच्या संसर्गानें नवतीलासुद्धां अकालीं पांडुरकी येते. चल, अरविंद.

**अरविंद**:--मी चौपाटीवरील लोकमान्यांच्या समाधीचें दर्शन घेऊन आलोंच. व्हा पुढें तुम्ही. (गिरीश व मंदाकिनी जातात)

**मधुकर**:–[प्रवेश] माझ्या कराल करणीचे कसाब या परदेशी फटिंगाला दाखविल्यावांचून मला चैनच पडणार नाहीं. (जातो.)

**वीणा**:– दादा, विलायती शिष्टाचार समुद्रांत सोडून दिलेस काय ! अरे, मुखस्तंभासारखा उभा कां राहिलास ? सर्वांचा परिचय करून घेतलास का ?

**सरला**:—परिचय करून द्यायचा असतो, वीणाताई.

**वीणा**:--होय का ? बरं तर, दादा, ही सरलाताई, सरदार झंकारांची बहीण. गुदस्तां यांचं लग्न ते यशवंतराव न्यायाधीश आहेतना, त्यांच्याबरोबर झालं. त्यांचं कितवं म्हणून नको विचारूंस, पण यांचं मात्र पहिलंच. शिवाय, त्यांचं वयसुद्धां कांहीं फार नाहीं. आहे आपलं साठीच्या घरांत. ही घरांत आली तरी त्यांचं बाहेर जाणं सुरूच आहे. शिवाय घरांत दिसायलाही कांहीं वाईट

नाहींत ते. कसे अगदीं सभ्य अन् प्रौढ आहेत. शोभतील आजोबा हिला !

**अरविंदः**—वीणे, तुझा फटकळपणा अजून कमी झाला नाहीं अगदीं.

**वीणाः**—दादा, हें पहा, रागावूं नकोस. माझा फटकळपणा दिसतो, अन् श्रीमंत वृद्धाच्या गळ्यांत एकाद्या तरुण मुलीची दावण बांधून तिच्या जन्माचं मातेरं करणाऱ्या बापांचा कसाईपणा दिसतो का ? श्रीमान् वराच्या वयाकडे डोळेझांक करणारे बाप आपले डोळे झांकल्यावर होतात मोकळे, पण पोरींच्या डोळ्यांतून रोज पसापसा पाणी जातं. यापेक्षां बँकांच्या इमारतींशींच कां नाहीं देत वधूंची एक दावण बांधून, म्हणजे म्हाताऱ्या नवऱ्यांच्या हाडांच्या सांपळ्याबरोबर जन्म काढण्याऐवजीं, एकाद्या घडकींत दगडावर डोकीं आपटून जीव तरी देतां येईल त्यांना !

**अरविंदः**—बस्स, पुरें तुझें चऱ्हाट.

**वीणाः**—बरं,जाऊंदे तें! हा नलिनी सागरांची मुलगी. पण मंदाकिनीबाईनीं हिलाच आपल्या ओटींत घेऊन दौलतीची मालकीण केली आहे म्हणतात. अन् तसं म्हटलं तर ती श्रीमंती शोभतेही हिला. बोलणं चालणं, कसं अगदीं नेमस्त! नेमस्तांनींसुद्धां धडे घ्यावेत अगदीं. इतका वेळ झाला तरी तिनें तोंडसुद्धां उघडलें आहे का पहा !

**सरलाः**—(हळूच) पण डोळे मात्र झांकले नाहींत हो.

**वीणाः**—हं ! झांकण्याचें काय ? यांचे हे सरदार झंकार डोळे झांकून पडले आहेत. यांनीं आपले कानही झांकले असते; पण ते पडले फार लांब म्हणून ते मात्र उघडेच राहिले.

**नलिनीः**—वीणेच्या तोंडाचा पट्टा एकदांसुरूं झाला कीं इतरांना तोंडाला कुलूपच घालावें लागतें.

**वीणाः**—बायकांनीं तोंडाला कुलूप घातलें म्हणून तर आज त्यांचे हाल कुत्रा देखील खाईना. स्त्री व पुरुष हे एकाच समाजाचे घटक असतांना जेथें पहावें तेथें आपला पुरुषांचा वरचष्मा कां? बायकांना कांहीं अंतःकरण, भावना, सुखदुःख कांहींच नाहीं ? तें कांहीं नाहीं. समान हक्काकरितां कंबर कसून बायकांनीं भांडलेंच पाहिजे.

**झंकारः**—( जांभई देऊन )भांडणावांचून जगाला कांहीं सुचतच नाहीं काय ? ( उठून पाहून ) ओहो अरविंद, आलास कां तूं ? माझा आतांच

डोळा लागत होता तों या भांडणानें जागा झाला.

**वीणाः**—वाः ! सरदारसाहेबांची झोंप फारच सावध, अगदीं कुंभकर्णावर ताण.

**अरविंदः**—(सहास्य) खरा महात्मा आहेस तूं! जगाच्या प्रचंड उलाढालींत स्वतः शांतचित्त असणें सोपें नाहीं, झंकार.

**झंकारः**—पण दुसऱ्याचें चित्त वृथा तापविणाऱ्या उलाढाली जगानें तरी कां कराव्यात ? आतां येथेंच पहा, काय द्राविडी प्राणायाम आहे. हा समुद्र म्हणे मागें हटवून मलबारहिलची माती कुलाब्याला मिळवायची. पाड ही टेकडी आणि बुजव ती खाडी. जागोजाग रूळ काय पसरले आहेत, पूल काय उभारले आहेत. अरविंद, काय ही धांवपळ ! मरायलासुद्धां एक विसाव्याचा क्षण मिळायचा नाहीं, मग जिवंतपणीं क्षणाचा विसावा कुठला!

**अरविंदः**—विसाव्याच्या आळशी युगाचा अंत होऊन उद्योगाच्या धांवपळीचें युग आतां लागलें आहे. जीवनार्थ कलहाच्या चढाओढींत धांवपळ ही चालायचीच.

**झंकारः**—धांवपळीच्या जीवनापेक्षां शांततेचें मरण पत्करलें. नद्याओढ्यांच्या धांवपळीबरोबर पर्वतानें इकडची मान तिकडे केली नाहीं किंवा ताऱ्यांच्या पळापळीनें आकाशानें पळ काढला नाहीं.

**अरविंदः**—सजीव मानवजातीला निर्जीव दगडाची उपमा साजत नाहीं आणि आकाशाचें अस्तित्व तर नुसता मिथ्याभासच.

**झंकारः**—आणि जग म्हणजे तरी दुसरें काय '**ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या ।**' शिवाय जगाचा आदिअंत जर दगडांत, तर त्याच्या मध्याला दगडाची उपमा कां नको ?

**वीणाः**—वा ! अगदीं बरोबर.

**झंकारः**—शाबास, वीणाताई, खऱ्या ब्रह्माचें शांत मनानें ध्यान करण्याचें सोडून खोट्या जगामागें धांवण्यांत तरी काय अर्थ?

**वीणाः**—आरामखुर्चीवर डोळे झांकून ध्यानच चाललं होतं वाटतं ! सरदारसाहेब बडे तत्त्ववेत्ते आहेत बरं का!

**नलिनीः**—वीणे, जरा गप्प बसशील का ?

**वीणा**:--मुळींच नाहीं.कां? तुझ्या आड तर येत नाहींना मी? पण बरो-बर आहे बाई, पैशाकडे पैसा जातो म्हणतात. तूं त्यांची तरफदारी केलीच पाहिजेस. आकाशाच्या अंगणांत येऊन एका चांदणीनें दांत दाखवायचा अवकाश, कीं, क्षणांत तेथें हंसऱ्या मुखांचें प्रदर्शन भरलेंच! पण नलिनी, तूं मुखदुर्बल, तुझ्या जोडीला झंकाराचें झोंपाळू पात्र अगदीं विसंगत दिसतें. कारण तुझ्या मनांत उसळणाऱ्या प्रेमाच्या लाटांना तूं ओठांच्या बांधानें थोपवून धरलें आहेस तर यांच्या डोळ्याच्या खिडक्या लावल्यामुळें, सभोंवार पसरलेला प्रेमाचा बाजार यांच्या मनाला दिसतच नाहीं. टीच-भर जगांतल्या ओळखीच्या प्रेमावर तुझी नजर खिळली आहे, तर अफाट विश्वांतील अनोळखी ब्रह्माला यांची अंतर्दृष्टी शोधीत आहे. (हंसून) तुझ्या मुक्या प्रेमगायनाबरोबर यांचें बेगुमान झोंपेचें घोरणें जरा बेताल लागतें.

**अरविंद**:--वीणे, तुझ्या बोलण्याला ताळतंत्र कांहींच नाहीं.

**झंकार**:--बोलण्याच्या नादांत वाट तेव्हांच सरली. अरविंद, हेंच तें पावन राष्ट्रतीर्थ. पुण्याची पुण्याई याच ठिकाणाला पावली. पुण्यनगरींचा पांडुरंग याच ठिकाणीं अंतर्धान पावला!

(सर्व लोकमान्यांच्या समाधीला वंदन करितात.)

**अरविंद**:--देवा! महाराष्ट्राच्या इतिहासाची पुनरावृत्ती केव्हां होणार हें तुलाच माहीत!

(पडदा.)

---

## प्रवेश ३ रा

(यशवंताचा रंगमहाल)

**यशवंत**:--(स्वगत) प्रेमाची पैशावर प्रीति असते का त्याची तारुण्यावरच नजर खिळते, कां सौंदर्यानें प्रेम वेडें होतें? तरुण दांपत्यानें पेरलेलीं प्रेमाचीं पिकें चंद्रमोळी घरांत वाढीस लागतात; पण विषम वया-मुळें राजप्रासादांच्या रंगमहालांत प्रेमाचें बीं रुजतच नाहीं. नवी वसुंधरा तरण्या वसंताच्या वाटेकडे डोळे लावून बसते, तर म्हाताऱ्या हेमं-ताला वैतागलेल्या वसुधेच्या मागें धांवतां धांवता पुरे वाट होते. रात्रभर

चंद्राभोंवतीं मनमुराद नाचणाऱ्या चांदण्या दिवसा सूर्याच्या वाऱ्यालाही उभ्या रहात नाहींत. ( विचार ) माझ्या संशयी दृष्टीला ही सोन्याची धूळ दिसते, कां तीच माझ्या डोळ्यांत धूळ टाकीत आहे? पण या गोष्टीकडे डोळेझांक करूं नये. या नाचऱ्या लक्ष्मीच्या पाळतीवर तो परदेशी भय्याच बरा आहे. वयाच्या मानानें त्याची नजरही वांकडी होणार नाहीं.(मोठ्यानें हांक मारतो—कैलास ).

**कैलासः**—( प्रविष्ट ) हा संशयी थेरडा कोणत्या कामाची घोरपड गळ्यांत बांधतो आहे? ( उघड ) हुजूर, फर्माइये.

**यशवंतः**—तुझ्या घरीं कोण आहे रे?

**कैलासः**—सिर्फ हमारी औरत. ( स्वगत. ) आणि तीहि कल्पनेंतच.

**यशवंतः**—वयानें मोठी असेल?

**कैलासः**—नही साहाब, बिलकुल जवान ओर खुपसुरत है. ( स्वगत ) कल्पनेंतल्या कुबेराला दारिद्य कशाला?

**यशवंतः**—मग संसार कसा चालतो?

**कैलासः**—इसके लिये वो पुरानी नोकरी छोड दिई और आपके पास आया हूं. (स्वगत) अगदीं खरेंच.

**यशवंतः**—उतारवयांत लग्नगांठ बांधणें कांहीं फारसें वाईट नाहींच तर.

**कैलासः**—( स्वगत ) अंगवस्त्रापेक्षां बरं. पण उतारवयांतली लग्नगांठ जरा ढिली असते.

**यशवंतः**—ठीक, तुला रात्रीं कांहीं काम नाहीं, पण दिवसभर (कानांत सांगतो ) समझा कैलास!

**कैलासः**—ए क्या?

**यशवंतः**—चूप,काम कबूल असेल तर दाम भरपूर आहे.आहे कबूल?

**कैलासः**—जी हां! काम चोख पैसा रोख.

**यशवंतः**—हा घे पैसा अगोदरच. ( रुपये देतो. )

**कैलासः**—पैशानें पोटाची सोय तर लागलीच. प्रेमाची भूकही सरलेच्या दर्शनानें निवेलच. (सरला येते.) ( जातो. )

**सरलाः**—हा नवीन नोकर वाटतें?

**यशवंतः**—होय, आहे ना पसंत?

**सरलाः**—अगदीं पूर्ण पसंत. इकडच्या कल्लेदार मिशांची मिजास त्या लांब दाढीला चांगली राखतां येईल. आमचें घर म्हणजे म्हाताऱ्या थेरड्यांचें प्रदर्शनच! एथून तेथून साऱ्या दाढीवाल्या बोकडांचा बाजार. एखाद्या थेरडीबरोबरच लग्न कां नाहीं लावलंत?

**यशवंतः**—बायकांना जसे केस तशा कल्लेदार मिशा आम्हां पुरुषांना शोभादायक असतात.

**सरलाः**—हो. झुबकेदार मिशांच्या आड दडलेली ओठांच्या भिंताडांतील पडक्या दांतांचीं खिंडारें तोंडाच्या दऱ्याखोऱ्यांत जास्त भेसूर मात्र दिसतात. त्यापेक्षां मिशांची अजिबात कापणी केलेली काय वाईट? अरविंदांनीं कांहीं तोंडाभोंवतीं दाढीमिशांचा पसारा पसरला नाहीं.

**यशवंतः**—अरविंदाला विचारतोय कोण? त्याची कशाला पत्रास माझ्यापुढें? बॅरिस्टर झाला तरी उभें रहावें लागणार माझ्याचपुढें. आमच्यासारखे सभ्य गृहस्थ त्याच्या वाऱ्यालाही उभे रहावयाचे नाहींत.

**सरलाः**—अंगांतून वारें गेल्यामुळें त्यांना उभेंच रहावत नसेल. म्हातारपणीं पोरकट चाळे करून दुसऱ्याच्या सुखाचा पोरखडा केल्यामुळें लोक आपलीं स्तुतिस्तोत्रें गात असतील. अहाहा, काय पण सभ्य! दिवे ओंवाळा सभ्यावरून. पोरांचा पोरकटपणा दिसतो अन् स्वतःचा हलकटपणा—

**यशवंतः**—बोलण्याला कांहीं मर्यादा आहे कां? माणसानें आपला धर्म पाळला पाहिजे. धर्मानें व कायद्यानें मी तुझा पती आहें याचा विसर पडला वाटतं तुला!

**सरलाः**—दुर्दैव मूर्तिमंत डोळ्यासमोर उभें असल्यावर विसर कसा पडेल? माझ्या कम्नशिबानें माझ्या शरीरावर आपला कायदेशीर हक्क असेल, पण मनावर मात्र नाहीं. देहाचे धिंडवडे चाललेच आहेत रोज; आणि देहावरही ज्या धर्मानें हक्क दिला आहे त्या धर्माला मी जुमानीत नाहीं. तरण्या पोरींच्या गळ्याला म्हाताऱ्या माकडांचा, पती म्हणून फांस घालणाऱ्या धर्माच्या अर्थाचा अनर्थ तरी झाला असला पाहिजे किंवा असला धर्म लिहिणारे उपटसुंभ उलट्या काळजाचे मामटे तरी असले पाहिजेत!

**यशवंतः**—(स्वगत) आज वीज अगदीं कडाडते आहे, कपाळमोक्ष झाला

ना. गा. जोशी



नाहीं म्हणजे मिळवली.

**सरला:**—तुमच्या पोरी शोभणाऱ्या मुलीबरोबर पत्नीच्या नात्यानें वागतांना तुमच्या अक्कलेचें दिवाळें तर निघालें नाहीं ना ?

**यशवंत:**—मूर्ख आहेस. ऋष्यशृंगाशीं लग्न केल्यामुळें शांतेच्या आयुष्याचें वाटोळें झालें नाहीं. घे, प्रत्यक्ष रामायणांतला हा पुरावा.

**सरला:**—रामायणांतील रामकाळाच्या चालीरीतींनीं केव्हांच राम म्हटलें आहे. आज कोणी वनवासांत जात नाहीं कीं, अग्निद्विव्यहि करीत नाहीं. पुराणांतील वांगीं पुराणांतच. रामचंद्राचें एकपत्नीव्रत तुम्हांला वावडें आहे वाटतें ? पहिल्या बायकोच्या चौदाव्यालाच दुसरीबरोबर चतुर्भुज होतांना रामायणाला रामराम ठोकला होता वाटतं ?

**यशवंत:**—रोजच जर असा जुलुमाचा रामराम होऊं लागला तर संसारांत राम राहणार नाहीं.

**सरला:**—तळीराम गार करायला बाहेर आरामाचीं स्थानें काय थोडीं आहेत आपल्याला ?(यशवंत जवळ जाऊन लाडानें गालाला हात लावतो.) ताकापुरतें रामायण पुरे !

**यशवंत:**—वेडी रे वेडी ! अग, तुला कांहीं कमी कां आहे. कपडेलत्ते दागदागिने—

**सरला:**—देवळांत फक्त देवच नाहीं, बाकी देवळाला शिखर आहे, दगड आहेत—

**यशवंत:**—या दगडावर डोकें ठेवलेंस तर मोक्ष तरी हातीं येईल; आणि हो, तूं नरकाच्या आडवाटेला लागूं नयेस म्हणून तुझ्या वाटेवर कैलासाची स्थापना केली आहे. कैलासाचा डोळा तुझ्या वाटेकडे असल्यावर तूंही त्याच्या वाटेला जाणार नाहींस. वयाच्या वडीलकीमुळें तो तुझ्या प्रेमांतही वांटेकरी होणार नाहीं. ( कैलास येतो. )

**कैलास:**—तकलीफ माफ कीजिये हुजूर, बाहर सरदारसाहब आये है. ( यशवंत जातो. )

**सरला:**—(दचकून त्याच्याकडे पहाते.) [स्वगत] आवाज तर ओळखीचा दिसतो. कुणाचा बरें आवाज ? भैय्या, कायरे तुझें नांव ?

**कैलासः**—कैलास. ( पहात पहात जातो. )

**सरलाः**—( स्वगत ) फक्त वयांत आणि भाषेंत फरक ! माझा आनंद अस्मानांतून जमिनीवर उतरला काय पुन्हां ?

---

## प्रवेश ४ था.

[ सागरचें उद्योगभवन. ]

( नलिनी फोटोला फुलांची माळ वहात आहे. )

**नलिनीः**–( स्वगत ) बालपणापासून मनसुमनांनीं पूजलेल्या प्रेमळ परमेश्वरा, आतां हें देहाचें फूल गोड मानून घ्याल ना ? प्रेमाच्या सुंदर चित्रा, सौंदर्याच्या सागराला ही साधीसुरती सरिता शोभेल ना ? देवा, माझी ही साधी भोळी भक्तीची मंजुळा आपल्याला आवडेल ना ? ( अरविंद प्रविष्ट. )

**अरविंदः**—नलिनी त्या चित्राचा मालक तुझ्यामागें उभा असून-सुद्धां तूं अझून त्या चित्राशींच बोलते आहेस ? देवाच्या दयेनें आपल्या प्रेमाची वाट संकटाच्या कांटेरी कुंपणांतून नसल्यामुळें मनाला बोलक्या निःश्वासांची सोबत करावी लागणार नाहीं. जीवनाच्या नाटकाच्या पहिल्या अंकांत इच्छित मनोरथपूर्ती हातीं आली म्हणजे शेवटच्या अंकापर्यंत मुक्या प्रेमाला वाचा फुटण्याचें कारण नाहीं. कमळांत शिरल्याबरोबर भ्रम-राचा गुंजारव बंद होतो. या सुंदर पण मूक पात्रावर कुणाची नजर खिळ-णार नाहीं ?

**नलिनीः**—ही आनंदाची बातमी बाबांना केव्हां सांगेन असें मला झालें आहे.

**अरविंदः**—पण हे पहा, सागर महाशयच आले. ( खादीच्या पोषा-खांत सागर. ) महाभाग, आपल्या जुन्या शिष्याचा प्रणाम घ्या. ( वंदन )

**सागरः**—बाळ, विजयी हो. **शिष्यःप्रकर्षो यशसे गुरूणाम्** ! अर-विंद, तुझा अभिमान कोणाला वाटणार नाहीं ? रावसाहेब गिरीशांना आमचें स्थळ पसंत पडून मंदाकिनीताईनेंही तुमच्याच घरीं देण्याचें मुक्रर केल्याचें समजल्यापासून मी आतां अगदीं वीतचिंत झालों आहे. यापुढें देवसेवा ! व देशसेवा करतांना कसलेंही संसाराचें बंधन आड येणार नाहीं. देवालाच माझी काळजी.

**अरविंद:**—आणि देशालाही तुमची जरूरी.

**सागरः**--बरं, अरविंद, तुझा धंदा आतांपासूनच बरा चालला आहे, तेव्हां पैशावांचून दुसरें ध्येय तुझ्या डोळ्यापुढें आहे असें मी समजूं कां ?

**अरविंद:**--मायदेशाच्या सेवेशिवाय दुसरें ध्येय मी डोळ्यापुढें ठेवलेंच नाहीं.

**सागरः**—देशसेवा म्हणजे सुळावरची पोळी. शब्दांच्या बेजबाबदार बडबडीपेक्षां प्रत्यक्ष कृतीच्या अव्याहत धडपडीलाच मी देशसेवा म्हणतों. वाणी करणी ज्यांची एक तेच खरे देशसेवक. देशसेवेच्या भयंकर दिव्यांत माणुसकीची पारख होते. सगळा हिंदुस्थान आज तरुण पिढीकडे आशेनें बघतो आहे. अलोट पायऱ्यांच्या मार्गानें जाणाऱ्या महात्म्यांच्या सगळ्या उड्या तरुण पिढीच्या जिवावर आहेत. प्रेमाच्या फंदांत पडून देशसेवेची हेळसांड करणारे वाचिवीरच पुष्कळ आहेत. अरविंद, वेळ आली तर देशासाठीं संसारावर पाणी सोडलें पाहिजे. नलिनी, तुझे डोळे पाण्यानें भरून आले, पण वेळ कांहीं सांगून येत नाहीं बाळ.

**नलिनीः**--(डोळे पुसून) बाबा मंडळी जमूं लागली.

**सागरः**--चला तर तिकडे.

## प्रवेश ५ वा.

[ बागेंतील रस्ता. ]

**मधुकरः**--(स्वगत) अक्कलहुषारीनें संसाराच्या मार्गांत मीं संपत्तीची पेरणी तर केली. आतां स्वामिनीची वाट पहात किती काळ बसायचं ? पण लग्नाची बेडी मला झेपायची नाहीं. एकपत्निव्रत तर आपल्याला अगदींच वावडें आहे. आयुष्यांत नेहमीं नाविन्य पाहिजे म्हणजे रुचिवैचित्र्याबरोबर सांसारिक जबाबदारीचा पूर्ण अभाव. पाश्चात्य तरुण या बाबतींत फारच भाग्यवान्! आज बांधलेली लग्नाची गांठ घटस्फोटाच्या कातरीनें उद्यां कापून परवां तिसरी गांठ बांधावयास मोकळेच. आमचा समाज फारच पुराणप्रिय; आणि म्हणूनच आम्ही असें पारतंत्र्यांत खितपत पडणार. (पाहून) अरेच्या, सरलेच्या पाळतीवर हा पोळ कोण आहे बरं ? आनंद तर नाहीं ? छेः! पण त्याची झाली स्वर्गांत रवानगी! कां तोच भूत होऊन आला पुन्हां ? नलिनीचा हात अरविंद धरणारच. पण तोंडाळ वणिच्या तोंडाला तोंड

द्यायचें म्हणजे तोंड फुटण्याचीच पाळी. पोरगी अगदीं फटाकडी आहे. उडवली पाहिजे एकदा. पण वीणेला नाद झंकाराचा. ही सरला मात्र आहे प्रयत्नाच्या आटोक्यांत. यशवंताचा वारसा नांवाचाच ! त्याचें नांवसुद्धां घेत नाहीं ती. पण त्याच्या नांवाच्या आधारावर या नावेंत खुशाल बसावें ! बेवारशी मालावर जगाची सत्ता ! ( सरला प्रविष्ट. )

**सरला:**—(पाहून) हा राक्षस माझ्याच राशीला लागला आहे. याचा एकदां समाचार घेतलाच पाहिजे. मेघाच्या पाहाऱ्यांत कोंडून ठेवलेली वीज शेवटीं मेघावरच कडकडते ! पण याचें परदेशी इमान पैशाला वळणार नाहीं. या बैलाची वेसण जर हातांत ठेवली तरच पुढले बेत साधण्याची आशा.

**मधुकर:**—सरलाताई, अझून मंडळी जमली नाहींत. जरा बसूं या गार हवेंत. ( बसतात )

**कैलास:**--(स्व.)—अरेच्या ही तर मधुकरावर फिदा दिसते. अन् हिच्यासाठीं मी जिवाचं रान करून येथें आलों. आतां या उपटसुंभाचा कांटा काढलाच पाहिजे. पण जर कां या उत्सवांत माझी दाढी कोणीं ओढली तर या आनंदाचा विरस होईल.

( दाढी काढतो व जातो. वीणा व झंकार येतात. )

**वीणा:**—( पाहून ) वा: ! ठीक, ठीक, सरलाताई. (हंसून) अहो डॉक्टर, परस्त्रीशीं एकांत केला म्हणजे गृहिणीही घरांत पाय ठेवीत नाहीं.

**मधुकर:**—पण गृहिणीचा पत्ताही नाहीं अझून.( स्वगत ) वीणे, तुझी तार एकदां खास छेडीन.

**सरला:**—वीणे, अन् दादाबरोबर कसली वेदांताची चर्चा चालली आहे ? लोकांच्या डोळ्यांत तुझें बोट फार लवकर शिरतं अगदीं !

**वीणा:**—आमचं बोलणं अगोदर लोकांच्या डोळ्यावर यायचंच नाहीं. तुझी गोष्ट मात्र निराळी आहे. शिवाय सरदारसाहेब जागे आहेत कुठें ? दोन खांबांवर देहाचा इमला तोलून धरून झोंप घेण्याची अजब करामत आमचे सरदारच करूं जाणोत. या झोंपाळू पुतळ्याशीं मी काय बोलणार ?

**सरला:**--वीणे, तूं सारखी वर्दळीवर कां ग येतेस? कांहीं बोलायची सोय नाहीं, या शिकलेल्या मुलींना. (वीणा छपून जाणाऱ्या कैलासाकडे पहाते.)

झंकारः—( डोळे उघडून ) सरले, झाला कां उशीर, अन् ही वीणा कोठें उधळली वाटतें ?

वीणाः--( पुढें येऊन ) झंकारांना सोडून वीणा कोठें जाणार ? सरदार-साहेब, मी येथेंच आहें. कोठें गेलें नाहीं.

सरलाः--दादा,तुझं वीणेशीं लग्न लागलं आहे ? ( झंकार डोळे झांकतो.)

वीणाः--लागायचं आहे हो सरलावन्सं.

झंकार, मधुकरः--चला, बायकांची जात फारच भांडकुंदळ. ती पहा मंडळी तिष्ठत बसली आहेत. ( जातात.)

कैलासः—(स्व.) सरलेची नजर बाहेर वावरूं लागली आहे. ठीक आहे. या मधुकराची एकादी मख्खी हातांत आली पाहिजे. आतां डाव पडेल तसेंच खेळलें पाहिजे. सरलेच्या प्रेमाशिवाय दुसरा मनाला विषयच राहिला नाहीं. ( दाढीमिशा काढून महाराष्ट्रीय पोषाख घालतो. )

[ पडदा पडतो. ]

( वीणा झंकार, सरला मधुकर, स्थित)

वीणाः—वा ! पाहुण्यांचीच गर्दी मालकाचा पत्ताही नाहीं. आतां तोंड दाबून बुक्यांचा मार. बोलायचं तरी कुणाबरोबर ? आनंद असता तर कर-मणूक तरी झाली असती. सरदारसाहेब, आनंद कुठें फरारी झाला आहे बरं?

झंकारः--जगांतून आनंद नाहींसा झाला कीं काय? (आनंद प्रविष्ट.)

आनंदः--नाहीं. अझून जगांत आनंद शिल्लक आहे.

सरलाः--( चपापून ) दुर्दैव, दुसरें काय ? आनंद मेल्याची वार्ता खोटीच तर.

वीणाः—तुला व तुझ्या कवितेला शंभर वर्षांचें आयुष्य असो. नांव घेतल्याबरोबर हजर.

आनंदः—माझीं शंभर वर्षें मागच्या वर्षींच भरलीं होतीं. अन् कवि-तेचीं लौकरच भरतील आतां.

झंकारः--अगदीं अजब आहेस, तुझा वृत्तांत तरी कळूं दे. तूं गुप्त झाल्यामुळें मागें काय काय प्रकार झाले याची तुला कल्पनाही नसेल. ( सरला झंकाराकडे पाहते. )

**आनंदः**--माझ्या सापत्न मातेच्या मांडीवर आपल्या मुलाला दत्तक देऊन, माझ्या मामानें माझी देहयात्रा काशीयात्रेबरोबर संपविण्यासाठीं मला गंगेंत बुडविलें, व आपले घोडे गंगेंत न्हाले अशा समजुतीनें तेथून पळ काढला. मला मुक्तीच मिळायची त्यावेळीं पण—

**मधुकरः**--अरे वा, खराच कवि आहेस तूं! मग मुक्ति कशी गमावलीस हातची ?

**आनंदः**--एका परदेशी पुंडानें माझ्या दंडाला धरून मला वर काढलें. त्याच्या मुलीला नव्हता वर मिळत ! म्हणून त्यानें मला घातलें घोड्यावर आणि झाला आमचा संसाराचा गाडा सुरू. पण संसाराच्या चढाओढींत बायकाच अगोदर पड खातात, या नियमानुसार आमची परदेशी घरधनीण जी एकदां पडली ती पुन्हां उठलीच नाहीं, आणि जें सांपडलें त्याच्यावर हात मारून मी जो उठलों तो मुंबईच्या रस्त्याला लागलों.

**वीणाः**—आनंदाची ही मुशाफरी म्हणजे कल्पित कादंबरीच आहे झालं.

**मधुकरः**--अगदीं कपोलकल्पित. प्राण गेला तरी अतिशयोक्तीचा अलंकार कवि कधीं अंगावरून खालीं उतरणार नाहीं. हे कल्पनेंतले राजे प्रत्यक्षांत रंकाहूनही कंगाल असतात!

**आनंदः**--वस्तुस्थितीच्या दारिद्र्यांत लोळण्यापेक्षां कल्पनेंतील ऐश्वर्य काय वाईट ? प्रेम, प्रीति, प्रणय–

**मधुकरः**—अरेरे, आधुनिक कविवर्गाची काय ही अवनती ? समाजांत त्यांना कोणी मानीत नाहीं, कीं मासिकांत कोणी पुसत नाहीं. पैशाच्या प्राप्तीचें प्रमाण पूज्य; सुखाचें साम्राज्य कल्पनेंत तरी प्रेमाचें वेड आहेच. धिःकार!

**वीणाः**—मेलेल्या मढ्यांची मुडदेफराशी केली म्हणजे मनसुद्धां मुर्दाड बनतें ! निर्जीव हाडांची चर्चा करावी तुम्हीं; कशाला उगीच करितां भवितव्यतेचें निदान ?

**आनंदः**—निदान कविता कळायला अंतःकरणांत रसिकता तरी पाहिजेच. जन्मांधाला तारांचा नाच दिसायचा नाहीं किंवा बहिरटाल तानसेनाची तान ऐकूं यायची नाहीं. टीकाकारांना कवितेंत फक्त दोषच दिसणार!

**झंकार:**—शाबास, आनंद, शाबास !

**मधुकर:**--प्रेमाच्या बाष्कळ बडबडीचे चार उडाणटपू शब्द काव्याच्या साचांत ओतून त्यावर नैराश्याचा काळाकुट्ट रंग फांसला म्हणजे कांहीं काव्य होत नाहीं. ही नुसती पांचट प्रेमाची पोपटपंची. वेड्यांच्या बरळण्याला काव्य कोण म्हणेल ?

( नलिनी, अरविंद व सागर प्रविष्ट. )

**अरविंद:**--अगदीं कडाक्याचा वाद चाललाय वाटतं !

**वीणा:**--नाहीं, वितंडवाद माजलाय येथें.

**अरविंद:**--कोणकोणते तट पडले आहेत ? कारण कविवर्गात तट, मंडळें, असलींच पाहिजेत.

**मधुकर:**--हे वीणाझंकार आनंदाची साथ करीत आहेत, आणि सगळा मारा चालला आहे--

**वीणा:**--मधुकरावर.

**मधुकर:**—पण मी टोपण नांवाखालीं लढतों आहे. टोपण नांवाच्या ढालेआडून वाटेल ती बाष्कळ बडबड करतां येते. ( सागर उठतो ).

**सागर:**--आपण सर्वांनीं माझ्या नलिनीचा वाढदिवस साजरा केलात. आतां नलिनीचा हात अरविंदाच्या हातीं दिला, कीं, माझे हात मोकळे होतील. मग त्यांत दयाळू सरकारनें जरी हातकड्या घातल्या तरी मी हात-सुद्धां उगारणार नाहीं. ( एक पोलीस येऊन सागरच्या अंगावर हात ठेवतो. )

**पोलीस:**--चलो चौकीपर, तुमकू गिरफदार किया है.

**अरविंद:**--( त्याची मान पकडून त्याला दूर करतो. )

**पोलीस:**—माझ्या अंगाला हात लावाल तर हातांत बेड्या पडतील.

**झंकार:**--अरविंद, मार लाथ त्याला आणि दे घराबाहेर हांकून. कायदा दाखवितो आहे आम्हांला. ( अरविंद उठतो तोंच सागर त्याला खालीं बसवितो. )

**सागर:**--आपला लढा अनत्याचारी आहे.

**पोलीस:**—सरकारी कामाला अडथळा केल्यानें कायदेभंग होतो. कायदेभंगानें कपाळभंग ठरलेलाच. ( झंकार उसळून पोलिसाची मान पकडतो, फौजदार येतो. )

**फौजदारः**--सैतान, काय गडबड आहे, आंत कशाला आलास तूं, चल, हो बाहेर. ( झंकारास ) सरदारसाहेब, या उर्मट उपटसुंभाला सोडा. ( सागरास ) आपणास पकडण्याचा हुकूम झाला आहे. ( वॉरंट दाखवून ) वकीलसाहेब, मी पोटाचा चाकर, डोळ्यावर कांतडें ओढून भलेंबुरें काम करावें लागतें. ज्यांच्या पायांशीं बसण्याची माझी पात्रता नाहीं त्यांना गिरफदार करण्याचें दुर्दैव-( साश्रु ) मी आपला जुना विद्यार्थी, पण पोटाच्या मागें लागून आज माणुसकीलाही महाग झालों आहे. ( नमस्कार करून ) महाभाग, क्षमा करा.

**सागरः**--( त्याला उठवून ) चला, हा मी तयार आहे.

**अरविंदः**--वाः! काय आरोप आहे ? ज्यांच्या मनावर कधीं क्रोधाची छायाही पडत नाहीं, त्यांच्या आगमनानें म्हणे शांतताभंग होतो. मी काम चालवितों, चला.

**सागरः**--न्याय कुणाला मागायचा, अरविंद ? अनत्याचारी असहयोगाच्या वृक्षाला स्वराज्याचें फळ येणारच ! स्वार्थत्यागाच्या दिव्यांतून होरपळून निघाल्याशिवाय स्वराज्याचें सोनें चकाकणार नाहीं. अरविंद, देशसेवेसाठीं सुखावर पाणी सोडावें लागतें.

**अरविंदः**--मग मींही वकिलीवर आजपासून पाणी सोडलें; व परदेशी व्यापाराला पाणी पाजण्यासाठीं परदेशी कपड्यावरही पाणी सोडलें.

**सागरः**—शाबास अरविंद. तुझ्यासारखीं पाणीदार माणसेंच जगाला भूषणास्पद आहेत. देव तुमचें कल्याण करो. चला, फौजदारसाहेब. ( जातात. )

**झंकारः**--स्वराज्याची अविश्रांत खटपट करण्यापेक्षां तिन्ही बाजूला 'आ' वासून धांवणारे समुद्र हिंदुस्थानला गिळून कां टाकीत नाहींत ! हिंदुस्थानावर जर हिमालयाचे कड्यावर कडे कोसळले तर स्वराज्य नको व खटपटही नको. खुशाल समुद्राच्या तळाशीं गाढ झोंप घ्यावी ! मिळायचं असेल तर मिळेल स्वराज्य.

**वीणाः**--पण तिथें आरामखुर्ची कुठली आली आहे सरदारसाहेब ? झोपा काढूनच स्वराज्य मिळतें तर आपले झोपाळू भाईबंद थोडे कां आहेत हिंदुस्थानांत ?

**झंकार:**--आणि तुमच्या धडपडीनें तरी काय होणार आहे ? देवाच्या इच्छेवांचून इकडचें पानसुद्धां तिकडे होत नाहीं. **ईश्वरेच्छा बलीयसी** ।

**अरविंद:**—हा दैववाद म्हणजे शुद्ध नेभळटपणा आहे. प्रयत्नांतीं परमेश्वर हेंच खरें. बरं, चला आतां.

**आनंद:**--काव्याची चर्चा शेवटीं राजकारणाच्या धरपकडींत थांबली ! राजकारण मोठें जबरदस्त दिसतें आहे बोवा. काव्यालाही पकडणार नाहीं ना ?

**मधुकर:**--हो, उधळ वृत्तीच्या शाहीरांनीं इतिहासावर झोड उठविलीच आहे. आतां, लोकमान्य, महात्माजी, देशबंधू, पंडितजी यांच्यावर काव्याचा सगळा मारा खास होणार.

**अरविंद:**--पण यांत वाईट वाटण्याचें कारण नाहीं. राजकारणाच्या पोटांत सर्वांना स्थान मिळतें. राजकारणाच्या सावलीखालीं सर्वांना बसण्याची मुभा आहे. राजकारणाला काव्य कांहीं वावडें नसतें.

**झंकार:**--तुम्ही खुशाल राजकारण करा, किंवा काव्य करा. चालूं द्या तुमचें चऱ्हाट, मी जरा डोळे झांकतों.

**वीणा:**--दिवसांतून किती वेळ आपण जागे असतां ?

**झंकार:**—झाली कां टीकेला सुरवात ? माझ्या झोंपाळूपणावर तुम्ही एवढाले डोळे कां करावेत हें समजत नाहीं.

**वीणा:**--तुम्ही राजकारणाकडे डोळेझांक करितां म्हणून. घरांत पैसा रगड आहे, काम करायला फुरसत आहे, मागें संसाराचा व्याप नाहीं. अशा स्थितींतसुद्धां झोंपेशिवाय दुसरा ध्यास नाहीं म्हणजे काय ? श्रीमंत आळशांनींच तर हिंदुस्थानच्या प्रगतीला खो दिला आहे. सरदारसाहेब, राजकारण करायचें नाहीं अशी राजनिष्ठ शपथ घेतली आहे काय ?

**सरला:**--खरंच; दादा, इतका झोंपाळूपणा कांहीं चांगला नाहीं. वकीलसाहेबांकडे पहा, त्यांनीं देशसेवेसाठीं वकिली सोडली, चैन सोडली, देशाकरितां ते काय वाटेल ते करतील. वेळ आली तर या नलिनीवरसुद्धां—

**नलिनी:**--( दचकून ) सरलाताई, घरीं चल, उशीर नाहीं कां होत आपल्याला. त्यांत काय समजतें बायकांना ? ( सर्वजण उठतात ).

**वीणा:**—उठा, झोंपाळूमहाराज, मंडळी निघाली.

**अरविंद:**—देशसेवेच्या पहिल्या अंकानें सागरांचा बळी घेतला. आतां कोणाकोणावर गदा येते कोण जाणें ! ( पडदा. )

# अंक २ रा.

## ( प्रवेश १ ला )

( अरविंद खादीच्या पोषाखांत सूत काढीत आहे. गिरीश येतो. )

**गिरीशः**--अरविंद, हें काय भलतेंच खूळ तुझ्या डोक्यांत शिरलें आहे ? खादी वापरायची ही भिकार बुद्धी तुला कशी सुचली ? अरे, एक नामांकित होतकरू बॅरिस्टर तूं ; धंदा चांगला नांवारूपाला येत होतास, साहेबलोकांत जरा जानपछान होत होती आणि तूं चरख्यावर बसून सूत काढतो आहेस ? अशानें तुझें माझें सूत जमणार नाहीं ! अरे, सुतानें कां कोठें स्वराज्य मिळतें ?

**अरविंदः**--सुतानें स्वर्गाला जाणाऱ्या माणसांना स्वराज्य कांहीं स्वर्गापेक्षां उंच वाटत नाहीं ! तरुण पिढीच्या कोणत्या नवीन गोष्टीला जुन्या पिढीनें आजपर्यंत खूळ म्हटलें नाहीं ? बाबा, खादीची चळवळ करणारा महात्मा खुळा आहे कां ?

**गिरीशः**—आपल्या अर्ध्या संसारांतून उठून, देशभर दंगल उसळवून, खादीचें खूळ पिकवणाऱ्या वेड्या पिराला कोण शहाणा म्हणेल ? अरे, चांगला संसार करावा, पैसा मिळवावा, नांव कमवावें, चार पोरेंबाळें झालीं म्हणजे मग देशसेवाही करावी; नाहीं म्हणतो कोण ? पेन्शन् घेतल्यावर मीही राजकारणाचा थोडा अभ्यास करणार आहें ! पोरकट पोरांचा पोरखेळ म्हणजे कांहीं राजकारण नव्हे ! राजकारणाला बुद्धी पक्व लागते. तरुणपणच्या हुच्चपणामुळें क्षणभर टाळ्यांची सवंग लोकप्रियता मिळते खरी. पण सरकारी अवकृपेचा शिक्कामोर्तब झालें कीं, जन्मभर पश्चात्ताप करण्याची पाळी येते !

**अरविंदः**--सरकारी कृपेची फिकीर न करणारे, अवकृपेची पर्वा बाळगीत नाहींत ! सत्तेपुढें स्वार्थ गोंडा घोळतो पण स्वार्थत्याग देशभक्तीचा झेंडा रोंवतो !

**गिरीशः**—उतारवयांत परिस्थितीची आंच लागली कीं स्वार्थत्यागाचा प्रवाह कोरडा पडतो ! सकाळीं डौलानें हसणारें फूल दुपारच्या उन्हानें सुकून जातें ! वाढत्या संसाराच्या गुडघ्या एवढया जगाची अन्नान्नदशा झाली म्हणजे डोळ्याला मात्र पूर येतो !

**अरविंदः**—–काल्पनिक संकटांचा बाजार भरवला तर भोळ्या भेकड जीवांची पांचावर धारण बसेल; पण धैर्यशाली अंतःकरणांना मात्र बेसुमार भाव येईल !

**गिरीशः**—–एकदां संकटें धैर्याचा अंत पाहूं लागलीं म्हणजे मी मी म्हणणारे हिंमतबहाद्दरसुद्धां कच खातात, गंगासिंधूंचे प्रचंड ओघसुद्धां वाटेवर घातलेले बांध पाहून संथ होतात ! तूं हें खूळ सोडून दे.

**अरविंदः**—–बाबा, मी स्वीकृत कार्यापासून परावृत्त होणें शक्य नाहीं ! मी परिस्थितीनें दबणार नाहीं बाबा.

**गिरीशः**—अनपेक्षित भेसूर परिस्थितीनें उचल खाल्ली तर स्वीकृत कार्य रसातळाला जाईल.

**अरविंदः**—भेसुर परिस्थिति ? बाबा, परिस्थितीची काय बिशाद ? तिच्या आड टांगलेला अज्ञानाचा पडदा दूर सारा आणि पहा, माझ्या मनांत अणुरेणूचा फरकही होणार नाहीं ! देशसेवा हेंच माझें स्वीकृत व्रत.

**गिरीशः**—–अविचारी तरुणा, तुझ्या पितृप्रेमाचें पांघरुण फाटून जाईल आणि कंगाल विद्वत्तेपेक्षां श्रीमान आळशालाच नलिनीला वर निवडावा लागेल !

**अरविंदः**—पितृप्रेमाच्या फाटलेल्या आभाळाला आपल्या कर्तबगारीचें ठिगळ देण्याचें सामर्थ्य माझ्या मनगटांत आहे. नलिनीच्या अंतःकरणाची मला पूर्ण ओळख आहे. शिवाय तो प्रश्न आमचा आहे.

**गिरीशः**—–पण मंदाकिनीचें अंतःकरण तुझ्या ओळखीचें नाहीं. जा, शांतपणें विचार कर. या चरख्यानें तूं संकटांच्या चरक्यांत मात्र सांपडशील !

[ जातो.

[ पडदा पडतो ]

---

## प्रवेश २ रा.

( स्थळः-मंदाकिनीचें घर. मधुकर प्रविष्ट. )

**मधुकरः**—अरविंदाचा आचरटपणा अजून काकींच्या कानीं आला नाहीं असें दिसतें. ( मंदाकिनी येते. ) सुरुंग भरला पाहिजे.

**मंदाकिनीः**--मधू, तूं घरचा माणूस, तुला सांगायला नकोच. एवढें कार्य होऊन जाईपर्यंत तुला फार जिकीर पडेल. चार माणसें आपल्याकडे यायचीं तेव्हां त्यांच्या बरदास्तीला आतांपासूनच लागलें पाहिजे. घरांत आहे काय, नाहीं काय, होय-नव्हे, सर्व तूंच बघायला पाहिजेस. पैशाकडे मुळींच बघायचें नाहीं यावेळीं. समजलें ना नीट ? शेवटचेंच कार्य हें.

**मधुकरः**--मी आपल्या आज्ञेबाहेर मुळींच नाहीं.

**मंदाकिनीः**--त्यांच्याकडे तयारी अगदीं धूमधडाक्यानें चालली असेल. बरोबरच आहे, पहिलेंच कार्य, तेंहीं आवडतें !

**मधुकरः**--त्यांच्याकडे तर सामसूम दिसत आहे.

**मंदाकिनीः**—म्हणजे काय ? असें होईल तरी कसें ?

**मधुकरः**—कदाचित् दोन्ही अंगांनीं आपल्यालाच करावें लागेल.

**मंदाकिनीः**—चांगलीच बाजू अंगावर आली मग ! पण हें काय म्हणतोस तरी काय तूं मधू ?

**मधुकरः**—बापलेकांचा जरा बेबनाव झाला आहे !

**मंदाकिनीः**—तो कां ?

**मधुकरः**--अरविंदानें वकिली सोडली म्हणून.

**मंदाकिनीः**—वकिली सोडली ? अन् ती केव्हां ? कां सोडली ?

**मधुकरः**—सागर कैदेंत पडले तेव्हां. काकी, अरविंद म्हणजे एक रत्न आहे. फार स्वार्थत्यागी ! देशभक्त ! शाबास त्याची !

**मंदाकिनीः**—कसला कपाळाचा स्वार्थत्याग ! भिकेचे डोहाळे आहेत हे मधू. सगळेंच मुसळ केरांत ! बरें, आतां पुढें काय ?

**मधुकरः**—अगोदरच बापलेकांच्या मतांत जमीन अस्मानाचा फरक ! आतां तर काय, विचारायलाच नको. त्यांचें एकमत व्हायला, रावसाहेबांनीं असहकारितेच्या अस्मानांत उड्डाण केलें पाहिजे, किंवा वकिलानें सह-

कारितेच्या जामिनीवर बैठक मारली पाहिजे ! पण दोन्ही गोष्टी अशक्यच झाल्या आहेत आतां !

**मंदाकिनी:**—बरं, याचा परिणाम काय व्हायचा ?

**मधुकर:**—बाप मुलाबरोबर असहकारिता पुकारील आणि म्हणून म्हणतों कीं, दोन्ही अंगांनीं आपणच कार्य केलें पाहिजे. नको कां ? ( स्व. ) बार तर खूप भरला आहे. आतां सरबत्ती होणार !

**मंदाकिनी:**—मग कार्य अंगावर तरी कशाला घ्या ? आमचें आडलें नाहीं कांहीं. मधू, असले छपन्न बॅरिस्टर नलिनीच्या पायावर लोळत येतील ! आहेस कुठें तूं ? अशी जाऊन ठरलेलें मोडून येतें. माझी नलिनी कांहीं भणंग भिकाऱ्याला बहाल नाहीं करायची ! कसली आली आहे देशसेवा ?

**मधुकर:**—पण तें जनांत वाईट दिसेल ना, काकी ?

**मंदाकिनी:**—पोरीच्या जन्माच्या कल्याणाकरितां जनाचा क्षणाचा वाईटपणा सोसला पाहिजे. आतांच जाते तडक, उगीच घोंगडें भिजत पडायला नको ! [ जाते.

**मधुकर:**—( स्व. ) आग तर पेटली ! आतां या होळींत नलिनी व अरविंद तर होरपळणारच, मग माझ्यासारख्या होळीच्या होळकरांना नलिनीच्या सुखाची होळी करायला काय वेळ ! अरविंदावर लागलेली तिची मानी नजर माझ्याकडे वळत सुद्धां नाहीं अं ! माझ्या अजब करामतीनें काकीला पाणी पाजलें, कीं, नलिनीच्या डोळ्याचें पाणी खळणार नाहीं ! सागर तुरुंगांत, काकी स्वर्गांत आणि अकिंचन अरविंद उघड्या जगांत ! मग नलिनीची दृष्टी माझ्यावरच लागली पाहिजे. फक्त एकदां अरविंदाची व मंदाकिनीकाकींची समोरासमोर अगदीं खडाजंगी उडाली पाहिजे. या खडाजंगीच्या दारूचा संशयी धूर लोकांच्या डोळ्यांत शिरला कीं दृष्टी आंधळी होऊन काकींचा विषप्रयोग अरविंदाच्या माथीं सहज मारतां येईल ! रिकामपणच्या कामगिरींत, सरलेच्या आंगावर हात टाकला तर यशवंत कांहीं माझे हात धरायला येत नाहीं. [ जातो.

[ पडदा पडतो ]

---

## प्रवेश ३ रा.

( स्थलः--वीणेची खोली. )

**वीणाः**—( स्व. ) काय थेरडी हावरट आहे ! पैशाच्या पायांत मरेल एखादे वेळीं ! साठी बुद्धी नाठी झाली कीं, पोराबाळांच्या प्रेमाच्या पाठीं लागते ! करून करून भागल्यावर देवपूजेला कोण नाहीं लागत ? आतां हिची आशाळभूत नजर झंकारांच्याकडे वळली कीं काय ? पण म्हणावें लक्षांत असूं दे, एक वेळ दादाच्या हातांत नलिनीचा हात तूं देणार नाहींस, पण या वीणेचे झंकार मात्र तुझ्या हातीं कधींच यायचे नाहींत ! पण असें तरी कां म्हणून ? आतां जाऊन नलिनीला घालतें घोड्यावर, म्हाताऱ्या थेरड्यांच्या मुरवतीकरितां तरुणांनीं आपल्या प्रेमावर काय म्हणून तुळशीपत्र ठेवायचें !

( अरविंद येतो. )

अहो दादासाहेब, देशसेवेच्या धांदलींत नलिनीचा नाद पूर्ण सोडलांत कीं काय ? करड्या कर्तव्यालासुद्धां निजायला सुखाची शेज लागतेच ! देशसेवा करणारांना प्रेमसेवा कांहीं वावडी नसते. असे हात जोडून स्वस्थ कां बसलां ?

**अरविंदः**—मग काय करूं वीणे ?

**वीणाः**—थोडा रड जरा. अगदींच नेभळट कसा रे तूं दादा ? चांगला विलायतेहून आलास आणि काय करावें हें सुचत नाहीं ? विलायतेंत तरुण जोडपीं या वेळीं काय करतात ? हंसतोस काय असा ? अरे, गुप्तपणें पळून जा. लग्न लावून आलास म्हणजे बसेल ती थेरडी ओरडत ! माझ्यासारखी असती तर केव्हांच त्या म्हातारीचें तोंड बंद करून तिच्या तोंडाला पानें पुसलीं असतीं, आणि ती नलिनीही आहे अशीच मेषपात्र ! चांगला जोडा जमालाय तुमचा ! मी जातें जातीनें आणि करतें तिला तयार. तूंही पुढल्या व्यवस्थेला लाग. उगीच बसूं नकोस माशा मारीत ! ( कानांत सांगते. ) समजलं कां नीट ?

**अरविंदः**--वीणे, तुझे किती आभार मानूं ?

**वीणाः**—आभार राहूं दे, खिशांत. अरे घरांत नलिनीसारखी वहिनी कुणाला नकोशी वाटेल वाटतं ?

**अरविंद**:--भडभड्या स्वभावांत मायेची तडफ आहे तर !

[ पडदा पडतो ]

---

## प्रवेश ४ था.

( स्थल:--नलिनीची खोली. )

**झंकार येतो**:--( स्व. ) माझ्यासारख्या मूर्तिमंत आळसाबरोबर या मंदाकिनीचें काय महत्वाचें काम आहे ? कोण जाणे. तिनें माझा इतका कां घोसरा काढला आहे ? पण घरांत झोप बोकाळली आहे कीं काय ? घोरणें सुद्धां ऐकूं येत नाहीं ! वेडा तर नाहीं मी ? संध्याकाळच्या वेळीं समुद्रावर गेले असतील सर्व. ( पाहतो ) या गच्चीवर अनायासें आरामखुर्चीही आहे, वाऱ्यांत जरा पडावें आतां. ( जातो )

[ मधुकर येतो.

**मधुकर**:--( स्व. ) तिन्ही सांजची वेळ राक्षसी असते असें म्हणतात! राक्षसी कर्तबगारीच्या अभावीं, राक्षसालाही मानवी दुबळेपणा यायचा ! सरलेच्या दारावर मूर्तिमंत मस्तवाल मज्जाव उभा व माझ्यावर तर त्याची करडी नजर ! नलिनी मधुकराला सहजासहजीं वश होणें कठीण! या वीणेची एकदां तार छेडायला मिळेल तर काय बहार होईल. ( पडद्यांत--नलिनी, अग नलिनी--) आवाज तर वीणेचाच आहे. ( वीणा येते.) ( मधुकर दार बंद करतो व बाजूला उभा राहतो.)

**वीणा**:--खोली तर सरलेचीच. मग झाली काय हिची वाट? खालींच बसून वाट पहावी जरा. ( दरवाजा बंद पाहून ) दार कसें बंद झालें हें ? (हंसून) ही खोली जादूनें तर भारली नाहीं ?

**मधुकर**:--( पुढें येऊन ) प्रेमाच्या जादूगारानें नजरबंदी केली कीं, ही खोलीच काय पण ही सुंदर पुतळीसुद्धां भारून जाईल ! वीणे, मी तर अगदीं वेडा--

**वीणा**:--तुमची कां कारवाई, ही मधुकर ? मी काय भ्यालें पण या एकलकोंड्या एकांतांत !

**मधुकरः**--तरुण जीवांना एकांतांत जाण्याची तर तहान लागलेली असतें, मग भिण्याचें काय कारण ?

**वीणाः**--( स्व. ) अरे मेल्या, तुझ्या मनांत कांहीं तरी पाप आलें आहे ! ( उघड ) माझें मात्र पाप उभें राहिलें आतां ! पण तुझें चोरटें पाप तुझ्यावरच उलटेल.

**मधुकरः**—पापाच्या पोचट कल्पना तुझ्या मनांत आहेत ? वीणे, तूं तर चांगली शिकली सवरलेली धीट आहेस. मग धिटाईनें सुखाला भेटण्याचें सोडून, पापाच्या बुरजाआड दडतेस ? प्रेमाच्या नाजूक लढाईत प्रतिपक्षी तर तुझ्यावर हात टेकील ! [ जवळ जातो. ]

**वीणाः**--वीणेच्या अंगाला हात लावायचा अवकाश कीं तेथें झालेच झंकार उत्पन्न ! वीणेचे झंकार जगाला जागे करतील ! वीणा झंकरांची आहे. चल, दूर सर.

**मधुकरः**—झोपाळू झंकार जागा होईपर्यंत माझे हात वीणेवरून इतक्या सफाइनें फिरतील कीं, वीणेच्या तारा माझ्या डोळ्यांतील तारांशीं संगनमत करून, सुखाचे स्वर काढूं लागतील ! वीणे, वेळ पाहून वागावें. मधुकर जसा नलिनीभोंवती घुटमळतो तसा तो वीणेवरही लुब्ध असतो ! ( जवळ जाऊन चुंबन घेणार तोंच— )

**वीणाः**--एक पाऊल पुढें आलास, तर भिंतीवर डोकें आपटून प्राण देईन. नाहीं तर ही बॅटरीच तुझ्या डोक्यांत घालीन.

**मधुकरः**--तुझ्या सुकुमार कौमार्याचे एकदां प्राण घेतले कीं ,जन्मभर तुझा प्राण माझ्या हातीं आलाच!(हात धरतो पण वीणा हात झिडकारते.)

**वीणाः**--माझे प्राण आतां कंठाशीं आले आहेत. ( मोठ्यानें ) झंकार, अहो झंकार, या हो या. हा मेला—

**मधुकरः**--झंकाराला लागली असेल झोप. ( झंकार येतो. )

**झंकारः**—झोप लागलेली मोडली मात्र. ( मधूची मान पकडतो. )

**मधुकरः**—( स्व.) अरे बापरे, हा झोपाळू झोटिंग इकडे कुठें झुकला? आतां आली कंबख्ती.

**झंकारः**—बेशरमी हैवान, लाथेच्या एका ठोकरीबरोबर जगाबाहेर घालवूं, का मान मुरगाळून मुडदा पाडूं ? बोल.

**वीणाः**—मधुकराची मान मोडलीत म्हणजे तुमची झोप मोडली म्हणून मी मनधरणी करीन. ( पाउलें वाजतात. ) नलिनी आली वाटतें.

**झंकारः**--( मधुकराला अर्धचंद्र देऊन ) पुन्हां जर वीणेच्या वाटेला गेलास तर स्वर्गाची वाट पाहावी लागेल ! निर्लज्ज जनावरा, चल जा, हो चालता.

**मधुकरः**—(स्व.) मधुकराचा जीव वाटेवर नाहीं पडला वाटेल त्यानें वाटेल ती वटवट करावयाला. वीणे, तुझ्या तारा तोडल्याच पहा आतां. ( विचार ) हं, आतां रावसाहेबांनाच दम भरला पाहिजे. [ जातो.

(पडदा पडतो.)

---

## प्रवेश ५ वा.

( स्थल—नलिनीची खोली. नलिनी व मधुकर. )

**नलिनीः**--म्हणजे ? म्हणतां काय तुम्ही मधुकर ? असें होईल तरी कसें ? आणि ते आले म्हणजे सांगूं काय त्यांना ?

**मधुकरः**—मी आतां सांगितलें तेंच; काकींचें असें निक्षून सांगणें आहे कीं, अरविंदानें या घरांत पाऊल ठेवतां कामा नये. मग भाषण तर—

**अरविंदः**--(प्रवेश करून)कां बरें? अरविंदानें काय अपराध केला आहे?

**मधुकरः**--वकीलसाहेब, मी काय, सांगितल्या निरोपाचा धनी.

**अरविंदः**—कोण आहे या निरोपाचा धनी ?

**मधुकर**--या घराचा व निरोपाचा धनी एकच आहे !

**अरविंदः**--नलिनीच्या देहाचा व मनाचा धनी मी एकटाच आहें. नलिनीनें आपल्या मनाची मुखत्यारी या घराच्या धन्याकडे कधींही दिलेली नाहीं. घरधन्याची सत्ता घरावर, नलिनीच्या मनावर नाहीं. (मंदाकिनी येते.)

**मंदाकिनीः**—एकाद्या वाटेच्या वाटसरानें घराच्या धन्याच्या सत्तेची सीमा आंखण्यापेक्षां आपल्या वाटेनें गेलेलें काय वाईट!समजलं का देशसेवक?

**अरविंदः**--मंदाकिनीबाईसाहेब, मी वाटेचा वाटसरू नसून नलि-

नीच्या सुखदुःखाचा वांटेकरी आहें! आणि आयुष्याच्या वाटेनें नलिनीच्या प्रेमाला वाट दाखविण्याचें काम माझें आहे.

**मंदाकिनीः**--विजोड विवाहाच्या आडवाटेला लागलेली माझी नलिनी, नीट वाटेवर आणून सोडण्याची सत्ताही पण माझी आहे!

**अरविंदः**--सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं हें खरें; पण कधीं कधीं सत्तेलाही शहाणपणापुढें हात टेकावे लागतात! सिंहीण जाळ्यांत पकडून शिकारी तिच्या छाव्यांना खुशाल पळवून नेतो.

**मंदाकिनीः**--शहाणपणाचा टेंभा या ठिकाणीं मिरवायाला, जग कांहीं ओस पडलं नाहीं!

**अरविंदः**--प्रेमाच्या हिरवळीवांचून नंदनवनसुद्धां ओसाड वाटतें व प्रेमाच्या सहवासांत भिकार झोपडीलाही राजमहालाची श्रीमंती येते.

**मंदाकिनीः**—नुसत्या प्रेमाच्या श्रीमंतीवर संसाराची टोलेजंग इमारत उभारता येत नाहीं! श्रीमंतीच्याच आधारावर संसार सुखाचा होतो.

**अरविंदः**--मग सरस्वतीच्या राजमार्गानें लक्ष्मीच्या रस्त्याला मिळण्याची पात्रता माझ्या अंगीं नाहीं कीं काय?

**मंदाकिनीः**--तुम्हीं देशसेवेचा आडमार्ग पत्करल्यामुळें लक्ष्मीचा राजरस्ता सांपडणार तर नाहींच, पण हालअपेष्टांच्या कांट्याकुट्यांत मात्र पडावें लागेल! माझ्या नलिनीला तुमच्या कंगाल देशसेवेची जरुरी नाहीं!

**नलिनीः**--पण नलिनीला प्रेमसेवेची जरुरी आहे ना?

**मंदाकिनीः**--पोरी! शेंकडों श्रीमान् तरुण देशसेवा सोडून तुझ्या प्रेमसेवेला सादर होतील.

**नलिनीः**--देशसेवा न करणाऱ्या नादान तरुणांची प्रेमसेवा म्हणजे राष्ट्रघातच! आत्याबाई, प्रेमाचें स्थलांतर होत नाहीं! प्रेमाची नजर अढळ असते.

**मंदाकिनीः**---प्रेमाचें पुराण तूं नको मला सांगू.

**अरविंदः**--कंगाल देशसेवकांपेक्षां श्रीमान् देशद्रोहीच आपल्याला ज्यास्त पसंत आहे तर?

**मधुकरः**--देशसेवा न करणारे सर्वच श्रीमान् देशद्रोही नसतात. सरदार झंकार देशद्रोही आहेत काय, बोला!

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ........ नों. दि ..............
वि. .................. क्र. ..................


**मंदाकिनी**:—शब्दांचा कीस पुष्कळ झाला. नलिनी जर तुम्हांला पाहिजे असेल तर वकिली करा व देशसेवेचे वेडे ढंग सोडा, नाहीं तर तुमचा रस्ता मोकळा आहे ! आपल्या रस्त्यानें जा कसे.

**अरविंद**:--पण नलिनी मला रस्त्यानें जावयास सांगत आहे काय ? देशसेवेला प्रेमाचा बळी पाहिजे असेल तर ही माझी तयारी आहे. निवळ लग्नाकरितां मी देशसेवा सोडावयास तयार नाहीं. लग्नाचा प्राण वांचविण्याकरितां मी देशसेवेचे प्राण घेणार नाहीं ! नलिनी, तूं स्पष्ट कां बोलत नाहींस अशा वेळीं ?

**नलिनी**:--आत्याबाई, प्रेमाला श्रीमंती व गरिबी मुळींच दिसत नाहीं. यापेक्षां स्पष्ट काय बोलूं ! माझा भाव अढळ आहे. बाबा नाहीं कां देशसेवा करतां करतां तुरुंगांत गेले ? त्यांचें नाहीं कां नांव झालें जगांत अनत्याचारी असहयोगी म्हणून ?

**मंदाकिनी**:—( नलिनीच्या खांद्यावर हात ठेवून ) नलिनी, घरांत जा, देशाकरतां घरादाराचें वाटोळें करणारा तुझा बाप दीडशहाणा व प्रेमाकरतां संसाराचें वाटोळें करणारी तूं सातशहाणी. जा शांत, अरविंद, चला, निघा येथून.

**अरविंद**:--सागर महाशयसारख्या विद्वान स्वार्थत्यागि देशसेवकाचा शहाणपणा बाहेर काढणाऱ्या आपल्या शहाणपणाची मात्र तारीफ आहे ! वा., आपण सागरांच्या भगिनी.

**मंदाकिनी**:--माझ्या घरांत माझा अपमान मी कधींहि सहन करणार नाहीं. मधू, भय्याकडून या उमेट उडाणटप्पूला बाहेर घालून दे. जा म्हणावं, देशसेवाच करा जा.

**नलिनी**:--( पुढें होऊन ) क्षमा करा, आत्याबाई, मीं याच पायांना परमेश्वर मानलें आहे. ( अरविंदाच्या पायावर हात ठेवते. )

**मधुकर**:—सैतानालाही परमेश्वराचें सोंग आणतां येतें !

**अरविंद**:—हा स्वार्थ बोलतो आहे काय ? ( मंदाकिनी नलिनीला हाताला धरून घेऊन जाते. भैय्या येतो. )

**मंदाकिनी**:--पोरी, घरांत चल. भैय्या याला बाहेर हांकून दे. (भैय्या जवळ येतो. नलिनी व मंदाकिनी जाते. )

**नलिनीः**--( स्व. ) प्रेमळ परमेश्वरा, आपलें दर्शनही आतां अंतरलें.

**अरविंदः**—माझ्या अंगाला हात लावशील तर मरणाला मिठी मारावी लागेल. चल, हो दूर. ( स्व. ) प्रेमाचा बाजार आटपला. आतां तुफान दर्या भरलाच आहे.

**मधुकरः**--अरे, तूं अनत्याचारी असहयोगी ना ? देशसेवेचें उसनें अवसान कशाला आणतोस ? या देशसेवेच्या नाटकाचा शेवटचा अंक, तुझ्याच शेवटाबरोबर होईल, लक्षांत ठेव.

**अरविंदः**--अरे जा, प्रबल सामर्थ्यवान सत्तेशी असहकारिता करायची तुझ्यासारख्या माकडाबरोबर नाहीं-

**मधुकरः**--चल, हो बाहेर. ( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ६ वा.

( सरलेचें घर. यशवंत बाहेर निघण्याच्या तयारींत. )

**सरलाः**--या संशयी ससेमिऱ्यानें सळो का पळो केलें आहे. आतां कुठें जायची देखील चोरी ! मागें आपला शनी आहेच उभा ! उभाउभीं जाऊन येण्याची सुद्धां चोरी.

**यशवंतः**--कुठें भटकावयाचें असतें सबंध दिवसभर ?

**सरलाः**--कुठें म्हणजे ? वीणेकडे. लग्नाचें थोडें कां काम असतें ?

**यशवंतः**--लोकांच्या होणाऱ्या लग्नांत काम करतेस, पण स्वतःचें झालेलें लग्न बिघडतें आहे ना ? त्याची काय वाट ?

**सरलाः**--रात्रीं डोळ्यांत तेल घालून रात्रभर खडा पहारा असतो. मग दिवसा तरी सोडवणूक नको का जर ? आतां कांहीं मरेपर्यंत गळ्याला लागलेली तात सुटत नाहीं ! मग कां भाजाकार ? सारखी राखण कशाला ?

**यशवंतः**--हा कैलास राखणीला आहे म्हणून बरें, नाहीं तर दिवसाढवळ्या तूं एकाद्याचा हात धरून जाशील निघून !

**सरलाः**--रात्रींबेरात्रीं घराबाहेर तुम्ही एकांतांत कुणाचा हात धरीत नसालच अगदीं !

**यशवंतः**--पण मी पुरुष आहें, ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति । ' स्त्रियांनीं पातिव्रत्य पाळिलेंच पाहिजे असें धर्म सांगतो.

**सरला**:--आणि पुरुषांनीं एकपत्नीव्रत उधळून लावलें पाहिजे असेंही धर्म सांगत असेल नाहीं ?

**यशवंत**:—शब्दानें शब्द वाढायला नको. ( स्व. ) बाहेर जाण्याचें निमित्त करून एकदम कैलासाची परिक्षा घ्यावी आज. ( उघड ) कैलास.

**कैलास**:--जनाब, फर्मायिये.

**यशवंत**:—घरांत जाणारायेणारावर डोळा असूं दे. तुझा जरासा डोळा लागला तर दुसऱ्यांना डोळे मिचकावून, तुझा डोळा चुकवून निघून जाईल. मग डोळे फाडून कांहीं उपयोग होणार नाहीं ! सगळीकडे नजर असूं दे, जातों मी. [ जातो. ]

**कैलास**:—जिच्या नजरेंत भरून संसारसुख सेवायचें तिचेंवरच नजर ठेवायचा प्रसंग आला आहे ! सरला माझ्या नजरेला नजर भिडवते आहे. आतां सोंगाची नजरबंदी कुठली चालायला ?

**सरला**:—( स्वगत ) हा माझी नजर चुकवतो आहे. माझा तर्क कांहीं चुकला नाहीं. प्रेमप्राप्तीच्या मार्गांत चुकलेले फकीर नेहमीं प्रेममूर्तीच्या मशिदींतच सांपडायचे ! अरविंद माझ्या या परधनाला हृदयाशीं धरतील कां ? या कैलासाला जवळ केला कीं, घरांतच दिवसाची रात्र करायला हरकत नाहीं ! अरविंदांचें मला वेड लागलें आहे तर आनंदाला माझें वेड लागलें आहे;शिवाय मधुकराचें उल्लू मन माझ्याभोंवतीं घिरट्या घालीतच आहे. अनुमतीच्या एका होकाराबरोबर, अनीतीचा सैतान देहावर थैमान घालूं लागेल ! पण-वृद्धकुमारीविवाह ही नीती कीं अनीती ? जें स्वार्थी जनांनीं पटल्याचा बहाणा केला तें प्रेम-वेड्या मनाला कसें पटावें ? मंत्राक्षतांच्या जोरावर व मंगलाष्टकांच्या पोपट-पंचीनें बांधलेलें मंगलसूत्र जर गळफांस होऊं लागलें तर तें तोडून टाक-ण्यांत धर्म होईल कीं अधर्म ? हा धर्माधर्माचा बागुलबोवा फक्त बायकांच्या डोक्यावर ! पुरुषांनीं एक सोडून दहा लग्नें केलीं तरी तो धर्मच त्यांची गांठ बांधतो ! घरच्या लग्नगांठीला, बाहेरच्या शंभर अंगवस्त्रांची गांठ मारली तरी तो धर्म डोळा वर करून पहात नाहीं ! एकदां सोडून दहादां त्यांचें पाऊल वांकडें पडलें तरी धर्माची त्यांच्याकडे वांकडी नजर होत नाहीं. पण बुढ्या नवरदेवाच्या गळ्यांत बांधलेल्या पोरसवदा जीवानें जरा

इकडे तिकडे नजर फेंकिली कीं त्याची जमा अधर्मात होते ! थेरड्या नवरदेवाच्या पिळपिळीत व पोचट प्रणयचेष्टा न आवडून त्याच्या तरण्या बायकोनें जर दुसऱ्याचा नुसता विचार मनांत आणला तर तें पाप होतें ! (विचार करून )पाप आणि पुण्य! हे नुसते कल्पनेचे खेळ आहेत! प्रेमाच्या खेळांत जर पापपुण्याचा जीव गेला तर त्याला जबाबदार समाजाची निर्दय नव्हे ! तारुण्याच्या ओठ फुटलेल्या राज्यांत पाप-पुण्याच्या विचारच नको ! विलायती समाजांत वावरलेले अरविंद माझ्या अयाचित प्रेमाची पायमल्ली करतील असें वाटत नाहीं ! कावेबाज मधुकराला नुसताच झुलवला पाहिजे. आनंदालाही ओळख देऊन उपयोगी नाहीं ! वीणा आली वाटतें ? ( जाते ) ( पडद्यांत, सरलाताई-कैलास वाटेंत उभा असून यशवंत रस्त्यावरून पाहात आहे. वीणा येते. )

**वीणा:**—भैय्या, असा धटिंगणासारखा वाटेंत काय उभा राहिला आहेस ! बघतोस काय असा रोंखून, कुणी चोर आहें कीं काय मी ? सोड वाट.

**कैलास:**—भीतर जाना मना है, बाईसाहाब.

**वीणा:**—कां ? बाईसाहेब घरांत नाहीं कां ?

**कैलास:**--है, लेकिन मालिकका हुकम नही है.

**वीणा:**—अरे जा, मालिकका हुकमवाला. दूर हो.

**कैलास:**—नही बाईसाब.

**यशवंत:**--कैलास, वाट सोड. ( वीणा जाते. ) ( स्व. ) सच्चा नोकर आहे. पुरुषांनाच काय पण स्त्रियांनासुद्धां रोखतोय. ह्याच्या जिवावर निश्चिंत रहावें. ( पडदा उघडतो. वीणा व सरला येतात. )

**वीणा:**--सरलाताई, कुठला हा रांगडा रंगरुट दारावर ठेवलाय ? बरें, तें एक असूं दे मेलं-

**सरला:**--इतक्या उन्हाची ग कुणीकडे वीणे ? जरा गडबडींत आहेस वाटतें ?

**वीणा:**--काम आहे जरा गडबडीचेंच, पण त्याची बडबड मात्र करूं नकोस कुठें. हें बघ, एवढें पत्र दे नेऊन नलिनीला गुपचुप. फार गुप्त आहे बघ. करशील ना एवढें काम तूं !

**सरला:**—अग हो. त्यांत काय आहे मोठेंसें निघालेंच हीं.

**वीणा:**—माझा जीव आतां खालीं पडला ! या पत्रावर दोन जीवांचें भावी सुखदुःख अवलंबून आहे; म्हणून म्हणतें जरा तुझ्या जीवाची तारांबळ झाली तर होऊं दे. नलिनीनें अगदीं जीव काढून ठेवला असेल त्या पत्राकरितां. दादाला तिथें जायची चोरी मी—

**सरला:**—तूं कां नाहीं गेलीस मग ?

**वीणा:**—सरलाताई, त्या मधुकराशीं एकटी बोलत जाऊं नकोस बरें ? त्या डोमकावळ्याची नजर फार वाईट आहे. काल या वीणेच्या जिवाच्या ताराच तुटणार होत्या ! बरं, जाऊं मी ? पत्र आतांच्या आतां नेऊन दे, बरोबरच चल माझ्या.

**सरला:**—तूं अगदीं निर्धास्त ऐस. पत्र दिलेंच म्हणून समज. घरीं यायची वेळ झाली आहे आतां. तेव्हां—

**वीणा:**--मग जातें बाई मी. [ वीणा जाते.

**सरला:**--( पत्र वाचून स्वगत ) हें भांडण माझ्या पथ्यावरच पडलें. अंधारांत अनायासें सरलाच अरविंदाना भेटली, तर नलिनीच्या गैरहजिरींत ती त्यांना आवडणार नाहीं थोडीच ! नगाला नग असल्यावर प्रेमाचा सौदा ठरायला वायदा कसला ? हो, असेंच करावें. घरच्या प्रेमाला पहिला रामराम आज. देवा, माझं मन मला आवरत नाहीं !

[ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश ७ वा.

( मंदाकिनीचें घर. मधुकर व मंदाकिनी. )

**मंदाकिनी:**--मधू, काल झंकार आले होते म्हणतोस, मग जरा त्यांना बसवून कां नाहीं घेतलेंस ? मीं त्यांना सुद्दामच बोलाविलें होतें.

**मधुकर:**--आणि आज सरलाताईनाही बोलाविलें आहे कीं काय ?
(मधुकर जातो. सरला येते. )

**मंदाकिनी:**--सरले, ये, बरी आलीस. तुझ्याशीं जरा बोलायचें आहे. अरविंदानें काय गुण उधळले हें तुला माहीतच आहे. बरें झालें, मी

त्याच्या नादाला लागलें नाहीं. माझी नलिनी चांगली खानदानीच्या सरदार घराण्यांतच पडायला पाहिजे. तूंच सांग हो कीं नाहीं? सांग.

**सरला:**—अगदीं बरोबर. काकी, देशसेवेचे आणि खादीचे नाहीं नाहीं ते चाळे आपल्याला कशाला? असल्या पोरकट फंदांनीं पोरीचें मात्र कपाळ फुटायचें! बरं, दुसरें कोणतें स्थळ शोधलें आहे आतां? एकादा अधिकारी किंवा——

**मंदाकिनी:**—अग तुमचेंच घर. झंकार–नलिनीचा जोडा कसा अगदीं योग्य दिसेल. विचारशील का तूं त्यांना? आपली गोष्ट काढून ठेव तूं. मग मी घालीन गळ त्यांना.

**सरला:**--मग काय सोन्याहून पिवळें. लग्नाच्या बाबतींत मुलींनीं कशाला हट्ट धरून प्रेमाचें बंड माजवावें!

**मंदाकिनी:**--हां, कशी बोललीस; जरा नलिनीला शिकव अक्कल! प्रेमसेवा काय करते, देशसेवा काय म्हणते, सगळाच बडबयावोळ! सरले, या पोरवयांत तुला किती पोक्तपणा आला तरी? अन् संसारही चाललाय अगदीं सुखांत. कांहीं कमी आहे कां तुला? दागदागिने, कपडेलत्ते, शिपाईप्यादे. शिवाय हौस पुरवायला नवरा तयार!

**सरला:**—( स्वगत ) फक्त प्रेमाचाच दुष्काळ!

**मंदाकिनी:**--आतां चार पोरेंबाळें झालीं कीं, गंगेंत घोडे न्हाले! शिवाय यशवंतराव तुला तळहातच्या फोडाप्रमाणें वागवितात. तसें त्यांचें वयही फार नाहीं. तूं नाहीं कधीं प्रेमाकरतां उरस्फोड केलीस! तुझ्या अंगांत थिल्लरपणा कसा तो नाहींच! कुठें आडलंय तुमचें प्रेमावांचून? जरा नलिनीची समजूत घाल. जा, आणि हें बघ, मनाला थोडा विरंगुळा पडावा म्हणून मी उद्यांच लोणावळ्याला जाणार आहे बरं; झंकारांच्या जवळ एवढी गोष्ट काढून बघ. बैस जरा. नलिनीला पाठवितें इकडेच.

( मंदाकिनी जाते. )

**सरला:**—( स्वगत ) स्वार्थी प्रेमाकरितां लोकांच्या सुखावर आग पाखडावी कां? पण जगांत तरी स्वार्थाचाच बाजार नाहीं कां भरला? जगानें कांहीं स्वार्थसंन्यास घेतलेला नाहीं! म्हाताऱ्या प्रेमाकडे पाठ फिरवून नव्या

प्रेमामागें धांवण्यांत धर्माचा खून झाला तरी प्रेमसेवा तरी होईल. चला, आतां निराळी भूमिका. ( नलिनी येते. ) नलिनी, आतां कोणत्या तोंडानें तुझें समाधान करूं ? तोंडाशीं आलेला सुखाचा घांस, विघ्नांच्या राशींनीं ग्रासल्यामुळें तोंड फुटायची पाळी आली. तुझ्या प्रणयभंगाचें दुःख वाटतें पण अरविंदाच्या देशसेवेचें कौतुक वाटतें ! जनतेच्या सुखाकारितां जनानें दुःख भोगलें तर जनार्दन प्रसन्नच होईल ! देशसेवेच्या देवाला, जर प्रेमाचा हा पाहिला डाव दान दिला, तर बेफिकीर राजकारणाचा डाव रंगाला येईल ! प्रेमाच्या पायावर उभारलेल्या व्यक्तीच्या संसाराची इमारत कळसापर्यंत पोंचतेंच असें नाहीं ! पण प्रेमाच्या पोटावर पाय देऊन स्वार्थत्यागानें उभारलेली राष्ट्रसंसाराची इमारत मात्र खात्रीनें स्वराज्याच्या कळसापर्यंत पोंचेल. नलिनी–

**नलिनीः**—त्यांच्या देशसेवेच्या आड येणें पातक होईल कीं काय एवढीच भीति वाटते ? एकीकडे देशसेवाभंगाचें पातक तर दुसरीकडे प्रेमाशीं प्रतारणा ! ( कानांत सांगते. ) माझ्या संमतीवर त्यांची आशा टांगली आहे. आज रात्रींच जायचा आहे. पण काय करावें तेंच सुचत नाहीं ! एकदां वाटतं जावं, एकदां वाटत नाहीं ! काय करावं ?

**सरलाः**—काय पळून ? नलिनी, वेडी आहेस तूं. पोक्त विचाराला पुढलीं संकटें अगोदर दिसतात ! पोरकट उतावळेपणाची संकटाशीं ओळखच नसते. अगोदर या विलायती पद्धतीला आपल्या समाजांत नाहीं मान. मग आत्याबाईचा आधार तुटलाच. शिवाय सागर तुरुंगांत. पैशाच्या अभावीं प्रेमाचा पांगूळगाडा होऊन दारिद्र्याच्या दगडाधोंड्यांतून रखडण्याची पाळी येते ! प्रेमाच्या नव्या नवलाईची नाव, दारिद्र्याच्या दर्यांत तेव्हांच उपडी होते व प्रेमासकट संसारांतून मात्र उठावें लागतें ! तुझा हा विचार म्हणजे निव्वळ अविचारच ! नलिनी, हा विचार तूं सोडून दे. गुप्तपणें पळून जाणं म्हणजे निंदेला बोलावणंच पाठवायचं !

**नलिनीः**—पण वीणा तर सारखी मागें लागली आहे.

**सरलाः**—वीणा म्हणजे एक अल्लड पोर. धीर धरून गंभीरपणानें होणारें काम, उतावळ्या बावळेपणानें नासून मात्र जातें. एवढी लाट ओसरली म्हणजे तुझें तुलाच समजेल कीं, प्रियकराबरोबर पळून जाण्यांत फायदा

नाहीं, आणि देशसेवाभंगाचें पातक प्रेमभंगापेक्षां फारच भयंकर. शांतपणें विचार कर. बरं, मला उशीर झाला, येतें आतां ? (जाते.)

**नलिनीः**—( स्वगत ) नाथ, क्षमा करा. देशसेवेच्या वाढत्या वृक्षावर प्रेमाच्या कुऱ्हाडीच्या घाव घालण्यापेक्षां प्रेमसंन्यासानेंच जनस्वरूप जनार्द-नाची प्रेमसेवा करणें काय वाईट ? वीणेपेक्षां सरलेचाच सल्ला पोक्त ! हो. असंच करावं तर; ठरला निश्चय. ( जाते. पडदा पडतो.)

---

## प्रवेश ८ वा.

( स्थळ-बाग. अंधारांत अरविंद उभा. )

**अरविंदः**—( स्वगत ) नलिनी ठरल्यावेळीं यावयास चुकली काय ? ( नलिनीच्या वेषांत सरला येते. मागें छपत छपत आनंद येतो. ) नाहीं, हा पहा माझा प्राण आलाच. ( जवळ जातो. ) प्रेमळजीवा, नलिनी–

**आनंदः**—(एकीकडे) हें काय नवेंच कुलंगडें!सरला अभिसारिका होऊन कोणत्या रमणाला रमवायला आली आहे ? सर्व कांहीं हेरून ठेवलेंच पाहिजे.

**अरविंदः**—मंदाकिनीच्या भोवऱ्यांत गिरक्या घेणारी नलिनी सुटली, आणि ती आतां या अरविंदाच्या हातीं पडली. चल, आतां काळजी करूं नकोस. ( हातांत हात घेतो. ) मनाचें मीलन झालें तरी मंगलाष्टकांच्या माळेंत गुंफलेल्या मंगलाक्षता एकदां आपल्या मस्तकावर पडल्या कीं, मंदा-किनीबाईच्या कपाळीं वाटण्याच्या अक्षदा पडणारच. तोंपर्यंत मीं जर नुसती तोंडमिळवणी केली तर त्याची पापांत जमा होईल कां ? स्त्रियांना ( सरला अंधारांत तोंड लपवितें. ) पुरुषवेष फारच खुलून दिसतो. ( अरविंद सर-लेचा फेटा काढतो, उजेडांत येतो, व अरविंद हात सोडून देऊन दचकून मागें सरकतो.) कोण, सरलाताई, हा काय घोटाळा झाला बरं? क्षमा करा, सरलाताई, मला वाटलें कीं—

**सरलाः**—नलिनीच आली.

**अरविंदः**—हो, कुणी बरें केला घोटाळा ?

**सरलाः**—हा घोटाळा नसून मनाला घोटाळ्यांत पाडणारे प्रेमाचे खेळ आहेत. अरविंद, विश्वासघातासारखें दुसरं बालक नसेल जगांत. आपला विश्वासघात करून नलिनीनें दादाचा विश्वास संपादण्यास सुरवात केली

आहे. आपली प्रेमयाचना नलिनीनें निष्फळ केली. आपल्याशीं प्रतारणा केली. आपल्याला उगीच नादीं लाविलें.

**अरविंदः**—नलिनी आणि विश्वासघात ही गोष्ट कालत्रयीं शक्य नाहीं.

**सरलाः**--शक्याशक्यतेला त्रिकालांची बाधाच होत नाहीं ! जन्मभर अशक्य वाटणारी गोष्ट एका क्षणांत होऊन जाते, तर क्षणभर शक्य वाटणारी गोष्ट उभ्या जन्मांत घडून येत नाहीं. भूकंपाच्या एकाच धक्यांत पर्वत रसातळाला जातो तर दुसऱ्या धक्यासरशीं बेट सागरांतून वर डोकावूं लागतें ! क्षितिजाच्या मध्यस्तीनें क्षणभर तोंड मिळवणीचा आव आणणारी दुनिया जन्मभर अस्मानाच्या हातीं लागत नाहीं. प्रेमाच्या कोषांत शक्या-शक्यतेच्या अर्थाची वाटेल तेंव्हां उलटापालट होते.

**अरविंदः**--माझा यावर विश्वासच बसत नाहीं. नलिनीचें माझ्यावर फार प्रेम आहे.

**सरलाः**--पण प्रेम पैशाचें पाठीराखें असतें. प्रेमाची इमारत दारिद्र्याच्या पायावर उभी रहात नाहीं. प्रेमाला पैशाची आवड असते.

**अरविंदः**--पण नलिनीला प्रेमाच्या संपत्तीची आवड आहे. संपत्तीच्या प्रेमाची नाहीं.

**सरला**—भोळी पुरुषांची जात ! त्यांना स्त्रियांचीं कारस्थानें कशीं कळणार ? स्त्रीचरित्र गहन आहे अरविंद.

**अरविंदः**—होय, त्याचा मला अनुभव येतच आहे आतां. बरं, सरलाताई, मग ही अदलाबदल कशी झाली. तुम्ही कशा येथें आलांत नेमक्या वेळीं ?

**सरलाः**--नलिनीनें सांगितलें म्हणून. ती गेली दादाकडे आणि मी आलें इकडे. काय, अझून आपला विश्वास बसत नाहीं.

**अरविंदः**—बस्स, पुरे झाली प्रेमाची आशा. प्रेमाचा व्यापार सुरूं केला हीच चूक झाली. देवा, देशसेवेच्या गंगेंत पुनीत व्हावयास मी आतां मोकळा झालों. व्यर्थ प्रेमाच्या फशीं पडलों.

**सरलाः**—अरविंद, अयाचित प्रेमाच्या भांडवलावर संसासुखाचा व्यापार वाढणार नाहीं कां ? कशाला आतां उगीच वेड पांघरतां ? माझ्या प्रेमाची

दौलत मी आपल्या पायांवर वाहिली आहे, आतां तरी नलिनीच्या मृत प्रेमाची कंगाल आशा सोडाल कीं नाहीं ?

**अरविंद:**—मुळींच नाहीं. प्रेमाचे फंद पुरे झाले आतां. चला, सरला·ताई, तुम्हाला प्रथम घरीं पोंचवितों आणि मग धरतों सरळ देशसेवेची वाट.

**सरला:**—जीवितेश्वर, नलिनीनें आपल्याला पूर्ण निराश केलें तर आपण मला कां बरं आशा दाखवूं नये ?

**अरविंद:**—कुठलं तर्कशास्त्र हें ? सरलाताई, हा तुमचाच गृहिणीधर्म आहे कां ? प्रेमाच्या मादक निषेनें बेफाम होऊन तुम्हीं पापपुण्यावर पाणी सोडलें काय ? ज्या गोष्टींचा विचारसुद्धां करवत नाहीं त्यांचा उच्चार करावयास तुम्ही कचरत नाहीं. खरोखर, स्त्रीचरित्र गहन आहे. !

**सरला:**--गृहदेवांनीं धर्म सोडला कीं गृहीणीधर्माला पाय फुटायचेच. सुखसागर, आपल्याला पाहिल्यापासून मी वेडी झालें आहे. माझी सेवा घेणार ना ?

**अरविंद:**--कुठल्या नरकाची तयारी करीत आहांत तुम्ही अशा अमंगल विचारांनीं ?

**सरला:**--प्रेमाच्या सुखस्वर्गांत विहरतांना काल्पनिक नरकाची स्मृतीही दुःसह वाटते.

**अरविंद:**--अरेरे, विषयाची जहरी सुरी पातिव्रत्याच्या उरीं मारून घेणारी व्यक्ती कोणाला प्रिय वाटेल !

**सरला:**—(जवळ जाऊन) वेदांताच्या प्रवचनापेक्षां प्रेमाचें पुराण गोड नाहीं कां ? अरविंद, प्रेमाला पारख्या झालेल्या या वेड्या जीवाला प्रेमाची भिक्षा घाला; या प्रेमवेड्या अभागिनीला प्रणयाचें दान द्या. प्रेमाच्या प्रकाशापुढें मला पापाचा अंधार दिसत नाहीं. सुखसागर ! मला दूर लोटूं नका. ( पायाला मिठी घालते. )

**अरविंद:**—( स्वगत ) जरठबालाविवाहाचीं दारुण फळें असलींच किडकीं असायचीं ! यांत या प्रेमवेड्या जीवाकडे काय दोष ? (उघड) सरले, पायांची मिठी सोड. उठ.

**सरला:**—हातांची मिठी पडणार असेल तरच या पायांची सोडीन. नाहीं तर नाहीं.

**अरविंदः**--या मगरमिठीनें तुझ्या मनांतले मनोरथ मावळतीलच; पण तुझा भाग्यसूर्यही मावळेल.

**सरलाः**—माझा भाग्यसूर्य माझ्याजवळच उभा आहे. मी मिठी सोडणार नाहीं. कल्पांतापर्यंत अशीच बसेन.

**अरविंदः**--( स्वगत ) पायाला विळखा घातलेल्या सुंदर पण अभागी जीवाची मिठी सोडवूं कां नलिनीची आशा सोडूं ? चालून आलेल्या अनाथ गृहलक्ष्मीला लाथाडूं कां पळत्या प्रेमाच्या पाठीमागें लागूं? हक्काच्या प्रेमावर लाथ मारून दुसऱ्याचे पाय धरणारी सरला अस्सल कीं श्रीमंत मनाच्या आळशी देहाची राणी होऊं पाहणारी नलिनी कमअस्सल ? सरलेनें म्हाताऱ्या नवऱ्याला टाकून माझा नवा हात धरला तर नलिनीनें माझ्या कंगाल हाताला दूर लोटून झंकाराचे श्रीमंत हात धरले. तेव्हां मी अभागी कीं झंकार भाग्यवंत ? ( उघड ) बस्स झाला विचार. परस्त्रीच्या नुसत्या अभिलाषानें सोन्याची लंका खाक झाली, मग परस्त्रीच्या पापी स्पर्शानें सोन्यासारख्या शीलाची कां राख होणार नाहीं ? पायांपाशीं पडलेलें हें पापी सौंदर्य टाकून सरले, ही पहा, अरविंदानें देशसेवेच्या गंगेंत उडी घेतली. ( जाणाऱ्या अरविंदाचा हात पकडून सरला उठते.)

**सरलाः**—( स्वगत ) शाबास, अरविंद शाबास, खरं रत्न आहेस तूं. पण आतां चवदावें रत्न दाखविल्याशिवाय माझं काम भागणार नाहीं.(उघड) माझ्या प्रेमाची केविलवाणी हांक तुम्हाला ऐकूं आली नाहीं, पण एक मोठ्यानें हांक मारून जर हें निद्रिस्त जग मी जागें केलें तर मात्र तुमच्या सुखाची जन्मभर हांकाहांक होईल. माझ्या प्रेमयाचनेला मुकाट्यानें मान देतां कीं माझ्यावर बळजोरी करण्याच्या आरोपांत आपली मान अडकवितां ? बोला, करूं आरडाओरडा ? माझ्या हांकेनें तुमच्या अब्रूचें वाटोळें होईल. अबलांची मानभावी हांकसुद्धां दुसऱ्याचें नांव विनाकारण बद्दू करावयास पुरेशी आहे. बोला, ओरडूं ?

**अरविंदः**--( हात सोडवून ) खुशाल ओरड. मेघगर्जनेनें भेकड जनावरें सैरावरा पळतील; पण सिंहाला त्याची फिकिरही नसते.

**सरलाः**—पण त्याच मानी सिंहाचा कपाळमोक्ष विद्युत्पातानें होतो.

पहा. त्या चपलेचा प्रभाव आतां ! ( मोठ्यानें ) धांवा हो धांवा, हा पहा कोणी दुष्ट माझ्यावर बळजोरी करीत आहे, धांवा हो धांवा. ( पडद्यांत गडबड होऊन पावलें वाजतात. आनंद येतो )

अरविंदः—खुशाल ओरड. माझ्या पवित्र शीलासाठीं मी जीवाचाही बळी देईन.

आनंदः—क्या है, कोन है ? तुम चलो ठानेपर. ( अरविंदास धरतो )

सरला—मोठ्यानें—हा पहा माझ्यावर—

आनंदः—चूप रहो, बदफैली, (अरविंदास)तुम्ही भले गृहस्थ दिसतां. येथें गर्दी होण्याच्या अगोदर तुम्ही येथून निघून जा कसे. ठाण्यावर नेऊन मी या बाजारबसवीची जबानी घेतों. ( आनंद दाढी काढतो सरला चपापते. अरविंद जातो )सरले, तुझे सर्व चाळे मी पाहिले आहेत.तुझ्या सुखदुःखाची किल्ली आतां माझ्या हातांत आहे.

सरलाः-(स्वगत) मानी अरविंदाचा सूड घेण्यासाठीं आतां झांकली मूठ सव्वा लाखाचीच ठेविली पाहिजे.प्रेमवेड्या आनंदाच्या जरा तंत्रानें घेतलें म्हणजे सगळाच कार्यभाग उरकेल. (प्रकाश ) आनंदावर माझें प्रेम—

आनंदः—होतें पण आहे कीं नाहीं याची शहानिशा झाली पाहिजे. तूं तर आतां अगदीं ताळ सोडला आहेस. मधुकर तुझ्याभोवतीं घिरट्या घालतोच आहे तर तूं अरविंदावर फिदा; शिवाय माझ्याशीं प्रेमाच्या गप्पा मारतेच आहेस.घरीं मात्र नांवाचा नवरा आहे. सरले, स्त्रीचरित्र गहन आहे. सांग बरं, माझ्यावर प्रेम आहे ना ?

सरलाः—पण या प्रकरणाबद्दल वाच्यता—

आनंदः—छे, या कानाची गोष्ट त्या कानालासुद्धां कळायची नाहीं.

सरलाः—नाहीं तर कान उपटून हातांत देण्याचा प्रसंग येईल. बरं, चांगले लांब आहेत.

आनंदः—तुझा थिल्लर स्वभाव अझून कायमच आहे. तुझ्या सौंदर्याला भुलून वाटेल तें करीन व तें केवळ आतां एकाच आशेनें.

सरलाः—मग आतां आपण निराश कां झालांत ?

आनंदः—नैराश्याशिवाय कविता होत नाहीं म्हणून.

सरलाः--मग त्या काव्याचा स्वाद केव्हां मिळणार ?

आनंदः--वाः, कवीला रसिक मिळताहेत कुठें आतां ? पण तुला नीट कडेकोट बंदोबस्तांत ठेविलें पाहिजे. नाहीं तर हें स्त्रीधन वाटेचा लुटारू खुशाल लुटून नेईल.

सरलाः—आनंदाच्या छातीचा कोट माझ्या अंगावर नीट बसेल नाहीं कां ? ( स्वगत ) आतां चांगली साखर पेरलीच पाहिजे. ( उघड ) मला कितीतरी सांगायचं आहे.

आनंदः—चल तर घरीं.

[पडदा पडतो.]



# अंक ३ रा.

## प्रवेश पहिला.

( स्थलः-यशवंताचें घर. कैलास प्रविष्ट. )

**कैलासः**-( स्वगत )कवितेच्या पायीं प्रेमाचें वेड लागलें आणि प्रेमाच्या वेडांत सरलेच्या फशीं पडलों ! कवितेच्या पैशावर पोट भरेल म्हणून पोटाची विद्या सोडून दिली; पण पैशापासरी सवंग कवितेला आज विचारतोय कोण ? कवितेवर पोट भागेना म्हणून पोटाची खळगी भरण्याकरितां ही बैठी नोकरी पत्करली. बघावें आतां पैशाबरोबर प्रेमाचीही पोळी पिकते कीं नाहीं ती. शिवाय आजकाल नोकऱ्या तरी कोण महाग ? चांगल्या शिकल्यासवरल्या दीडदीड हात लांबच्या पदवीधरांची पलटण झाली आहे बेकार, मग आमची दाद कुठली लागायला ? बरं चांगला स्वतंत्र कवींचा कारखाना काढावा म्हटलं तर प्रतिभेच्या भांडवलाच्या नांवानें पूज्य ! जो भेटतो तो आपला भुकेबंगाल. कोणी भाषांतर करतो, तर कोणी रूपांतर करतो. मींसुद्धां या वेळीं वेषांतर केलं आहे. जिकडे तिकडे आपला शंखांचा बाजार. एवं च काय तर कवीचें आयुष्य म्हणजे आपली एक दुःखाची कहाणीच आहे झालं; आणि ही कहाणी सांगायची वेड्या प्रीतीला ! प्रेमाच्या रडगाण्याशिवाय आज कवितेला दुसरें गाणेंच सुचत नाहीं. कधीं देशभक्तीचा उमाळा येतो पण तो जवळ जवळ पाहुणाच. प्रतिष्ठित मासिकांच्या धन्यांच्या तोंडावर टाकायला हा राष्ट्रीय कवितेचा तुकडा बरा असतो ! त्यानें मासिकाचींही पानें भरतात व आशाळभूत कवींचीही वर्णी लागते. जातिवंत कवीला पदवीच्या पृच्छानें उणेपणा येतो. हे पदवीधर कवि म्हणजे निव्वळ उडाणटप्पू. पदवीच्या आधारावर होतो यांचा प्रवेश मासिकांत. पण तेथें जर का थप्पड मिळाली कीं उपसलेंच यांनीं कवितेवर हत्यार, आणि केलीच कवींची कत्तल. इकडे टिकाकार तर डोकें वर काढूं देत नाहींत तर इकडे प्रेमाच्या वेडानें डोकें उठून जातें ! पण आतां डोकें शांतच ठेविलें पाहिजे. ( विचार करून ) हं,

या मधुकराच्या मुसक्या बांधण्याकरितां डोकें असेंच चालविलें पाहिजे. सरलेचे विचार डोक्यांतून जात नाहींत, पण याला माझा नाइलाज आहे. मी कवी आहें, माझी प्रेमनिराशा ही झालीच पाहिजे. सरला हस्तगत झाल्यावर प्रेमनिराशा माझी न होता यशवंतरावांची होणार. पण ते पडले कायदेपंडीत. कायदेपंडीत कवी असतो असं कुठल्याही कायद्यांत सांपडणार नाहीं ! (पाहून) अरे, पण ही सरला आलीच. मागें तो मधुकर दडला आहे. आतां ठरल्याप्रमाणें रंगीत तालीम झोकांत वठवली कीं मधुकराचें जन्माचें नाटक आलेंच रंगांत. ( सरला येते. )

**सरलाः**--एकदां प्रेमाचें वेड लागलें म्हणजे मनुष्य वाटेल ते वेडचार करील; आणि म्हणून मी त्याला नीट पढविलें आहे.

**मधुकरः**--पण विश्वासू आहे ना चांगला ?

**सरलाः**--गेल्या चार वर्षांत तो माझ्या प्रेमाच्या जाळ्यांत इतका गुरफटला आहे कीं, माझे चार हात होऊन गेले तरीही या परदेशी दाढीनें आपलें जाळें विणतोच आहे पुन्हां ! माझ्या प्रेमाखातर तो प्रेमवेडा मृत्युशीं-सुद्धां चार हात करील !

**मधुकरः**--पण शेवटीं ही प्रेमाची पुतळी कुणाच्या गळ्यांत पडणार ? सरले, क्षमा कर. माझ्या आशेला फूल येईल ना ?

**सरलाः**--प्रेम मुकें असतें ! तेव्हां मुक्या प्रेमाला वाचा फोडण्यांत काय अर्थ आहे ? ( मधुकर हंसत जातो. )

**सरलाः**--( स्वगत ) कोणीकडे तो स्वार्थत्यागी महात्मा अरविंद आणि कोणीकडे हा स्वार्थी व विषयलोभी मधुकर ! अरविंदांनीं माझ्या डोळ्यांत चांगलें झणझणींत अंजन घातलें. पण देवा, माझ्या घरच्या दुर्दैवावर माझी नजरच ठरत नांहीं. माझ्यासाठीं घरादारावर तुळशीपत्र ठेवून माझ्या नजरेच्या जबरेंत वागणारें आनंदाचें प्रेम किती तरी चांगलें. दैवालाच माहित काय आहे अदृष्टांत तें !

( पडदा पडतो ).

---

## प्रवेश २ रा.

( स्थळः--गिरीशाचा दिवाणखाना. वीणा व गिरीश. )

**गिरीशः**--वीणे, तुला मधुकराबरोबर लग्नाला कबूल झालें पाहिजे.

**वीणाः**--बाबा, तुम्ही झोंपेंत आहांत कीं जागे आहांत ? लग्न म्हणजे छप्पन वेळां ठरवून अठ्ठावन वेळां मोडण्याची जनावरांची खरेदीविक्री नव्हे. मी त्या मधुकराशीं साफ लग्न करणार नाहीं.

**गिरीशः**—मग, मला माझ्या नोकरीला व किताबांना आंचवावें लागेल. वीणे, मी संसारांतून उठूं नये अशी जर तुझी इच्छा असेल तर मधुकराबरोबर संसार करण्याला सिद्ध हो. मी जगांतून उठावें असें जर तुला वाटतें तर तूंही माणसांतून उठल्याप्रमाणें वाग. तो पोरटा तसा, ही कारटी अशी ! दोघांच्या दोन तऱ्हा. वीट आला आहे या जन्माचा !

**वीणाः**--दाशानें काय वाईट केलं ? देशसेवा करून देहाचें चीज करतोय. तो देशसेवा करतो म्हणून त्याचें लग्न मोडलेंत, आतां आपल्या सेवाधर्माकरितां माझें लग्न मोडा. हा काल विचारस्वातंत्र्याचा आहे. मी साफ तुमचें ऐकणार नाहीं. मला हें घर सोडावें लागलें तरी बेहत्तर.

**गिरीशः**—मग मी सरकारी नोकरी सुटल्यावर दारोदार हिंडूं तर. जगांत कोणीं विचारणारसुद्धां नाहीं. मग खाणार काय आणि जगायचं कसं ?

**वीणाः**--सरकारी नोकरी सुटल्यावर जसें कांहीं जगतांच येत नाहीं वाटतें ? सुटेना कां नोकरी सुटली तर. चांगलें देशकार्यांत पडा, नाहीं तर जन्मभर तुमच्या पोटाची जबाबदारी मी घेईन.

**गिरीशः**—पण सरकारचा रोष होऊन रावसाहेब ही पदवी जाईल ना, त्याची काय वाट वीणे ?

**वीणाः**—बहादुरी न करतां मिळविलेली रावबहादुरी व साहेबी गाजवितां येत नाहीं ती रावसाहेबी दोन्हीही निरुपयोगीच. बाबा, मी मधुकराशीं लग्न करण्यापेक्षां प्राण देईन किंवा कुठें पळून जाईन. तो कां माझा सूड उगवतो आहे तें सांगूं कां बाबा ? मीं त्याचे दांत एकदां चांगले घशांत घातले आहेत म्हणून त्यानें डाव धरला आहे तुमच्यावर. जाऊं द्या नोकरी गेली तर. मी साफ त्याच्याशीं लग्न करणार नाहीं.

**गिरीशः**—देवा, आतां माझी काळजी तुलाच ! ( पडदा पडतो. )

## प्रवेश ३ रा.

( स्थल-झंकाराचा दिवाणखाना गजर होतो, झंकार जागा होतो )

**झंकारः**—आनंदा, झोपेंत झोप साखरझोप! सकाळच्या साखर-झोंपेची गोडी, रात्रीच्या घोरण्याला नाहीं कीं दुपारच्या वामकुक्षीला नाहीं! पडल्यापडल्या, चालतांचालतां, कथेंत, सभेंत, येणाऱ्या डुकल्या तर अगदींच बेचव! तरीसुद्धां परवां त्या नाटकाचा बेरंग झाला तेव्हां माझ्या झोंपेला काय पण रंग आला होता. अगोदर मला नाटकांचा कंटाळा, पण आमच्या सरलेला नाटकाचा फार शोक! मला वाटतं तिच्याच जन्माचें नाटक होईल. नाटक पाहण्याकरितां डोळे ताणावे लागतात. पण आनंदा, तुझ्या काव्याचें तसें नाहीं. डोळे झांकून कान उघडे असले तरी चालतें.

**आनंदः**—जगाच्या रंगभूमीवर सारखी झोपच घेतली तर भावी आयुष्य कसें जाईल हा एक प्रश्नच आहे!

**झंकारः**—अरे, प्रश्न कसला आला आहे? आनंदा, तूंच पहा, सागरांची फडफड तुरुंगांत कोंडून ठेविली! अरविंदाच्या देशसेवेनें तो देशोधडीला लागला; पण माझ्या झोंपेनें मात्र नलिनीची माळ माझ्या गळयाकडे खेंचली! समुद्रमंथनाच्या ढवळाढवळीपासून दूर कोसांवर घोरत पडलेल्या भगवान् श्रीविष्णूलाच लक्ष्मीनें उठविलें कीं नाहीं! नुसती धांवपळ करणाऱ्या देवांच्या तांड्याकडे तिनें ढुंकूनही पाहिलें नाहीं आणि खरोखर या विष्णूसारखा देव नाहीं! जन्मभर घोरण्याशिवाय काम नाहीं बिचाऱ्याला! कधीं इकडल्या अंगावरून तिकडे झाला, तर तेवढ्या श्रमाकरितां लक्ष्मी पाय चेपायला आहेच? अगदीं झोपाळूंचा राजा. तुंबरूचें घोडगायन याच्या कर्णांत प्रवेश करीत नाहीं, किंवा हजारमुखीं शेषाच्या स्तोत्रांच्या कलाकलाटांत याचा डोळा उघडत नाहीं! उलट नारदाच्या मंजुळ वीणावादनानें याचा डोळा मात्र चांगला लागतो! आणि अगदीं बेफिकीर. लक्ष्मी चंचल आहे हें त्याच्या स्वप्नींही नाहीं; असणार कुठून! ध्यानीं मनीं जर झोंप तर स्वप्नांत तरी घोरणेंच! ( घोरूं लागतो. )

**आनंदः**—स्वारी घोरायला लागली. नलिनीची माळ झंकाराच्य गळ्यांत पडणार तर एकूण. ( पुन्हां गजर होतो व झंकार उठतो. )

**झंकारः**--हा घड्याळाचा गजर आतां कांहीं झोपेवर नजर ठरूं देत नाहीं ! अरे हो, सकाळच्या एक्सप्रेसनें आज लोणावळ्याला जायचें आहे. पण माझ्याबरोबर येणार कोण आज ? स्टेशनावर झोप लागली तर आग-गाडी निघून जायची, बरं आगगाडींत झोप लागली तर स्टेशन निघून जायचें ! ( त्याच्याकडे पाहून ) आनंदा, आज तुला झोप नाहीं आली वाटतें ? कुठल्या प्रेमाच्या फंदांत पडला आहेस कीं काय ? संभाळ बरें, हीं अंगवस्त्रें रात्रींबेरात्रीं प्राणांवर बेततात. रात्रभर सुखानें झोप घ्यावी. तें प्रेम नको आणि प्रेमापायीं तीं जाग्रणें नकोत ! पण प्रेमासाठीं मला सकाळीं जाग्रण करण्याची पाळी आली आहे. बरं, खालीं जाऊन तेवढी मोटार बोलाव पाहूं. ( वीणा पुरुषवेषांत येते व आनंद जातो. )

**वीणाः**—( स्वगत ) बाबांचा नोकरीचा लोभ सुटेना व मला झंकारांचा मोह आवरेना. बाबांच्या नोकरीच्या मुर्वतीसाठीं स्वतःच्या प्रेमाची गळे-चेपी करणारी ही वीणा नव्हे. आतां कांहीं दिवस झंकारांकडेच नोकराच्या पेशांत रहावें म्हणजे खऱ्या वेशाची ओळख होईपर्यंत ही गोड सेवा प्रेम-सेवा तरी होईल. ( उघड ) रामराम धनीसाहेब.

**झंकारः**--सकाळच्या रामप्रहरांत हा कुणाचा रामराम ? ( पाहून ) बाकी या रामरामानें आराम मात्र मिळेल मनाला. ( उघड ) कोण रे तूं ?

**वीणाः**—आपल्याला एका नोकराची जरूरी आहे असें कळलें म्हणून आलों आहे.

**झंकारः**--आनंदा पहा, न बोलावतां नोकर तयार. काय रे तुझें नांव ?

**वीणाः**--मोहन. ( हांसते. )

**आनंदः**--गोड नांवाप्रमाणें तुझा चेहराही मोठा गोड आहे. मोठ्या नांवाचा खोटेपणा तुझ्याठिकाणीं नाहीं. कारण सुंदर नांवाचे मालक नेहमीं कुरूपच असतात.

**वीणाः**—( स्वगत ) तुझ्याप्रमाणेंच अगदीं !

**झंकारः**--कवीला काव्याची उकळी फुटली वाटतें ! बरोबर, कवीची प्रतिभा सुंदर चेहऱ्याशिवाय जागी होत नाहीं. काय रे, तुझी लायकी आहे काम करायला ?

**वीणाः**--मी झोपाळू नाहीं, कष्टाळू आहें महाराज !

**झंकारः**—पगार काय घेणार ?

**वीणाः**—आपण द्याल तो.

**झंकारः**—राहणार कुठें ?

**वीणाः**--दिवसा आपल्याजवळ आणि रात्रीं घरीं.

**झंकारः**--वाः ! आनंद रात्रीं घरांत आणि दिवसा बाहेर, व तूं दिवसा घरीं व रात्रीं बाहेर; ठीक आहे. आनंदमोहनाच्या संगतींत रातंदिवस, आयुष्य अगदीं सुखांत झोपेंत जाईल.

**आनंदः**—हा झोपाळू म्हसोबा मंदाकिनच्या नवसाला कुठला पावायला ? ( मोटार हॉर्न वाजतें. ) मोटार आली.

**झंकारः**—बरं मोहन, आतां लोणावळ्याला जायचें आहे, कर तयारी.

**वीणाः**--ठीक आहे सरकार,(स्वगत) लोणावळ्याला ? आणि तें कशाला ?

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ४ था.

( स्थळः--मंदाकिनीचें घर, नलिनी व मंदाकिनी.)

**मंदाकिनीः**--नलिनी, तुझ्यासारखी गुणाची पोर नाहीं. अरविंदानें आपले गूण पाघळले म्हणून तूं कां दुःखीकष्टी होतेस ? अग, लग्नाची मुलगी म्हणजे बाजारांतला माल पैशेवाल्याच्या पदरांत पडायचा तो. देश-सेवा करून काय भीक मागायची आहे ? अरविंदला अवदसाच आठवली आहे झालें ! झालें आतां, बापानें दूर केलं, चांगलं जमलेलं लग्न विसकटलं ! आणि विसकटलेली घडी पुन्हां लवकर बसत नाहीं. आतां तुझी झंकाराबरोबर घडी जमवून दिली कीं माझी घटका भरली तरी उगीच घरघर नको मनाला. कारण ती वीणा झंकाराला सोडीत नाहीं अगदीं !

**नोकरः**--बाहेर कुणी पाहुणे आले आहेत.

**मंदाकिनीः**—जा. त्यांना इकडेच घेऊन ये. (नोकर जातो.) नलिनी, ते दुपारीं बागेंतील कुंजांत येतील, त्यांचें मन मोडूं नकोस आणि त्यांना नकार देऊं नकोस. जा, माझं गुणाचं बाळ तें ! ( नलिनी जाते. झंकार येतो. ) या सरदारसाहेब, झोपबीप फारशी मोडली नाहीं ना तुमची ? हा नोकरही नवीनच आहे वाटतं ?

**झंकारः**—हो, लहान असून झोपाळू नाहीं. हा जर आज आगगाडींत नसता तर माझ्या झोंपेची गाडी पुण्यावरच थांबली असती. (पाहून) बंगला मोठा छान आहे तुमचा. अगदीं शांत, वाऱ्यानें पानसुद्धां हालत नाहीं. काय गाढ झोंप लागेल अगदीं. घर असावें तर असें. नाहीं तर आमची मुंबई? रात्रंदिवस गलबला, शांतता कशी ती नाहींच.

**मंदाकिनीः**—सरदारसाहेब, आतां हा बंगलाही आपलाच होणार आहे लवकर. माझी नलिनी म्हणजे नुसतं रत्न आहे बरं. मला वाटलं होतं कीं, अरविंदाच्या झपाट्यांत पोरीचं मन भडकतं कीं काय? पण रामाचें नांव गोविंदा. अगदीं हूं कीं चूं नाहीं. आणि आज्ञाधारक किती! मला हिचा गरीब स्वभाव फार आवडतो बघा.

**झंकारः**—(स्वगत) आल्याबरोबर टकळी झाली सुरू. जरा विसावा घेईन म्हटलं पण व्यर्थ! लग्न ठरवतांना बोलघेवडेपणाला ऊत येतो अगदीं.

**मंदाकिनीः**—आमच्या सागरदादाच्या घरीं साधारण गरीबीच आहे. पण नक्षत्रासारखी पोर झाली, आणली तिला मी घरीं झालं. तुमचें हें एवढें एकदां जमलें कीं, मी तिच्याच नांवानें मृत्युपत्र करून ठेवतें तुमच्याजवळच. आमच्या मधुकराची नजर आहेच कीं माझ्या पैशावर. एकादे वेळीं तो मला ठारसुद्धां मारील पैशाकरतां! म्हणून म्हटलें पैशाकडे पैसा गेला कीं नलिनी जन्मभर पैशाला महाग व्हायला नको. ( नोकर येतो. )

**नोकरः**—उपाहाराची तयारी आहे.

**मंदाकिनीः**—झंकार, क्षमा करा अं, म्हातारपणांत बोलण्याचा सुमारच रहात नाहीं. चला आंत. ( मंदाकिनी व झंकार जातात. )

**वीणाः**—(स्वगत) पाहूं आतां झंकार वीणेचे होतात कीं नलिनीचे? दादाच्या गळ्यांत नलिनीची माळ पडली पाहिजे. मग वीणेवांचून झंकार नाहीं आणि झंकारावांचून वीणाही नाहीं! ( जाते. ) (पडदा पडतो. )

---

## प्रवेश ५ वा.

( स्थळः-बाग झंकार, व मोहन व प्रविष्ट. )

**झंकारः**—मोहन, तूं येथेंच रहा, मला कदाचित् झोंप लागलीच तर सावध कर.

**मोहनः**--पण प्रणयाराधनांत झोंप लागत नाहीं सरकार. मग ती आपल्याला कशी येणार ?

**झंकारः**--कशी आणि काय तें नको विचारुस. पण काय रे, प्रणयाराधन कसें करावयाचें ? निद्रेच्या प्रियराधनांत माझं बालपण गेलं, तिचाच पगडा अझून सरला नाहीं ! प्रणयाराधन तुला माहीत आहे कां मोहन ?

**मोहनः**--(स्वगत) पुढें द्यावे लागणारे पाठ आतांच वठवावेत. (उघड) हो, आहे थोडसें माहीत सरकार, काव्यांत वाचलें आहे मीं.

**झंकारः**--अरे वाः, लहान वयांत वरीच कमाई केली आहेस. बरं सांग पाहूं ?

**मोहनः**--प्रथम प्रियकरानें प्रियेकडे दूत पाठवायचा असतो. त्या दूतानें प्रियकर विव्हळ झाला आहे असें सांगायचें. मग—

**झंकारः**--थांब, माझा दूत तूंच हो. सांग तुला काय सांगायचें असेल तें खुशाल ! तोंपर्यंत मी एक झोप काढीन. बरं पुढें ? पुढं काय ?

**मोहनः**--मग प्रिया प्रियकराच्या भेटीकरितां येते. पण ही भेट नेहमीं चोरून होते.

**झंकारः**--मग चोरून भेट कशी घ्यावी ?

**मोहनः**--मंदाकिनीबाईसाहेबा देखत भेट घेऊं नये म्हणजे झालं. (स्वगत) म्हणजे तिची तरी ब्याद नाहींशी झाली ! उगीच अडगळ.

**झंकारः**—वाः, फारच छान ! बरं पुढें ?

**मोहनः**--प्रियकर दीर्घ निश्वास टाकीत आहे. छातीवर हात ठेवून पडला आहे. रात्रीच्या जाग्रणानें डोळे लाल झाले आहेत, अशा प्रजागरकृश स्थितींत त्याला प्रियेनें पाहिलें कीं पुढील काम प्रियाच करते !

**झंकारः**--हें मात्र जरा अवघड आहे. छातीवर हात ठेवले कीं सुखाची समाधी लागलीच ! निश्वासाऐवजीं घोरणें ऐकूं येईल व रात्रीच्या जाग्रणाऐवजीं दिवसाची झोप मात्र दिसेल प्रियेला. बरं प्रियेचीं काळजी नको आपल्याला. तूं जा आतां दूत म्हणून. पुढें काय काय होईल तें पाहूं. पण हें पहा, प्रथम आल्याबरोबर मला जागें कर म्हणजे मग मी निश्वास टाकायला लागेन.

( वीणा जाते. )

( पडदा पडतो. )

## प्रवेश ६ वा.

( नलिनीला मंदाकिनी सजवीत आहे, वीणा येते. )

**वीणा:**--सरदारसाहेब बाईसाहेबांना एकटेच भेटूं इच्छितात.

**मंदाकिनी:**—असं कां? बरं, प्रणयाराधनाच्या मुक्या पाठांत म्हाताऱ्या शब्दांची दाटी कशाला उगीच? बाळ, जा नीट बोल बरं.

( मंदाकिनी जाते. )

**मोहन:**—नलिनी, अशी आश्चर्यचकित होऊं नकोस. मी वीणा आहें. झंकाराचा स्वभाव फार उदार आहे. अगदीं न घाबरतां त्यांना सांग कीं, तुझें प्रेम दादावर आहे. फक्त मंदाकिनीबाईना मात्र थांग लागूं देऊं नकोस. एक दिवस अगदीं मौन धर ' मौनं संमतिलक्षणम्। ' असें वाटून तिनें झंकारांना तिचें मृत्यूपत्र एकदां दिलें कीं मरूं दे तिला खुशाल! दादाची आणि तुझी गांठ मी बांधतें. तूं मात्र रोखठोक बोल हं. मी आहेंच तेथें. ( झंकार अळोके पिळोके देत येतो. )

**मोहन:**—( एकीकडे ) सरदारसाहेब, निश्वास टाका. ( नलिनी झंकारास नमस्कार करते, झंकार मोहनकडे साश्चर्य पाहतो व नुसतेच हात वर करतो. )

**नलिनी:**—सरदारसाहेब, माझ्या दुःखाची कहाणी सांगण्यासाठीं मी आपल्याकडे आलें आहें. दुःखाची कहाणी आपल्याला आवडेल ना?

**झंकार:**--(स्वगत) प्रणयाराधनाचा प्रारंभ दुःखाच्या कहाणींत होतो काय? फारच छान, वाः!

**नलिनी:**—माझ्या मनाचें फूल मीं अरविंदाच्या चरणावर वाहिलें आहे! माझ्या प्रेमाच्या माळेला सोन्याची जरतारी तार नको! दरिद्री सुताचा दोराही तिला चालेल! ते देशसेवक आणि दरिद्री असले तर लोकांची श्रीमंती मला नको! ऐतखाऊ श्रीमंतीपेक्षां कष्टाळू गरीबी बरी.

**झंकार:**--(स्वगत) काय? हिचें प्रेम अजून अरविंदावर कायम आहे! थेरडीनें कांहीं तरीच पत्रांत लिहिलें कीं काय? मग प्राण गेला तरी आपण मित्रद्रोह करणार नाहीं. उगीच हो म्हटलं.

**नलिनी:**--कैलासनाथाला सोडून कुबेराच्या संपत्तीला पार्वती कधीं

भाळली नाहीं. दरिद्री सत्यवानाच्या गळ्यांत माळ घालतांना सावित्रीनें प्रेमाच्या संपत्तीवरच भिस्त ठेविली होती! स्वार्थत्यागी देशसेवकाच्या मुलीला करडा सेवकच पती रुचतो! वाटेंत दऱ्याखोऱ्यांचे चढउतार आले म्हणून सरिता सागराला मिळतेच कीं नाहीं! देशसेवेच्या पायीं देशोधडी लागून दारोदार दवदव करावी लागली तरी, अरविंदांच्या जीवावर ती मी आनंदानें सोशीन! पण स्वार्थी संपत्तीच्या महालांत आळशी श्रीमंतीची सोबत नको. देशसेवेचे कष्ट केले तर देशाचें दैव उघडून देहाचें सोनें होईल! सरदारांच्या कोमल करांपेक्षां देशसेवकांचा कणखर हातच मला जास्त आवडेल! पिढीजाद श्रीमंत सरदारांपेक्षां मला उद्योगी पण गरीब देशसेवकच आवडतात.

**झंकार:**--(स्वगत) सरदारांची संभावना चांगलीच चाललीय म्हणायची. झंकार, कोणत्या जन्मीं तूं झोप टाकणार बाबा?

**नलिनी:**--सरदारसाहेब, आत्याबाईच्या हट्टी आग्रहामुळें मला आपल्या तोंडाकडे पहावें लागत आहे. आपण अरविंदांचे मित्र आहांत, आपलं अंतःकरण उदार आहे, आपल्याला माझी कींव आली तर मी आपली जन्माची उतराई होईन. सरदारसाहेब, आपल्या अभागी बहिणीला आपण धीर द्याल ना? आपल्या अनाथ भगिनीला, प्रेमाचा आशीर्वाद द्या.(नमस्कार करते.) आपली ही बहिण आतां आपल्याच आधारावर अवलंबून आहे.

**झंकार:**--नलिनी, हा झंकार कांहीं राक्षस नाहीं,कीं तो तुझ्या दुःखीकष्टी मनाला दुखविण्याकरतां तुजजवळ प्रेमयाचना करील. त्या म्हातारीनें मला अगदीं गळ घातली. नाहीं तर या गाळांत मी कधींच फसलों नसतों; तिची आतां चांगली कानउघडणी करतों!

**नलिनी:**--नको नको, सरदारसाहेब आत्याबाईच्या कानीं ही गोष्ट गेली तर त्या माझे कान मात्र चांगले उपटतील. ही गोष्ट षट्कर्णी होतां उपयोगी नाहीं. माझ्याकरतां, अरविंदांच्या अभागी नलिनीकरतां, तुमच्या बहिणीकरतां, सरदारसाहेब, खोटें बोलण्याचें पातक आपल्याला केलें पाहिजे. या पातकानें संपादन केलेलें पुण्य आपल्याला जन्मभर दुवा देईल. माझी लग्नाला संमती आहे असें आपण कळविलें म्हणजे हे चातुर्मासाचे चार महिने तरी मला निवांत काढतां येतील; आणि बाबा सुटल्यावर मी

या जाचांतून सुटेन. तोपर्यंत अरविंदही भेटतील. मग माझ्याकरतां खोटें बोलण्याची कृपा सरदारसाहेब करतील ना ?

**झंकारः**—नलिनी, तुझ्या क्षणाच्या सुखाकरितां मी जन्मभर खोटें बोलेन. मला खोटें बोलावयाची संवय नाहीं, असें थोडेंच आहे ! तूं अगदीं निर्धास्त ऐस. सर्व कांहीं नीट होईल. माझा तुला आशीर्वाद आहे.

**नलिनीः**--देवा, वीणाझंकारांचा संसार सुखाचा कर. वीणाझंकारांना उदंड आयुष्य दे.

**झंकारः**--( स्वगत ) हिचा आशीर्वाद खरा असेल तर मला झोंपेला जन्माचें मुकावें लागणार. वीणेच्या गडबडींत संसारांत झोंप कुणाला येणार!

( झंकार निजतो. मोहन हंसत येतो. )

**मोहनः**—नलिनी,तोंडावर जरा खोट्या सुखाचें जाळें पसर. थोडा वेळ लज्जेचें लाजाळू झाड हो. मंदाकिनीबाईच्या प्रश्नाला नुसतें हंसून उत्तर दे. जगाच्या बाजारांत नुसत्या खोट्या भपक्याच्या पतीवरच केव्हां केव्हां सौदा फार सुलभ होतो. ( नलिनी जाते. झंकाराला जागें करून ) सरदार-साहेब, प्रणयाराधन कसें काय ठीक झालें ना ?

**झंकारः**--अगदीं उत्तम. प्रियाही नाहीं व प्रियकरही नाहीं. मग प्रणयाराधन कुणाशीं करायचें ! तुझ्याशीं का रे मोहन ? मोहन, मीं जर स्त्री असतों तर तुझ्याशींच लग्न केलें असतें. इतका तूं चांगला आहेस.

**मोहनः**--मी जर स्त्री असलों तर तुम्ही माझ्याशीं लग्न कराल काय ? पहा बरं, मग हटाल मागें.

**झंकारः**--बेलाशक, अगदीं खास करीन.

**मोहनः**--म्हणजे ! सरदारसाहेबांचें कुणावर प्रेम नाहीं वाटतं ?

**झंकारः**--कुणाला माहित ! कुणी केली आहे प्रेमाची फिकीर ? ( आढवून ) अरे हो ! माझें कुणावर प्रेम नसलें तरी कुणाचें तरी माझ्यावर प्रेम आहे खास.

**मोहनः**--कुणाचें बरं ?

**झंकारः**--या झंकारावर वीणेचें प्रेम आहे.

**मोहनः**--ही वीणा कोण ?

**झंकारः**--ही गिरीशांची वीणा— ( मन्दाकिनी येते. )

**मंदाकिनीः**--पळून गेली. सरदारसाहेब, गिरीशांची वीणा पळून गेली. काय या पोरींनीं ताळतंत्र सोडला आहे अगदीं. आणि ती वीणा अगदींच थिल्लर. आमच्या मधुकरानें तिला मागणी घातली होती. रावसाहेबांना स्थळ पसंतही होतें वाटतं! पण आपली मुलगीच गेली पळून. आमची नलिनी तशी नाहीं हो. बरं तें असो, सरदारसाहेब, आपल्या लग्नाची केळवण मी तुम्हांला माझ्या मृत्युपत्रानें करतें. ( मृत्युपत्र देते. ) मुंबईला एक मृत्युपत्र मीं अगदीं लिहून ठेवलं आहे. फक्त नांवच घालायचं बाकी होतं म्हणून हें नवीन केलं. त्याच्यावर तुमची साक्ष घाला म्हणजे झालं. ( झंकार साक्ष घालतो. ) आतां हें पिकलें पान केव्हांही गळलें तरी चालेल ! चला सरदारसाहेब. ( जातात. )

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ७ वा.

(स्थळः-बॅकबे, सरला व कैलास प्रविष्ट.)

**सरलाः**--( स्वगत )या समुद्राकिनाऱ्यावर प्रेमाचा बाजार भरला आहे. इकडे पतिपत्नींच्या प्रेमाचें प्रदर्शन तर तिकडे बदफैली बाजारबसव्यांचीं गडबड. हा तरुण त्या कुमारीकडे वांकड्या नजरेनें पाहतो आहे, तर ती अल्लड पोरगी त्याच्याकडे पाहून डोळे मिचकावीत आहे. माझ्या जिवावर तो मधुकर उडया मारीत आहे. अरविंदानें निराश केल्यामुळें माझ्या मनांत आनंदाबद्दल पुन्हां विचार येऊं लागले आहेत. कैलासाची दृष्टी सभोंवार भिर भिर फिरते आहे. तर कैलासांतल्या आनंदाची नजर नलिनीवर फिदा झाली आहे. प्रेमाच्या काय या कोलांटउडया ! अरविंदाकरितां नलिनी झुरते, तर प्रेमसेवेला सोडून अरविंद देशसेवेला कवटाळतो. वीणेला झंकाराची आवड तर मला माझ्या घराची नावड. या प्रेमाच्या बाजाराला वेडयांच्या बाजाराचें नांव चांगलें शोभेल. कुणाला तरी कुणाचें वेड लागलेलें आहेच. प्रेमाच्या प्राप्तीनें भावी सुखाचें वेड, भावी सुखाच्या आशेनें प्रेमाचें वेड. मिळून काय सगळा वेडयांचा रोजगार; आणि रोजगारीची कमाई काय ? तर निराशेचें फत्तर. मग माझ्या निराशेच्या फत्तरांनीं नलिनीचें डोकें फोडलें म्हणून काय बिघडलें ! अरविंदानें मला तोंडघशीं पाडलें तर त्याचा सूड

उगवून मी त्याच्या तोंडाला काळोखी फासूं कां ? आणि त्यानें एकदां काळें केलें कीं मग उजळ माथ्यानें घरालाच प्रेमाचा महाल बनवूं कां ? आनंदाच्या तोंडाला नलिनीचें कुलूप. कैलासाच्या विश्वासावर घरधनी निर्धास्त. कुंकवाचा व धन्याचा आधार पोरांच्या लटांबराला आहेच. ( मधुकर येतो.)

**मधुकरः**––प्रकृति एकाएकीं बिघडल्यामुळें मंदाकिनीकाकी लोणावळ्याहून परत आल्या. या गंगेंत आपण हात धुवून घेतले पाहिजेत; म्हणजे अरविंदाचे हात कायमचे अडकतील व मग आपल्यालाही फार दिवस हात चोळींत बसायला नको.

**सरलाः**––मग आतां कैलासाला चांगलाच बनवला पाहिजे आणि त्याला बनवायचें म्हणजे प्रेमाचा चांगलाच देखावा केला पाहिजे. अरविंदाचा सूड घेतलाच पाहिजे.

**कैलासः**––(स्वगत) झालीं यांचीं खलबतें सुरू. आंब्याची राखण करावी मीं, आणि ते तोडावेत मात्र यानें. सरलेनें जर माझ्या आशेची माळ तोडली तर प्रथम या मधुकराचें नरडें फोडीन.

**मधुकरः**––भोळ्या नलिनीनें हें पत्र अरविंदाकरितां दिलें आहे. काकी आजारी असल्यामुळें पौर्णिमेच्या रात्रीं अरविंदास तिनें बोलावलें आहे. तशीच ही बघ कुपी. यांतले पांच थेंब जर मंदाकिनीच्या पोटांत गेले तर तिचे पंचप्राण पांच मिनिटाच्या आंत जगाच्या बाहेर जातील. तुझ्या त्या प्रेमवेडयाला चांगला कानमंत्र सांग. नाहीं तर तें भूत या कोलितीनें घरालाच आग लावील.

**सरला.**––त्या भुताचे चाळे माझ्या प्रेमाच्या मंत्रांनीं क्षणांत बंद पडतील. त्याची नको काळजी तुम्हाला. ( मधुकर जातो. ) भैय्याजी, घरीं चला बराच उशीर झाला, वाट पहात असतील घरीं.

**कैलासः**––चलिये बाईसहाब.

---

## प्रवेश ८ वा.

( स्थळ–सागरचें उद्योगभुवन. अरविंद सूत काढतो आहे.)

**अरविंदः**––( स्वगत ) प्रेमानें अरविंदाला सोडलें म्हणून अरविंद कांहीं देशसेवा सोडणार नाहीं. अरविंदाचा प्रेमभंग झाला म्हणून काय झालें ?

असे शेंकडो अरविंद देशाच्या उद्धारासाठीं कंबर कसून तयार आहेत. देश-सेवेच्या या पर्वणींत स्वार्थत्यागाच्या स्नानानें अरविंद पुनीत नाहीं कां होणार ? मनांतल्या प्रेमकल्पनांला पार मारून टाकल्यावर देशसेवेशिवाय मनाला दुसरा ध्यास कशाला हवा ? दीनदुबळ्या अस्पृश्यांच्या हातांत हात देऊन त्यांना शिक्षणामृत पाजलें तर ती दरिद्री दुनिया दुवा तरी देईल. खादीची पवित्र व निरुपद्रवी चळवळ देशभर पसरविली तर परदेशी व्यापाराला ओहोटी लागून देशी मालाला भरती येईल. अहिंसातत्त्वाची पेरणी करून तिच्या अनत्याचाराचीं फळें देशाला लाभलीं तर शांतीचें साम्राज्य नांदेल. असल्या धामधुमीच्या धांवपळींत प्रेमाच्या रडक्या रेंगाळण्याकडे लक्ष तरी कां द्यावें ? देशसेवेला प्रेमाचा बळी दिला तर स्वराज्यदेवी संतुष्ट तरी होईल. विराटस्वरूप देशसेवेपुढें यःकश्चित प्रेमनिराशा म्हणजे दर्यामे खस-खस. त्याचा पुन्हां विचारच नको. झंकाराच्या मोठ्या श्रीमंतीलाच नलिनी योग्य आहे. ( कैलास खादीच्या पोषाखांत येतो. )

**कैलासः**—अरविंदबाबूजी कहां है ?

**अरविंदः**--काय काम आहे?

**कैलासः**--एक खत देना है. ( अरविंदाला कैलास पत्र देतो. )

**अरविंदः**--( पत्र वाचून ) वाः, प्रेमाच्या कोलांटउड्या अजब तर खऱ्याच. झंकारनलिनीच्या विवाहाची जनवार्ता खोटीच तर. नलिनीच्या प्रेमाला मोल नाहीं. भैय्याजी आपण उभे कां ?

**कैलासः**--आपके साथ जाना है.

**अरविंदः**--कां बरें ?

**कैलासः**--मालिकका हुकूम.

**अरविंदः**--ठीक चला पुढें. ( जातात. )

---

## प्रवेश ९ वा.

( स्थळ–बागेशेजारीं रस्ता; मधुकर व सरला प्रविष्ट. )

**सरलाः**--आनंदानें अगदीं चोख काम केलें. आतां बागेंत अरविंद नलिनीशीं गप्पा मारीत बसला आहे तोंच डाव साधला पाहिजे.

**मधुकर:**--कार्कीच्या डॉक्टरालाही मी आंत पाठविलें आहे व पोलीसलाही वर्दी देऊन ठेविली आहे. ते येईपर्यंत आपण बाहेरच थांबू.

**नलिनी:**--प्रेमस्वरूपा, प्रेमाशीं प्रतारणा करून, कुठल्या नरकाचें साधन करूं? प्रेमाच्या जलावर संशयाचे तरंग असे अवेळीं कां बरें उठले? जीवितेश्वरा, माझ्या प्रेमाची आडकांठी आणून आपल्या देशसेवेच्या चालत्या गाड्याला मी खीळ घालणार नाहीं. आपली देशसेवा खुशाल करा; मी प्रेमसेवेंत जन्म घालवीन! पण आपल्या आड येणार नाहीं.

**अरविंद:**--संशयाच्या पिशाच्चांनीं मनांत थैमान घातल्यामुळें, आज-पर्यंत मनावर देशसेवेच्या मंत्राचा मारा करीत होतों! प्रेमाच्या आधारावर देशसेवेचे कष्ट करावयाला मनाला उत्साह येतो. पण त्याच्या अभावीं मात्र कर्तव्याच्या धडाडींतून क्षणभर विसांवा मिळतांच बेफिकीर वृत्तीच्या प्रेम-शून्य अंतःकरणाला दाही दिशा शून्य भासतात! प्रेमगंगेचा उत्साही पूर ओसरला कीं निराश जलाशय परिस्थितीच्या खडकाशीं धडका देऊं लागतों.! बोलानें बोल सरायचे नाहींत, बोल बोल म्हणतां वेळ निघून गेला! माझ्या प्रेमळजीवा, आतां पुन्हां केव्हां भेट? (पड्यांत गडबड, पकडा, हरामखोर!)

**नलिनी:**--देवाला माहित. हा कसला गडबडाट?

**अरविंद**--विद्युत्पातापूर्वी मेघांचा गडगडाट होतोच! आतां वीज कोणावर कोसळणार कुणास ठाऊक! कदाचित् हीच आपली शेवटची भेट असेल. ( जाऊं लागतो. )

**नलिनी:**--नाथ, असें कां बोलतां? ( अडविते. )

(मधुकर व पोलीस येतात.)

**मधुकर:**—पकडा या हरामखोराला, घाला बेड्या या खुनी बेर-डाच्या हातांत.

**नलिनी:**—काय म्हणतां तुम्ही?

**अरविंद:**—काय मी खुनी? कुणाचा खून केला मीं?

**मधुकर:**—मंदाकिनीकाकींचा. करुनसवरुन वरती कागावा करतोस आणि चोरासारखा पळून जात होतास; पकडा एकदम, नलिनी, सोड त्या

बदमाशाला. खेंचा त्याला घरांत, पंचांच्या पंचनाम्याला हा हजर पाहिजे. ( अरविंदाला नेतात. )

**नलिनी**:--देवा, काय हा प्रसंग !

(दिखावा:--मंदाकिनीचें प्रेत, जवळ गांधी टोपी, औषधाची बाटली, पंच वगैरे. )

**सरपंच**:—डाक्टरांनीं परिक्षा करून विषप्रयोग असा निकाल दिला आहे. आह्मी त्यांच्या हाताला हात लावून सांगतों कीं, निःसंशय विषप्रयोगच हा.

**फौजदार**:—मग करा पंचनामा. खुनी इसमाचा झाडा घ्या. ( पोलीस अरविंदाच्या खिशांतून विषाची कुपी काढतो. )

**मधुकर**:—हा प्रत्यक्ष पुरावा खुनाचा. गडबडीनें जातांना याची ही गांधीटोपी येथें विसरून राहिली. (पडदा पडतो.)

---

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

( स्थलः—मंदाकिनीचें घर, यशवंत, गिरीश, सरला, नलिनी, मधुकर, व वकील. )

**यशवंतः**--रावसाहेब, या उतारवयांत अरविंदांनीं तुम्हांला फार पेचांत आणलें आहे. सरकारची मर्जी संपादून तुम्हीं पैसा व मान मिळविलांत, पण त्याचें सार्थक झालें नाहीं !

**गिरीशः**—यशवंतराव, देशसेवेच्या भरी पडून त्यानें पैसा तर गमावलाच पण प्राणावरही गदा आणली. नशीब त्याचें आपण काय करणार त्याला ! वीणाही कुठें नाहींशी झाली आहे. काय करावें ? घराचें तोंड बघावेंसें वाटत नाहीं. (वकील तिजोरींतून मृत्यूपत्र सिलबंद फोडून वाचतो.)

**वकीलः**--आमच्या मृत अशीलाचें मृत्युपत्रांत तीनच कलमें आहेत. पहिल्या कलमांत त्यांच्या दोन नातलगांचा उल्लेख आहे. दुसरें कलम असें आहे कीं, आमच्या सर्व स्थावर जंगम इस्टेटीची मालकी आमचे पुतणे डॉक्टर मधुकर यांना दिली आहे.

**यशवंत, गिरीशः**—मधुकरांना ! ( आश्चर्यचकित होतात. )

**मधुकरः**—वकीलसाहेब, नीट वाचा, तेथें नलिनीताईचेंच नांव असेल माझ्याऐवजीं !

**सरलाः**—म्हणजे ? हें आश्चर्यच आहे.

**वकीलः**--आमचे मित्र डॉक्टर मधुकर यांचेंच नांव आहे. कुमारी नलिनीचें नांव नाहीं. शेवटलें कलम असें आहे कीं, आमच्या उपरिनिर्दिष्ट वारसानें, आमच्या दुसऱ्या नातलगाचा लग्नसमारंभ, आमच्या नांवाला शोभेल असा, मोठ्या थाटानें करावा. खालीं मृत मंदाकिनीबाईची सही असून, तारीख, स्थल, वगैरे पद्धतशीर आहे. सील तर मी सर्वांसमक्षच फोडलें. न्यायमूर्तींनीं पहावें वाटल्यास. ( दाखवितो. )

**सरलाः**--नलिनीताई, तुझ्या दुर्दैवाला सीमा नाहीं उरली; पण आपला

आपला काय उपाय ? म्हातारीनें शेवटीं तुला फसविलें. मनाला वाईट वाटूं देऊं नकोस.

**नलिनी:**--लोकांकडे काय बोल बाई ? आपलेंच नशीब फुटकें !

**वकील:**—आमचे परममित्र डॉक्टर मधुकरपंत यांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों.

**यशवंत:**—बरें, डॉक्टरसाहेब घेतों आतां रजा.

**गिरीश:**--मधुकर, वीणा अझून सांपडत नाहीं. तिनें कुठें दडी मारली आहे, कळत नाहीं. पोलिसांत वर्दी देऊन तपास करावा तर घरची अब्रू च्चवाठ्यावर येते. नाइलाज आहे. बरं येऊं ?

**मधुकर:**--न्यायमूर्तींना तसदी पडली याबद्दल क्षमा करावी. बरें, रावसाहेब नमस्कार, आभारी आहें.

**सरला:**--नलिनीताई, येऊं आतां ? (यशवंत, गिरीश, सरला जातात.)

**मधुकर:**---वकीलसाहेब, पूर्वींप्रमाणेंच मेहेरबानगी असावी.

**वकील:**—हें कां सांगायला पाहिजे आपण ? अहो, घरचींच माणसें आम्ही. बरं, घेतों आतां रजा.

**मधुकर:**--(स्वगत) करामतीची कारवाई तर उत्तम साधली. पुराव्याच्या फांसांत अरविंदही अडकलाच. आतां आनंदाचें तोंड दाबलें कीं, नलिनीनें माझ्याजवळ तोंड वेंगाडलेंच पाहिजे ! सरलेनें त्या बैलाला एकदां वेसण मात्र घातली पाहिजे कीं, मग प्रत्यक्ष मृत्यू आला तरी मी भिणार- ( मधुकर दचकतो. ) काय घाबरलों मी ? ( कैलास येतो.) कैलास, काय काम आहे ?

**कैलास:**--आपकू बाईसाहेब बुलाते है.

**मधुकर:**--बरं, आलोंच म्हणून सांग.

**नलीनी:**---देवा, तुझ्या मनांत तरी काय आहे ! माझ्यावर आभाळच कोसळलें. आतां आसरा कुठें शोधायचा ? देवा, मधुकराला तरी सुखी कर.

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

(**स्थळ:**—झंकाराचा दिवाणखाना आनंद जवळ उभा. झंकार कपाटांत कांहीं शोधीत आहे, नंतर निराश होऊन फिरतो. )

**झंकार:**—काय झाली मृत्युपत्राची वाट बरं ? कुठल्या वाटेनें गेलं असावं बरं ! त्या मोहनच्याच वाटेनं खास. पण तो अगदीं निष्कपटी होता, कां मृत्यूपत्रच मृत्यू पावलं ? काय भुताटकी झाली ही ! ( विचार करीत फिरतो. वीणा येते. )

**वीणा:**--(स्वगत) नवं मृत्युपत्र कुठं बरं गहाळ झालं असावं ? या घरांत तर तें आलं खास. मग काय घरानं गिळलं ? कां या आंनदानं गिळलं ? छे. तें नाहीं शक्य; कुठें तरी पडलंच तें ! (उघड) मृत्यूपत्रांत मधुकराच्या नांवानें संपत्ति लिहिली आहे, झंकार.

**झंकार:**--काय ? मृत्यूपत्र मधुकराच्या नावाचें ! अरेरे, घात झाला.

**वीणा:**—या मृत्यूपत्रांत कांहीं तरी गोम आहे. पण बाबा म्हणत कीं, यशवंतराव होते, त्यांच्यासमोरच सील फोडलं. मग संशयाला जागा कुठून ? तरी पण कांहीं तरी काळंबेरं आहे खास.

**झंकार:**—वीणे, नलिनीचा घात माझ्या झोपेनें व आळसानें केला. मला मोहन नांवाच्या एका मुलानें अगदीं हातोहात फसविलें. तो भेटल्यावर त्याला असा हात दाखवीन कीं ज्यांचें नांव तें ! आनंदा, पुन्हां एकदां त्या पोराचा शोध कर पाहूं. जा-( आनंद जातो. ) यानें कुठं दडी मारली आहे कुणास ठाऊक ! या गोऱ्यागोमट्या पोरानें नलिनीचें कपाळ मात्र करंटें केलें ? पण नाहीं, त्यापेक्षां झंकाराचं कपाळ फुटलं तरी चालेल, पण माझ्या चुकीकरतां नलिनीला शिक्षा काय म्हणून !

**वीणा:**--हा मोहन कोण नवीन आणि भेटला कुठें ? (हंसते.)

**झंकार:**—तो एक मोहक छोकरा होता. (स्वगत) बाकीचें गुलदस्तांतच ठेविलें पाहिजे. (उघड) वीणे, झाला माझा निश्चय. मी माझी जहागीर नलिनीच्या नांवानें आतांच्या आतां करून देणार. माझ्या झोपेचं प्रायश्चित्त नलिनीला द्यायचें काय ? जशी सरला तशीच नलिनीही माझी बहीणच आहे. तिला मी दुःखांत ठेवणार नाहीं.

**वीणा:**--पण, झंकार-( थांबते व पाहते. )

**झंकार:**—वीणे, मधेंच कां थांबलीस ?

**वीणा:**--सरदारांची जहागीर जाऊन ते दारोदार हिंडूं लागले कीं, त्यांच्या अर्धांगीलाही त्यांच्या मागें चौपदरी घ्यावी लागेल. असल्या उलल्या अंबारींतून वरात काढून घ्यायला कोण मुलगी तयार होईल ?

**झंकार:**--(स्वगत) वीणेचें प्रेम मजवर आहे कीं माझ्या संपत्तीवर ? ( उघड ) अविचारानें केलेला परोपकार विचारानें साधणाऱ्या स्वार्थापेक्षां फार बरा. वीणे, माझी अर्धांगी- झोंप, माझा कधींच त्याग करणार नाहीं.

**वीणा:**—झोपेशीं तुमचा अतिपरिचय झाला आहे, म्हणून ती असली अवज्ञा करणार नाहीं ही तुमची कल्पना चुकीची आहे. बालपणीं, उठल्या-बसल्या येणारी झोप, तारुण्यांत फक्त प्रेमळ जीवाच्या निकट सहवासांतच येते. विरहाच्या रोगाला झोपेचें औषध पचनीय पडत नाहीं. गोड हाताचा विळखा जरासा सैल झाला तरीसुद्धां झोंप मोडते. मग प्रेमळ जीवाचा अंगस्पर्शच झाला नाहीं तर झोंप येणार कुठून ?

**झंकार:**—वीणे, तुझ्या समोरच आतांच्या आतां घोरायला लागूं कां ? बोल, प्रेमाची फिकीर करायला मी कवी थोडाच आहें. मला कांहीं झोपेंत प्रेमाचीं स्वप्नें पडत नाहींत.

**वीणा:**—पण आपलं स्वप्नावर प्रेम असेल तेव्हां ना ? अहो, मनो-राज्याच्या महासागरावर एकदां कल्पनेच्या लाटा उसळूं लागल्या कीं, दरिद्री वाळवंटांतसुद्धां मनाला सिकताहर्म्य बांधतां येतात.

**झंकार:**—स्वानुभव दिसतोय हा, वीणे तुझा. माझ्याविषयीं म्हणशील तर कल्पनेचीं चित्रें पहायला म्हणून डोळे मिटलेच तर झोपेचें चित्र मात्र लोकांना दिसायचें. बरं, चल मुद्दा राहिलाच बाजूला, तूं आलीस कीं सारखा गडगडाट होतो आणि म्हणे नांव वीणा. तुला काळ नाहीं वेळ नाहीं.

**वीणा:**—( हंसून स्वगत ) शाबास, झंकार, शाबास. ( उघड ) दादावर आरोप शाबीत झाला तर एकूण. दादाच्याविरुद्ध पुरावा कुठला मिळाला ?

**झंकार:**—अरविंदाच्या दुर्दैवानेंच पुरावा दिला. पण नलिनीमात्र

आतां अगदीं उघडी पडली. आणि म्हणूनच पापाचें क्षालन करण्यासाठीं अंशत. तरी उतराई झालेंच पाहिजे.

**वीणा:**--पण सर्व सांगा तर अगोदर.

**झंकार:**--विषाची कुपी त्याच्याच खिशांत सांपडली. मंदाकिनीचें व त्याचें झालेलें खडाजंगी भांडण तर जगजाहीरच आहे! त्याच दिवशीं अरविंद नेमका बागेंत कसा आला ? मंदाकिनीच्या प्रेताजवळच अरविंदाची गांधी टोपी पडलेली. मग काय मधुकरानें गांव गोळा केला व पोलीसानें पुरावा गोळा करून खटला भरला . साक्षीपुरावे झालेच आहेत. फक्त निकाल नाहीं दिला.

**वीणा:**—नलिनीचें नशीबच फिरलं झालं !

**झंकार:**--वीणे, प्रत्यक्ष माझ्यावर खुनाची शाबिती झाली असती तरी मी दुसऱ्याची झोपमोड केली नसती. पण फांशी जाणाऱ्या अरविंदाकरितां मी आज दिवसभर झोपेला दिली फांशी. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. उलट त्या साक्षीपुराव्याच्या धांवपळींत मंदाकिनीचें खरें मृत्यूपत्र मात्र पळविलें कुणीतरी ! ( आनंद येतो. ) काय रे लागला कां कांहीं पत्ता ?

**वीणा:**—( हंसून ) तो बेपत्ताच झाला असेल तर त्याचा पत्ता कुठला लागायला ?

**झंकार:**--मला त्याचा पत्ता लागलाच पाहिजे आतां. वीणे, चल प्रयत्न तरी करूं. ( जातात. )

**आनंद:**—( दडवलेलें मृत्यूपत्र काढून ) माझें एवढें संधान साधलें कीं मी शरसंधान केलेंच ! माझा बाण त्याच्या वर्मी लागणार ! नलिनीच्या नांवाचें हें मृत्यूपत्र सरला माझ्या हातांत येण्याचा अवकाश कीं, हल्लीं दिमाखानें मिरविणाऱ्या मधुकराला त्याच्या वैभवशिखरावरून मी खालीं ओढीन ! बरं, यदाकदाचित् नलिनी मिळाली नाहीं तर मुंडी तरी मुरगळतां येईल ? हा मधुकराचा गळफांस व ही सरलेची प्रेमाची भाडेचिठ्ठी, योग्य काळ येईपर्यंत मला लपवूनच ठेविली पाहिजे. झोपाळू झंकारानें हिच्याकरितां त्रिखंड पालथें घातलें; पण मुद्दाम लपविलेला जिन्नस सांपडावा कसा ? स्वार्थाच्या बाजारांत, परोपकाराची पेठ नेहमीं ओस पडा-

यचीच ! हा मानवी स्वभाव आहे. ( मृत्युपत्र कवितेच्या बाडांत लपवितो. ) मृत्यूपत्राच्या पैशाच्या उबेनें, अप्रकाशितपणामुळें मृतप्राय झालेली कविता तरी सजीव होईल आणि या कवीचें नांव जगापुढें आणील ! श्रीमंत कवींच्या प्रकाशित बाडांनीं आज वाङ्मयांत कोण गर्दी केली आहे ? यांचीं नांवें ज्यांच्या त्यांच्या तोंडीं ! आमचें नांव कुणाच्याच तोंडांत नाहीं ! पण आतां मात्र कुलवधुबरोबर, कीर्तिवधूही एकदमच माळ घालणारसें दिसतें.

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ३ रा.

( स्थळः--मधुकराचा महाल. सरला व मधुकर प्रविष्ट. )

**मधुकरः**--या. तोंड आतां कसें मिटवायचें ? त्यानें एकदां तोंड उघडलं कीं आमचे डोळे पांढरे झालेच !

**सरलाः**--आनंदाचें तोंड मिटवायला, त्याच्या तोंडावर नलिनीच टाकली पाहिजे.

**मधुकरः**—काय नलिनी ! आणि आनंदाला ?

**सरलाः**—( स्वगत ) याच्या तोंडाला नलिनीचें पाणी सुटलं वाटतं ! पण नलिनीचें पाणी मधुकराला मानवणार नाहीं मुळींच ! ( उघड ) काय हरकत आहे ?

**मधुकरः**--( स्वगत ) ही बिथरली तर मृत्युपत्रांतील गोम मला मृत्यु-पंथाला धाडील ! नाहीं तर अरविंदाचा फांस माझ्या गळ्याभोंवतीं पडेल. तेव्हां आतां खरोखरच तहान भागवली पाहिजे. ( उघड ) हरकत माझी नाहीं; पण नलिनीची हरकत आड यायची.

**सरलाः**—वेळ ओळखून तिलाही हरकत दूर करावी लागेल. म्हणजे मग आमची काळजी दूर झालीच !

**मधुकरः**—आनंदाचें पिशाच एवढें गाडलें कीं मग काम झालें ! पण आनंदाची नजर तुझ्यावर ! तो या अदलाबदलीला कुठला तयार व्हायला.

**सरलाः**--अगदीं एका पायावर तयार होईल. जुन्यापेक्षां नव्या पद-राचें अंगवस्त्रच धरायला फार बरं ! दिखाऊ व टिकाऊ तसेंच; व जरी पदर जुना असला तरी काय झालं ? घडी मोडलेली नसली म्हणजे झालं !

बरं मधुकर, तूं आतां वळव, मी नलिनीला जरा दम देतें ! ( सरला जाते. पडदा पडतो. )

---

## प्रवेश ५ वा.

( नलिनी अधोमुख बसली आहे. मधुकर येतो. )

**नलिनीः**—( स्वगत ) दैवानेंच दावा साधला तर देवाकडे दाद कुठली लागायला ? बाबा तुरुंगांत अडकले, आत्याबाईंच्या प्रकरणांत अरविंदांची मान अडकली; झंकारांच्या झोंपाळूपणांत मृत्युपत्र अडकलं आणि माझा हात या राक्षसाच्या जबडयांत अडकला !

**मधुकरः**--नलिनी, या घराचा मालक तुला हांक मारतो आहे.

**नलिनीः**--माझ्या नांवानें हांक मारण्याचें कारण ?

**मधुकरः**—इकडे वर बघ माझ्याकडे.

**नलिनीः**--माझ्या दुर्दैवाकडे बघवतच नाहीं मला ! काय आज्ञा आहे आपली ?

**मधुकरः**--तुला आनंदाबरोबर लग्न केलें पाहिजे.

**नलिनीः**—दुर्दैवानें मला आपल्या हातांत खेळणें बनवल्यावर, तें खेळवील तसें निमूटपणें खेळलेंच पाहिजे !

**मधुकरः**—आतां तुला प्रेमाचे खेळ सुचत नाहींत !

**नलिनीः**--माझ्या प्रेमाच्या खेळांतील खेळगडी, खेळ अर्धाच टाकून उठून गेले म्हणून माझ्या प्रेमाचा तुम्हीं खेळ मांडला आहे काय ? मधुकर, आत्याबाईंना दिलेल्या विषाचा अवशेष मला द्याल तर मरतांना, मोकळ्या मनानें तुम्हांला दुवा देईन.

**मधुकरः**--तें वीष, तुझ्या त्या जिव्हाळ्याच्या जिवलगाजवळ आहे. पण विषाची परिक्षा आतां कशाला उगीच ! नलिनी, माझ्या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहींस !

**नलिनीः**—उत्तराजोगा प्रश्न नाहीं तर त्याचें उत्तर काय देऊं, कपाळ ?

**मधुकरः**—कपाळाच्या कुंकवाचा धनी म्हणून तुला आनंद दिलाच आहे. पण तुझ्या सुंदर देहाचा धनीपणा मात्र माझ्याकडे आला पाहिजे !

**नलिनी:**--आपण काय बोलतां आहांत याचें भान आहे का आपल्याला ? शुद्धीवर आहांत ना नीट ?

**मधुकर:**—मनाला बेभान करणाऱ्या सौंदर्यासमोर प्रेमाला कसलीच शुद्ध रहात नाहीं ? अरविंदाबरोबर चोरून पळून जातांना तूं शुद्धीवर होतीस कां ? बागेंत त्याच्याशीं चोरून प्रेमभेटी घेतांना तुझी शुद्धी जागेवर होती कां ?

**नलिनी:**--मी अरविंदांची वाग्दत्त वधू आहें. आमच्या भेटींत कांहीं पापसंबंध नव्हता ! शास्त्राला—

**मधुकर:**--शास्त्राच्या वल्गना मजजवळ नकोत. नलिनी, माझा व्यवहार रोखीचा असतो. मला वायद्याची दिरंगाई खपत नाहीं ? माझ्या प्रेमाचें शिक्कामोर्तब सुंदर सनदेवर आजच झालें पाहिजे ! ( जवळ जातो. नलिनी हात जोडते. )

**नलिनी:**—द्रौपदीची लाज राखणाऱ्या देवा, आतां माझी लाज तुलाच ! भक्ताच्या हांकेला ओ देणाऱ्या परमेश्वरा, आतां मी दुसऱ्या कुणाचा धांवा करूं !

**मधुकर:**--देवाच्या नांवानें मी दचकणार आणि पापपुण्याच्या भीतीनें गांगरणार नाहीं. माझ्या दगडी अंतःकरणावर, शब्दांचा कितीही पाऊस पडला तरी दयेचा कोंबसुद्धां तेथें उगवणार नाहीं ? तुझ्या देहाच्या दिंडीदरवाजावर माझ्या प्रेमाचा किरण पडला कीं मनाच्या महालांत सुखाचा लखलखाट होईल ! चल हो तयार. ( जवळ जाऊन हात धरतो. )

**नलिनी:**—धरा भाऊराय, धरा आपल्या धाकट्या बहिणीचा हात ! बहिणीची लाज भावावांचून दुसरें कोण राखील ! भाऊ, मी तुमची धर्माची बहीण-( हात सोडून देतो .)

**मधुकर:**--( दचकून ) काय ? नलिनी माझी बहीण-माझी धर्माची बहीण-ती मला भाऊ म्हणते ! हें काय ! माझ्या मृतबहिणीचें मूर्तिमंतचित्र केविलवाण्या नजरेनें माझी करुणा भाकीत आहे ! ती पहा ! ती पहा ! माझ्या प्रेमळ मातेची क्रुद्ध दृष्टी ! मजवर आग पाखडीत आहे ! ताईची केविलवाणी मुद्रा आणि आईची रागावलेली दृष्टी माझ्यावर सारखी रोखली आहे ! नको नको, ताई, दीन मुद्रेनें माझ्याकडे पाहून माझ्या मनाचें पाणी पाणी करूं नको ! काय ! पापपुण्याला पायीं तुडविणाऱ्या

हृदयांत मातृप्रेम–भगिनीप्रेम यांना थारा आहे ! बालपणापासून विस्मृतीच्या अंधारांत दडून, विचारांच्या टप्प्याबाहेर गेलेलें माझें मातृप्रेम, भगिनीप्रेम, माझ्या कानांत सारखें ओरडत आहे कीं, नलिनीची लाज राख, नलिनीची लाज राख ! माझ्या डोक्यांत विचारविकारांचें भयंकर रणकदन माजलें आहे ! जा, मंगल मातृप्रेमा, जा; मी नलिनीची लाज राखीन. जा, प्रेमळ भगिनी जा, मी माझ्या बहिणीची–नलिनीची लाज राखीन. ( हळूंच ) नलिनी, माझ्या सावलीलादेखील उभी राहूं नकोस ! माझ्या मनाचा मलाच भरंवसा देतां येत नाहीं !

**नलिनी**:—मी आतां जाऊं कुठें ? उघड्या जगांत मला कुठें थारा मिळेल ? उदार मनाचे व निर्मल वर्तनाचे झंकार मला दूर लोटतील कां ? पण त्यापेक्षां बाबांचें उद्योगभुवनच बरें. ( जाते. )

**मधुकर**:—(स्वगत) नलिनीनें मला मोहिनी तर घातली नाहीं?हा दुसरा प्रसंग ! सरला तरी सरळ वागेल कीं नाहीं ! मनाला नुसती आग लागली आहे. प्रेमाच्या प्रवाहांत आकंठ बुडल्यावांचून आग विझणार कशी ? नलिनीचें नशीब नलिनीबरोबर !

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ५ वा

( **स्थल**:—उद्योगभुवन, नलिनी व वीणा. )

**नलिनी**:––झंकारांनीं माझ्या सुखाकरितां जहागिरीवर पाणी सोडलेलें ऐकून माझ्या जीवाचें पाणी पाणी झालें आहे. वीणे, वेडी आहेस तूं ! अरविंदांची विश्ववैभवाची वैजयंती गेली तुटून, आणि आतां दगडांची माळ घालूं गळ्यांत ? माझा भाग्याचा भगवंत भंगला आणि आतां हे दगडी चिरे सांधूं म्हणतेस ? माझ्या प्रेमाचा परमेश्वर नवसाला पावत नाहीं म्हणून या दगडी म्हसोबाची पूजा बांधूं ? तुझे भीमासारखे भाऊ कौरव कारस्थानानें यमुनाजळीं बुडविले म्हणून डोळ्यांच्या जलधारा पुसून माझें शांतवन करतेस ! वीणे, प्रेमळ जीवा, तुझ्यावरून माझ्या जिवाचें निंबलोण करीन ! देवा, या लक्ष्मीनारायणाच्या जोडप्याला विश्वाचें वैभव दे ! जा, झंकारांना माझा नमस्कार सांग. झंकारांची जाहगीर घेऊन मी आतां काय करूं !

वेड्या जीवा, जा आतां ! वीणाझंकारांचा संसार सुखाचा होईल ! सुखाच्या संसाराचें दान द्यावें लागतें त्याशिवाय आयुष्याच्या डावांत तें दान पडतच नाहीं कधीं ! वीणे, जा आतां, माझ्याकरतां तूं कां दुःखी होतेस ? देवानें आपल्याला आंधळें केलें म्हणून लोकांचे डोळे तर फोडायचे नाहींत ? ( वीणा जाते. ) या उद्योगभुवनांत अरविंदांनीं बांधलेल्या देशसेवेच्या मंदिरावर मी प्रेमसेवेचा कळस चढवीन ! आतां ही संन्यस्त नलिनी प्रेमसेवेच्या ध्यानांत मग्न होणार ! विषयी जगाची जाचवणूक थोडी का झाली ? ( सागर येतो. ) देवा, तुझ्या घरीं दया नाहींच का ?

**सागरः**—आतां या हतभागी मनाचें समाधान कसें करूं ? देवा, काय हा प्रसंग ? सोन्यासारख्या मुलांना संसारांतून उठवलेंस त्यापेक्षां माझे डोळे तुरुंगांतच कां नाहीं मिटवलेस ? तुरुंगांतील हालअपेष्टा पुरवल्या पण या निरपराध जीवांचे हाल पाहवत नाहींत ; ( नलिनी सागराला मिठी मारते. )

**नलिनीः**—बाबा–( रडते ).

**सागरः**–काय बाळ ?

**नलिनी.**—भेटले कां ते तुम्हांला ! त्यांच्यावांचून मला चुकल्या चुकल्यासारखें झालें आहे ! दुर्दैवाचा मारा चुकत नाहींच ना ?

**सागरः**—कसा चुकेल बाळ ! अरविंद, अनत्याचारी असहयोगांतील प्रेममणी आहे ! त्यानें वकील देऊन बचावसुद्धां करण्याचें नाकारलें ! झंकारानें शिकस्त केली, पण व्यर्थ ! आभाळ कोसळूं लागलें तर दैवाशिवाय दुसरें कोण आडविणार त्याला ! बाळ, माझी छाती फाटून गेली आहे या प्रकारानें !

**नलिनीः**—फाटलेल्या छातीला देशसेवेचें ठिगळ लावून, बाबा, तुम्हाला दिवस ढकलतां येतील !

**सागरः**—सुखाला आंचवलेल्या मनाला कुठेंतरी कामांत गुंतविलेंच पाहिजे. बाळ, निराश होऊं नकोस. देवाची दया एक दिवस सुखाचा दाखवीलच.

**नलिनीः**—जगाची आशा अमर असली तरी माझी आशा मात्र आतां मृतप्राय झाली आहे. ( पडदा पडतो ).

---

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

( स्थलः-यशवंताचें घर, कैलास प्रविष्ट. )

**सरलाः**--(स्वगत) आतां आली पंचाईत. नलिनीचा बाण आमच्या हातांतून निसटल्यामुळें आतां हा आनंद मधुकरावर बाण रोंखणार, मरणाच्या खड्ड्यांत पडतांना तो कावेबाज कांवळा माझ्या नांवानें कावकाव करून सगळ्या गांवाला गोळा करील! नलिनीचा डबा स्वार्थत्यागाच्या सांध्यानें सन्मार्गाच्या रुळावर लागला; पण स्वार्थाच्या सांखळीनें सांधलेले आमचे डबे मात्र आतां एकमेकांवर आपटून त्यांचा चक्काचूर होणार! त्यांतून अंग चोरून सुखरूप बाहेर पडलें पाहिजे. आनंदानें मधुकराचें नरडें दाबलें कीं, मला मात्र तोंड बांधून बुक्क्यांचा मार होणार! आलाच हा कोपिष्ट कैलास! आतां कानठळ्या बसेपर्यंत कडकडाट होणार.

**कैलासः**---( स्वगत ) न्यायमूर्ती येण्याच्या आंतच सगळा सोक्षमोक्ष करून टाकला पाहिजे. ( उघड ) सरले, हे छक्केपंजे आतां पुरेत. तुझा लपंडाव सरणार केव्हां? किती दिवस आणखी तूं मला असाच खेळवणार आहेस? माझ्या सुखाचे आतां बारा वाजलेच म्हणा. हें पहा, बारमाही नदीला पाणी रहावें अशी इच्छा असेल तर तिच्या पाण्याला पाट फोडून चालायचे नाहीं. तिला उलटा बांधच घातला पाहिजे. तुझ्या प्रेमाचा ओढा जर त्या मधुकराकडे असला तरी मी तोंड उघडल्याबरोबर तुझ्या प्रेमाला बांध घातलाच म्हणून समज.

**सरलाः**---पण असा त्रागा कां उगीच? माझें त्या मधुकरावर मुळींच प्रेम नाहीं.

**कैलासः**---तो निव्वळ उलट्या काळजाचा गळेकांपू आहे. त्यानें खोट्या मृत्यूपत्राच्या कात्रीनें नलिनीचा गळा कांपला. त्याच्याच कपटनाटकाला अरविंदासारखा बाणेदार माणूस बळी पडला. मंदाकिनीची तर गठडीच वळली. नलिनीसारखी साध्वी दीन गाय झाली. अरेरे, ती पतिव्रता---

**सरला**:--नलिनीला अजून पति तरी आहे कां ? मग पतिव्रता कशी ? कवीच्या बहकण्याला काव्य म्हणतात !

**कैलास**:--मला चिडवूं नकोस उगीच ! तिनें पती नसतांनासुद्धा पातिव्रत्य राखल आणि तूं ?

**सरला**:--बस्स झाली वाचाळपंचविशी. कोणासमोर बोलतां हे शब्द.

**कैलास**:--( स्वगत ) अस्सं काय ? आतां निर्वाणीचाच बाण सोडला पाहिजे. ( उघड ) कोणासमोर ? ऐक, एका बाजारबसवीसमोर. बस्स, पुरे झाला हा पाशवी प्रेमाचा धिंगाणा. आतां तुला निक्षून विचारलें, तूं दिलेलें वचन पाळणार कीं त्या उपटसुंभामागें धावणार ? बोल. माझ्या आशेचा शेवटचा धागा तुटेपर्यंत मी वाट पाहीन. नाहींतर प्रथम त्याला तुरुंगाची वाट दाखवीन.( मधुकर मागें येतो. )आणि मग तुझीही वाट लावीन. कवी रागावला म्हणजे सगळ्या जगाला भस्म करून टाकील माहीत आहे का तुला ?

**सरला**:—( हळूंच ) मी त्याला कामाकरितां झुलवलें. माझं प्रेम दुसऱ्या कुणावर बरं असणार ?

**कैलास**:—( सानंद ) मग मधुकर मेला आतां ठार. हें पहा खरें मृत्यूपत्र. आतां तरी मधुकर मृत्यूपंथाला लागेल कीं नाहीं ?

**सरला**:—अगबाई, हा तर प्रत्यक्ष पुरावा !( मधुकर झडप घालतो. )

**मधुकर**:-तो पुरावाच पुरून टाकतों म्हणजे झालं. ( कैलास त्याला खालीं पाडतो व मृत्यूपत्र घेतो. दार वाजतें. )

**कैलास**:—ताकद पाहून अंगलट करीत जा. हा पुरावा तुझ्या अंगावर चांगलाच शेकणार. सरले, ते दार उघड जा. आपल्या दोघांना बांचवून मी याची गठडी वळतों. ( सरला जाते. ) माझ्या अंगाचा नुसता भडका उडाला आहे. देऊं कां तुझ्या अंगाला आग लावून पाजी, बदमाष—

( यशवंत येतो ).

**यशवंत**:—कैलास, काय गडबड आहे ? अरे, डॉक्टर. तुम्ही कोठें इकडे, आणि दंगल कसली इथें ? घरधणीन घरांत असतांना घराचा चव्हाटा कसा झाला ? आणि हा कागद कसला ?

**कैलास**:—लीजिये हुजूर, ये खतके लिये.

**यशवंतः**—( यशवंत वाचून रागानें ) शिपाई, बांधा याच्या मुसक्या. मला संशय होताच थोडा. जमादार, अरविंदाच्या फांशीच्या तहकुबीचा हा हुकुम तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना द्या.

**मधुकर**—न्यायमूर्तीकडूनच अन्याय होत आहे.

**यशवंत**—चूप, स्वार्थी कुत्र्यानें मला शिकवायला नको, जा. काय रे हा कागद कुठें सांपडला तुला ? तो बेरड इथें कशाला आला होता ? आणि घरांत दंगामस्ती कोणी केली ?

**कैलास**—सुनीये साहाब, कल बडीफजर ह्य जब इदर आतेथे तो रास्तेमे सरदारसाबके मकानके नजदीक मे खत पडा था. तो हमने रख दिया. यह मालूम नही इस्मे क्या है. आज वो जमादार आगये और हमकू बहोत सताया उस खतके लिये. हमन वो कागद बाईसाहबकू दिखाया.

**यशवंतः**--पण दंगामस्ती कां झाली ?

**कैलासः**--डागदार इधर मैफल मचाने लगे, हमने उसकू गिरा दिया. हम आपकाही इतजार करते थे. तो हुजूर आगये.

**यशवंतः**—( स्वगत ) हा निर्दोषी दिसतो. याला तर वाचवलाच पाहिजे. ( पैसे देऊन ) हा ४ महिन्यांचा पगार, जा पळ काशीला. पुन्हां तोंड दाखवूं नकोस येथें. नाहीं तर कांहीं तरी तोहमत येईल.

**कैलास**—विशंभर आपका कल्याण करे. (जातो.)

**यशवंत**--तुझा हात किती भिजला आहे या प्रकरणांत ? खरें सांग, आतां दयामाया नाहीं. न्यायाचा धारवाडी कांटा आहे हा.

**सरलाः**--न्यायाधिशाची राणी आहें मी. मला शंभर खून माफ. मला कांहींच माहिती नाहीं या उलाढालीची. कैलास देवडीवर असतांना ते डॉक्टर त्याला कसला तरी कागद मागत होते. त्यानें मजकडे तक्रार केली. दोघांची झोंबाझोंबी झाली. मी दारांत आपली वाट पहात बसलें व दारही मींच उघडलें.

**यशवंत**--अग उगीच रागानें बोललों. रागावलीस कीं काय ?

( सरला लाजते, पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा

( **स्थळः**—बॅक बे, सरला उभी, रात्रीची वेळ )

**सरलाः**—( स्वगत ) या खटल्याचा निकाल ऐकण्याच्या अगोदर आपला निकाल लावून टाकला पाहिजे. डॉक्टरांच्या जबानीच्या जहरी विषानें, घरच्या पायांची आग मस्तकाला जाईल आणि घरांतल्या होमांत जन्मभर जाळीत राहील. अरविंदांना तोंड दाखवायला मला आतां जागा नाहीं, नलिनी तर मजबरोबर अबोलाच धरील, आणि बोलभांड वीणा तर असें कांहीं तोंड सोडील कीं कांहीं बोलायची सोय नाहीं. आतां कशाला जगायची तरी आशा ? ( आनंद येतो. )

**आनंदः**--आशा हें अमृत आहे ! आशा हें काव्य आहे ! आशे-वरच जग झुकतें आहे ! आशेच्या अभावीं प्रेमाचे प्राण कंठाशीं आले असते. बरं झालं. जिवावरच बेतलं होतं, पण नोकरीवरच निभावलं. मला माफीचा साक्षीदार बनवून आमच्या धन्यांनीं माझा गळा सोडवून घरची अब्रूही वाचाविली. आतां या मुंबईला रामराम. फक्त सरलेकरितां जीव घुटमळतो आहे. माझा आणि प्रेमाचा काय बारावा बृहस्पति आहे का काय ? चांगला बृहस्पतीसारखा कविता करतों अन् एकही तारा मिळेना !

**सरला**--(स्वगत) जगाचा लोभ सुटत नाहीं, जिवाची आशा तुटत नाहीं. पण आतां जगाबरोबर जीवालाही पाणी दाखविलें पाहिजे. देवा, जरठ-कुमारी विवाहाच्याहोमांत सुखाची आहुती टाकावी लागली. आतां ही पंचप्राणांची पूर्णाहुती घे. ( उडी टाकूं लागते. मागून आनंद येऊन तिला धरतो. )

**आनंद**--कोण ? सरला ? माझी प्रेमळ सरला ! माझ्या सुखाचें सार ! माझ्या ध्यासाचें ध्यान ? सरले, आनंदाला सोडून कुठें चालली होतीस !

**सरलाः**--देवाच्या घरीं दाद मागायला.

**आनंदः**--चल मीही येतों. पण वाट चुकलीस तूं देवाच्या घरची वाट वर आहे. समुद्रांतली वाट पाताळांत जाते. कैलासाला जायला हिमा-लय गांठला पाहिजे. आनंदाचा हात धरलास तर कैलासारोहण होईल.

**सरलाः**--माझा हात सोडा. माझा हात धरलांत तर पदरीं पाप पडेल.

**आनंदः**--(स्वगत) हिचा अजून पीळ गेला नाहीं. जरा तार पिळलीच पाहिजे. (उघड) अरविंदाचे पाय धरून तूं कोणत्या पुण्याचें साधन करीत होतीस ? मधुकराला घिरट्या घालायला लावून काय पुण्य जोडीत होतीस ? मला लग्नाचें वचन देऊनही फसविलेंस. सरले, झालें तें झालें. पळतां क्षण सोन्याचा आहे, चल.

**सरलाः**--सोन्यासारख्या घरावर तुळशीपत्र ठेवलं तें कांहीं पळून जाण्याकरितां नव्हे. पापपुण्य--

**आनंदः**—प्रेमाच्या राज्यांतून पापपुण्य हद्दपार झालं ! चल, प्रेमळ जीवा, आतां नको अंत पाहूस. सोन्यासारखें आयुष्य मातीमोल करण्यांत काय फायदा ? अन् त्यांतून मी कवी आहें. मी प्रेमाकरितां जगावर लाथ मारीन.

**सरलाः**—पण जग नांवें ठेवील ना ?

**आनंदः**--आपण मेल्यावर जग बुडालेंच. चल, आपण महाराष्ट्राला सोडून उत्तरेंत जाऊं; ही प्रेमसेवा देवाच्या घरीं रुजूं होईल.

**सरलाः**—नाहीं. आनंद, नाहीं, माझ्या प्रेमसेवेला धर्ममार्तंड शाप देतील, फाजील शिष्ट नाकें मुरडतील, पोरेंढोरें टवाळ्या करतील. नको, आतां नको सुखाची आशा.

**आनंदः**--भटांनीं मध्यें फडकें धरलें म्हणजे लग्न होत नाहीं, पैशाच्या पिशव्यांनीं पोट भरलें तरी प्रेमाची उपासमारच होते. लग्नाच्या जुन्या कल्पना बदलून नव्याचा पगडा आपणच प्रथम पाडूं. चल, आपलीं हीं दोन पळपुटीं पात्रें या नाटकांतून पळून गेलीं तर जरा गर्दी तरी कमी होईल.

**सरलाः**--मनाचा मोह सुटत नाहीं आणि आशा मरत नाहीं. मीं ठेवलेलें पत्र वाचून घरीं लागलीच दुसऱ्या लग्नाची तयारी होईल. देवा, गतपापाचें क्षालन करण्यासाठीं समुद्रांत उडी घेऊं कीं भावी सुखाच्या लाभासाठीं पापपंकांत बुडून जाऊं ? मनाविरुद्ध झालेल्या लग्नाचें बंधन तोडणें हें पाप, का मनासारख्या आनंदाबरोबर पत्नीत्वानें राहणें हें पुण्य ? देवा, माझा जीव भांबावून गेला आहे ! दुःखाच्या लाटांबरोबर झगडतांना सुखाचें तीर दिसूं लागलें आहे, तें गांठूं का या समुद्राचा तळ गांठूं ? नका. आनंद, माझ्या मनाला आतां मोह पाडूं नका. जा. तुमचं जिणं परतंत्र

नाहीं, सुखानं संसार करा, तुमच्या भाबड्या पण प्रेमळ स्वभावाची पारख मला आहे. नको, नको ती जुनी गोड आठवण. सोडा माझा हात. जाऊं द्या मला.

**आनंद**:--सरले, काय वेड तुझ्या डोक्यांत शिरलें आहे हें ? पंचमहाभुतें यावेळीं खवळलीं आहेत. तुफान खवळलेल्या दर्यावर लाटा नाचत आहेत. अंधारानें आभाळ खाऊन टाकलें आहे. मरणाची कल्पना कवितेंत खुलवून लिहिणारे कवीसुद्धां मरणाच्या मगरमिठीनें मुर्दाड बनतात; मग तूं तर काय अबला ! सभोंवती ही काळरात पसरली आहे.सरले, ही काळरात आहे.

**सरला**:--आनंद, माझ्याकरितां कष्टी होऊं नका. ही पहा, काळरात मला खुणावीत आहे. देवा, कृतापराधांची क्षमा करा. ( हात सोडवून उडी घेते. )

**आनंद**:—( दचकून ) हाय ! हाय ! गेली, माझ्या संसारसुखाची नांव बुडाली. ! माझ्या प्रेमाचें स्वप्न विरघळलें. ! आतां स्वप्नमय आयुष्यांत काय मौज आहे ? सुखाची आशा सरली आणि दुःखनदी मात्र तुडुंब भरली. अभागी जीवा, आतां कुठं जाणार ? सरलेचा तळमळणारा जीव आतां मोकळा झाला आणि या उघड्या जगांत आतां माझं असं कांहींच राहिलं नाहीं. बस्स, मरणाची कल्पना मनाला शिवण्यापूर्वींच मनाला या पाण्याच्या थडग्यांत पार गाडून टाकलं पाहिजे. हें जग म्हणजे निव्वळ एक पागलखाना आहे ! पैशाच्या वेडानं त्या मधुकरानें प्राण गमावले, देशसेवेच्या वेडानें अरविंदानें प्रेम गमावलें आणि प्रेमाच्या वेडानें मी सरलेला मुकलों. ( अश्रू पुसून ) स्वर्गप्रवेशाच्या वेळीं ही अश्रूंची खैरात अमंगल आहे, हाच माझ्या प्रेमसेवेचा शेवट. ( हात जोडून ) माझ्या मायदेशाला रामराम, महाराष्ट्र शारदेला हा शेवटचा प्रणाम, अभागी आनंदा, आतां प्रेमाकरिता राम म्हण. ( उडी टाकतो. )

## प्रवेश ३ रा.

(स्थल:--झंकाराचा दिवाणखाना. झंकार निद्रिस्त. मोहन प्रविष्ट.)

**मोहन:**—( स्वगत ) स्वारींच्या झोपेंचं सत्व घेऊन आज प्रेमाची खरी परीक्षा पाहिलीच पाहिजे. ( उघड ) सरदारसाहेब, अहो सरदारसाहेब. ( झंकार नुसता बाजूला वळतो. )

**मोहन:**—सरदारसाहेब, अहो, सरदारसाहेब.

**झंकार:**—कोणाचा प्राण चालला आहे सरदारावांचून ?

**मोहन:**--सरदारसाहेब, अहो, सरदारसाहेब.

**झंकार:**--सरदार गेला स्वर्गाला. हांका मारणारा कुठें पाताळांत दडला आहे काय ?

**मोहन:**—सरदारसाहेब.

**झंकार:**--( उठून ) सरदाराच्या राशीला लागलेल्या सैताना, असा आडून कां गोळ्या घालतोस माझ्या झोपेला ? पुन्हां जर माझ्या नांवानं शंख केलास तर—

**मोहन:**—अहो—

**झंकार:**—परमेश्वरा, सुखानं झोप घेऊं द्यावयाची नसली तर काळझोप तरी येऊ दे. पण हें भरदिवसा जाग्रण नको. ( निजतो. )

**मोहन:**—अहो सरदारसाहेब.

**झंकार:**—( उठून शोधतो. ) या घराला आग लावून देऊं कां ? ( मोहनला पकडतो. ) अरे चोरा, माझी चोरी करून कुठें दडला होतास ? ( स्वगत ) पण मृत्यूपत्राचा चोर तर हा मुळींच नाहीं.

**मोहन:**—काय मी चोर ? काय चोरलें मीं आपलें.

**झंकार:**--( हंसून ) मन.

**मोहन:**--झोंपेच्या नादानं मन बहकलं आहे वाटतं. मनाला वाटेल तसें सोडलें आहे काय ? आपलं मन चोरायला मी काय स्त्री आहें वाटतं ?

**झंकार:**—मोहन, क्षमा कर, रागावूं नकोस. तूं गेल्यापासून मी दिवस कसे काढलें हें माझं मलाच माहीत.

**मोहन:**—अगदीं असेच झोपून ना ? बरं, माझ्या कामाचे दाम मागायला मी आलों आहें. यापुढें नोकरीला रामराम.

**झंकारः**--कां रे बाबा, कंटाळलास कां ?

**मोहनः**--अहो, आपला नोकर म्हणून. जमलेलं लग्न फिसकटत होतं, आपली दिगंत कीर्ति मला नडूं लागली. आपला पिढिजाद आळस—

**झंकारः**—पाल्हाळाशिवाय सरळ सांग पाहूं काय झालें तें.

**मोहनः**--माझ्या वाग्दत्त वधूनें असा हेका धरला आहे कीं, मी आपली नोकरी सोडावी.

**झंकारः**—कां बरं.

**मोहनः**—अहो, वाण नाहीं पण गूण लागायचा. म्हणून म्हणतों माझ्या नोकरीची ही सोडचिठ्ठी घ्या व माझ्या पगाराची हुंडी पटवा.

**झंकारः**--बरं, एक काम तर कर. हें एवढें पत्र वीणेला नेऊन दे. कां रे, लाल कां झालास कोणाला वाटेल कीं, तुझ्याच बायकोला पत्र देत आहें म्हणून तूं रागावलास.

**मोहनः**—वाटेल कशाला ? वाटतेंच ना. वीणा, हीच माझी वाग्दत्त वधू आहे.

**झंकारः**—मोहन, शांकरी घेतली नाहींस ना ? कां तारेंत कांहीं बडबडतो आहेस ?

**मोहनः**—मी आपलें दौत्य करणार नाहीं. मी पुराणांतला नळराजा नाहीं.

**झंकारः**—(स्वगत ) हें खरें असेल कां ? तरीच वीणा आजकाल इकडे अगदींसुद्धां फिरकत नाहीं. मोहन कशाला उगीच खोटें बोलेल ? ( नोटा देतो व मोत्याची माळ देतो. ) जा मोहन, सुखानें संसार कर. तोंडाळ वीणेला तूं हिकमती नवरा चांगला शोभशील, जा. हा झंकार तुझ्या सुखाचा हेवा करणार नाहीं. वीणेला सांग कीं, आळशी झंकार आज मरण पावला, आणि उद्योगी झंकार जन्माला आला. (स्वगत) वीणेनं माझ्या डोळ्यांत अगदीं झणझणीत अंजन घातलं आहे. मोहन, वीणेला हा कंठा माझा आहेर म्हणून अर्पण कर. काय-(अश्रू पुसतो तोंड बाजूला फिरवतो.) प्रेमाची निराशा आतां जन्माची सोबतीण होणार.

**मोहनः**--( स्वगत ) स्वारींची थट्टा केली पण प्रेमाला बट्टा लागणार नाहीं ना ? ( उघड ) जाऊं मी सरदारसाहेब. ( हंसतो. )

**झंकारः**--जा-जा. ( अश्रु पुसतो. ) अरविंदानें देशसेवेची वाट धरली म्हणून नलिनी त्याच्याकरितां झुरते आणि मीं देशसेवेची वाट सोडली म्हणून वीणा माझ्या हातून निसटली. वीणा अगदीं स्वतंत्रवृत्तीची आहे. ती माझ्यासारख्या आळशाची थोडीच पर्वा करणार आहे ? चला, प्रथम या विलायती कपड्यांची होळी, (कपडे उतरून ठेवतो.)व धूम्रपानाला रजा. बस्स ठरलं, आजपासून देशी मालानेंच हा आळशी देह सजवायचा. वीणे, मला तूं उत्तम धडा शिकविलास. चल, आतां सागरांचा उद्योगभवनांत आजन्म सेवकाचें काम करायचें ? ( पडदा पडतो )

---

## प्रवेश ३ रा.

( **स्थल**—सागराचें उद्योगभवन, सागर व गिरीश उपस्थित. )

**सागरः**--रावसाहेब, आपल्या मतांतील फेरबदलानें देशांत वारा कोणत्या दिशेनें वहात आहे याचा कयास करितां येईल. दैव देशाला सुदीन दाखवील यांत संशय नाहीं.

**गिरीशः**--महात्म्यांची वाणी कधीं अन्यथा होत नाहीं. नोकरीच्या पाशांतून मन मोकळें होतांच जर वैयक्तिक स्वातंत्र्यांत सुखसमाधि लागते तर पूर्ण स्वातंत्र्यानें देशाला सुखलाभ कां होऊं नये ? माझा अरविंद देशसेवेच्या कसोटीला उतरला ना ?

**सागरः**--होय. अरविंद स्वार्थत्यागी आहे, नलिनीचें धन देशसेवेला उपयोगी पडेल. स्वातंत्र्याच्या झगड्यांत महात्म्यांचें तप उपयोगी पडतें, राजकारणी मुत्सद्यांचे डावपेंच कामीं येतात. स्वार्थत्यागी तरुणांची हिंमत कसाला लागते. धनिकांचा उपयोग होतो. देशांतील यच्चावत प्राणिमात्रांची स्वातंत्र्याकरितां धडपड सुरू झाली कीं जुलमी राजसत्तेचें धाबें दणाणून जातें. ( अरविंद, नलिनी येतात. )

**अरविंदः**--बाबा, वीणा कुठें आहे ? आणि अझून झंकारांचाही पत्ता नाहीं. ( झंकार येतो. ) झंकार, वीणा कुठें आहे ?

**झंकारः**--वाः, तिचें आज मोहनबरोबर लग्न आहे ना.

( नलिनी हंसते. )

**अरविंदः**--मोहन ? कोण मोहन ?

**झंकारः**--मोहन--माझा नोकर.

**गिरीशः**—नॉन्सेन्स. वीणा तुमच्या नोकराला देऊं केली नसून तुम्हाला देऊं केली होती. वीणा मोहनला आम्ही देणार नाहीं. ( मोहन येतो. )

**मोहनः**--कां बरं ? मी योग्य नाहीं कीं काय ?

**गिरीशः**--अलबत्, न सांगतां कळणारी गोष्ट आहे ही ? बरं, पण आमच्याशीं वितंडवाद घालणारा तूं कोण उपटसुंभ ?

**मोहनः**--मी मोहन. आपला भावी जामात, आपल्या कन्येनं स्वतःच्या पसंतीनें ठरविलेला मोहन.

**अरविंदः**—( स्वगत ) आवाज कुणाचा बरं हा. ( प्रकाश ) तुझा धंदा काय हें ध्यानांत आणून तरी वृथा वल्गना करूं नकोस. तूं वीणेला मुळींच शोभणार नाहींस. चल, येथून चालता हो.

**मोहनः**—कां, मी झोपाळू आहें काय ? का गर्भ श्रीमंत आहें ? का कुरूप आहे ? लाथ मारीन तेथें पाणी काढणारा मी, उद्योगी व महत्वाकांक्षी माणूस आहें. माझे धनीसाहेब जर एकाद्या वधूला आवडले नाहीं तर तिच्यावर कां जुलूम व्हावा हें मला समजत नाहीं. नेभळट व ऐदी श्रीमंतांपेक्षां कर्तव्यदक्ष व उद्योगी वरच वीणेला जास्ती पसंत पडेल.

**गिरीशः**—तो प्रश्न आमचा आहे, तुझा नाहीं. तुझ्या उर्मट शब्दांच्या वेषावरून तुझा उडाणटपू पेशा सहज ओळखितां येतो. नुसत्या रूपसंपत्तीनें वधूवरांच्या विवाहवृक्षाला पोराबाळांच्या बेसुमार वाढीनें दारिद्र्याची कीड मात्र लागते. गोड चेहरा बघायला फार चांगला असेल पण—

**मोहनः**—त्याच गोड चेहऱ्याच्या जोरावर तुमची वीणाच काय पण ही नलिनीसुद्धां मी सहज वश करीन. ही पहा ( जवळ जाऊन नलिनीचा हात धरतो. नलिनी सलज्ज उभी राहते. सर्व मंडळी ताडकन् जागेवरून उठतात. ) रावसाहेब, वयाच्या वडिलकीच्या दलालामार्फत वधूवरांची निवड होण्याचे दिवस गेले. मनाला पटेल तें रूप आणि रूपाला साजतील तीं वधूवरें. अहो, तुम्ही एवढे स्त्रीस्वातंत्र्याचे भोक्ते ना ? मग वीणेवर तुमचीं मतें कां लादता ? स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रीशिक्षण, अबलोन्नती, प्रौढविवाह, इत्यादि विषयांवर चुरचुरु बोलतांना ते शब्द ओठावरच विरून जातात वाटतें

तुमच्यासारख्या बोलघेवड्या सुधारकांनींच स्त्रियांना दास्यांत ठेवलें आहे. बरोबरच आहे, सगळा जन्म नोकरींत गेल्यामुळें स्वतंत्र विचार डोक्यांत शिरणार कुठून ? नोकरी करावी, बँका भराव्यांत, फावल्या वेळीं सुधारणेच्या लंब्या लंब्या गप्पा माराव्यात आणि नालायक श्रीमंतांच्या गळयांत आपल्या पोरी बांधून राजकारणाकडे कानाडोळा करणारांना कर्तबगार पण गरीब तरुणांचा राग यावा यांत काय नवल ?

**गिरीश:**--मला तर वेड लागायची पाळी आली आहे. एवढासा हा नोकर आणि जीभ लांब करून बोलतो कसा हेंच आश्चर्य. झंकार हें रत्न कुठें पैदा केलेंत ?

**अरविंद:**--(स्वगत) स्त्रीचरित्र गहन आहे. नलिनी स्वस्थ या उपटसुंभाच्या हातांत हात घालून हंसत आहे. याचा अर्थ काय ? त्याचा प्रतिकारसुद्धां तो करीत नाहीं.

**मोहन:**—(स्वगत) सर्वांचे चेहरे मात्र पाहाण्यालायक झाले आहेत. यांच्या मनांत रसरसणारा राग सगळ्या जहालांना स्वराज्यप्राप्तीपर्यंत तरी सहज पुरेल. प्रत्येकजण नुसता रागानें जळतो आहे.

**झंकार:**--नोकरानें धन्याची मानहानी केली तर नोकराची मान छाटली जाईल.(मोहनची मान पकडून)निर्लज्ज जनावरा, बोल कोणती शिक्षा करूं.

**मोहन:**—झोप घेतली आहे कां पुरती ? झोपाळू धन्याच्या अंगांत तेवढें पाणी असतं तर काय न होतें ? धनीसाहेब, झोप घ्या झोप जरा. जगांतल्या सगळ्या उपयुक्त चळवळींकडे डोळेझांक करून पिढिजाद जहागिरीमुळें आळशी बनलेल्या कर्तव्यशून्य लोकांचा जगांत कांहीं उपयोग नाहीं हें वीणेनें चांगलं ओळखलं म्हणूनच तिनें आपल्याला झिडकारलं.

**झंकार:**—( स्वगत ) काय ? प्रेमाची स्पर्धा इतकी जलाल आहे. ? माझ्या आळसावर बेसुमार कोरडे ओढणारा माझा नोकर वीणेला आवडतो आणि मी—बस्स,लग्नाची उठाठेव हवी आहे कोणाला ? (जाऊं लागतो. )

**मोहन:**—कां, आपल्या झोपाळू डोळ्यांना माझं सूख खुपतं कीं काय ? अहो सरदारसाहेब, आज देशांत स्वार्थत्यागाचा पूर वाहतो आहे आणि तुम्ही मात्र कोरडेच. स्वदेशीचा पुरस्कार करणारे देशभक्त तुमच्या चैनी वृत्तीला दिसत नाहींत. अहो पर्यंकपंडित, परदेशी कपडा व विलायती

माल वापरलाच पाहिजे असा सरकारी ठराव झाला आहे काय ? पण तुमच्या अंगावरच्या विलायती कापडाच्या झुली उतरत नाहींत, धूम्रपान सुटत नाहीं. टेनिसचें वेड जात नाहीं. आणि—

**झंकार:**—बस्स, पायरी पाहून बोलत जा. मी वाटेल तें करीन. आमच्या सोयी गैरसोयी तुला काय कळणार ?

**मोहन:**—तुम्हांसारख्या ऐदी जहागीरदारांनीं व बड्या सनदी नोकरांनींच स्वदेशीचा तिरस्कार व परदेशीचा पुरस्कार केला आहे. तुमची जहागीर याच गरीब देशांतली आहे का कोठून स्वर्गांतून आली आहे खालीं ? एवढेंसुद्धां होत नाहीं हातून ? धिःक्कार, धिःक्कार असो तुम्हांला. थांबा, जाऊं नका, मीच घेऊन येतों वीणेला. जाऊन तरी झोपच घेणार ना ? झोप कोठें जाते आहे आतां ?

**अरविंद:**—( रागानें ) अरे चोरा, वीणेला तूंच कोठें तरी दडविलें आहेस, बोल, कुठें आहे वीणा ? ( नलिनी मोहनजवळ जाते, त्याच्या खांद्यावर हात ठेवते ) नलिनी—?

**नलिनी:**--ही पहा वीणा ( डोक्यावरचा फेटा व अंगांतील ओव्हरकोट काढते. सर्व सस्मित होतात. )

**गिरीश:**--वीणे, या सोंगाचें नांव काय ?

**वीणा:**—प्रेमसेवा. बाबा, दादा, क्षमा करा. विस्तवावरचा निखारा झाडल्याशिवाय त्याचा प्रताप समजत नाहीं. झोपाळू श्रीमंतांना चिडविल्याशिवाय त्यांच्या हातून कर्तबगारी होत नाहीं. म्हणून मला हा प्रवेश—

**अरविंद:**—अगदीं विक्षिप्त पोर आहे पहिल्यापासून.

**सागर:**--अरविंद, नलिनीला पदरांत घ्या.

**गिरीश:**—झंकार, वीणेला संभाळा.

**झंकार:**--तिनेंच मला संभाळून घेतलें पाहिजे.

**वीणा:**—झोप सोडलीत तर अलबत संभाळून घेईन. नाहींतर मोहनबरोबर पळून जाईन.

**सागर:**--या संध्याकाळीं हा सोन्याचा दिवस उगवेल असें कुणाला वाटलें होतें ? देवा, पोरांची प्रेमसेवा फलद्रूप केलीस तशी आमची देशसेवा यशस्वी कर. ( सर्वजण नमस्कार करितात. पडदा पडतो. )

**समाप्त.**

# वर्तमानपत्रकारांचे अभिप्राय.

**राजसत्तेवर हल्लाः-** This book which forms 84th publication in the series of the "Saras Wangmaya Ratna Mala" conducted by Mr. T. N Pangal of Poona who has been rendering useful service to the Marathi literature as well as to the Marathi reading public, contains a vivid description of the chief events in one of the most extraordinary revolutionary campaigns. The story is based on Alexander Dumas' "Fall of Bastile". How the people of France revolted against monarchy with a view to end it, and how they successfully destroyed the strongest state prison and set at liberty all the political prisoners, is described in this novel, which undoubtedly will be read with great interest by lovers of fiction in general and by those who are interested in historical literature in particular. Mr. Mehendale, who is at present the acting editor of "Maharashtra" has done the translation well. —**Bombay Chronicle** Dated 7-6-31.

**राजसत्तेवर हल्लाः**—सुप्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार अलेक्झांडर ड्यूमास याच्या एका विख्यात कादंबरीचें हें भाषांतर रा. य. पां. मेहेंदळे यांनीं केलें आहे. फ्रान्सच्या जुलमी राजांच्या कारकीर्दी जितक्या भयानक होत्या तितक्याच तत्संबंधीं ड्युमासच्या कादंबऱ्या चित्ताकर्षक वाटतात....आतां-पर्यंत ड्युमासच्या ४।५ कादंबऱ्यांचीं भाषांतरें सरसवाङ्मयरत्नमालेनें केलीं आहेत व उरलेल्या कादंबऱ्यांचे अनुवाद जर प्रसिद्ध होतील तर मराठीवाङ्मयाच्या दृष्टीनें तें इष्टच आहे. श्री. मेहेंदळे यांची लेखनशैली चटकदार आहे व भाषा सहज व प्रवाही आहे. त्यामुळें वाचक कथानका-बरोबर सारखा पुढें पुढेंच धांवत जातो. अशीं सुंदर पुस्तकें प्रसिद्ध करणारी ही सरसवाङ्मयरत्नमाला वाचकांच्या आश्रयास पात्र आहे.

**स्फूर्ति-एप्रिल अंक.**

**शांतियुगः**—आपण लिहिलेली '**शांतियुग**' ही कादंबरी वाचून पाहिली. कादंबरीलेखनाचा आपला हा पहिलाच प्रयत्न असला, तरी आपला परिचय महाराष्ट्रास पूर्वीपासून आहे. कादंबरी लिहिण्याचा आपला

उद्देश स्तुत्य आहे, यांत शंका नाहीं. मनोरंजक कादंबऱ्या लिहिणारे लेखक पुष्कळ असतात. पण ध्येयप्रधान कादंबरी लिहावयाची म्हटली कीं, लेखक जर असामान्य प्रतिभेचा नसेल तर त्याच्या कृतींत कृत्रिमतेचा दोष दिसून येतो. आपण एका विशिष्ट दृष्टीनें कादंबरीचें कथानक तयार केलें आहे. त्यामुळें त्यांत वास्तववाद हुडकूं जाणें व्यर्थ आहे. आपली भाषा ओघवती आहे, व कादंबरीलेखकाच्या अंगीं असावे लागणारे गुणहि आपणापाशीं आहेत असें या पुस्तकाच्या वाचनानें दिसून आलें. आपण आपल्या उद्देशाप्रमाणें कादंबरीलिखनाचा व्यासंग असाच कायम ठेविल्यास, आपल्या हातून मराठी कादंबरीवाङ्मयांत भर पडेल असा विश्वास वाटतो.

**संपादक—स्फूर्ति, पुणें.**

---


## नवीन विनोदप्रचुर हिंदी नाटक विक्रीस तयार !

## सफेत डाकू ( किं. १ रु. )

सुप्रसिद्ध श्रीयुत रघुवीर सावकार यांचा रंगबोधेच्छु नाट्यसमाज, हें नाटक करीत असून या नाटकानें मुंबई,नागपूर,उमरावती,वगैरे ठिकाणच्या रसिकांचें फार चांगलें मनोरंजन केलें आहे. हिंदी भाषेशीं परिचय करून घेऊं इच्छिणारांनीं हें पुस्तक जर संग्रहीं ठेवून, भाषाज्ञान व मनोरंजन असे दोन्हीहि लाभ करून घ्यावेत. यांत आठ सुंदर फोटो जोडले आहेत. किं. **एक रुपाया**. ट. ह. ४ आणे वेगळा. आमचेकडे मागणी करावी.

पत्ताः—**तात्या नेमिनाथ पांगळ, पुणें.**

नित्य पठणीय ) **ज्ञानदेवाची गाथा** ( किं. २ रु.

प्रस्तावनालेखक—श्रीयुत हरिभक्त साखरेबुवा. प्रो० दांडेकर म्हणतातः—" श्री ज्ञानदेवाचे अभंग आत्मानुभवानें भरलेले व भक्तिरसानें ओथंबलेले आहेत." केसरी म्हणतोः—"श्री. पांगळ यांनीं या अपूर्व ग्रंथानें भक्तिमार्गी लोकांस एक अपूर्व देणगी सादर केली आहे." जरूर सर्वांनीं संग्रहीं ठेवणें. किं. दोन रुपये. श्रीज्ञानदेव महाराजांचें चरित्र–किंमत चार आणे. घाऊक व्यापाऱ्यांस योग्य कमिशन मिळेल.

पत्ताः—**तात्या नेमिनाथ पांगळ, पुणें.**

ठाणे, वाचनालय शाखा.
१०३५ नों. दि.
नाटक.

रत्न ८६ वें.

१८५७ चें बंडामधील स्वराज्याचा उपक्रम

व

# पुनर्विवाहाचे परिणाम.

या दोन उत्कृष्ट कादंबऱ्यांपैकीं एक प्रसिद्ध होईल.

IRBK-0101035

IRBK-0101035